# प्रस्तावना.

—:o:—

भक्तहेतु भगवान प्रभु, राम धरेउ तनु भूप ॥
किये चरित पावन परम प्राकृतनरअनुरूप ॥ १ ॥

तुळसीदास.

१ श्रीरामचरित्रानें अखिल विश्वाला मोहून टाकलें आहे. वाल्मीकिमहर्षींनीं रामायण गाइल्यापासून आजपर्यंत हिंदुस्थांतल्या सर्व भाषांत, इतकेंच काय पण बहुतेक युरोपिअन भाषांतूनही त्याचीं शेंकडों भाषांतरें व रूपांतरें झालीं आहेत. श्रीराम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न, सीता, अनुसूया, वसिष्ठ, विश्वामित्र, बिभीषण, रावण, कुंभकर्ण, सुग्रीव, अंगद, मारुति, जटायु, शबरी, इत्यादि नांवें आम्हां हिंदु लोकांना आमच्या घरांतल्या माणसांच्या नांवाहूनही अधिक परिचित वाटतात. श्रीरामाच्या पादस्पर्शानें पुनीत झालेली अयोध्या, चित्रकूट, पंचवटी, रामेश्वर इत्यादि स्थळें लाखो हिंदु लोकांच्या चित्तवृत्ति आज हजारों वर्षें लोहचुंबकाप्रमाणें आपणांकडे आकर्षून घेत आहेत. रामनामाइतकें असंख्य मनुष्यांच्या जिव्हाग्रीं नाचलेलें नांव मानवी इतिहासांत दुसरें नाहीं. "तुका म्हणे रामनामीं । कृतकृत्य झालों आम्हीं" ह्याप्रमाणें रामनामस्मरणानें आपण कृतकृत्य झालों, अशा हजारो सत्पुरुषांच्या आपखुषीच्या जबान्या आहेत. रामनामव्यासानें व रामस्वरूपचिंतनानें वाल्या कोळ्याचे वाल्मीकि महर्षि झाले. रामचिंतनानें अर्वाचीन काळांतही तुळसीदास रामदासांसारखे महात्मे जगदुद्धार करण्यास तत्पर झाले आहेत. रामायण ग्रंथ म्हणजे धर्मज्ञान, व्यवहार, राजकारण व नीतिशास्त्र यांची केवळ खाण आहे. दशरथासारखा सत्यप्रतिज्ञ व पुण्यशील राजा; रामलक्ष्मणभरतशत्रुघ्नासारखे नीतिवंत, पितृवाक्यपालनतत्पर, जनपीडाहरणक्षम व शुद्धसत्वसागर असे बंधु; वसिष्ठासारखे ब्रह्मनिष्ठ पुरोहित; विश्वामित्रासारखे तपोनिष्ठ मुत्सद्दी; अत्रि, अगस्ति, शरभंग, सुतीक्ष्ण, भरद्वाज इत्यादि महामुनी, सुग्रीवासारखे मित्र; बिभीषणासारखे, जटा-

प्रभारखे, शबरीसारखे रामभक्त; मारुतीसारखा शक्तियुक्तिभक्तिबलांचा सागर, सीतादेवीसारखी लोकोत्तर पतीव्रता यांच्या पावन कथांनीं आर्यराष्ट्राचें जेवढें कल्याण केलें आहे तेवढें दुसरें कशानेंही केलें नसेल. रामायण हा इतिहास आहे, काव्य आहे, व धर्मग्रंथ आहे. रामायण हा उदात्त गृहनीतीचा आरसा आहे, रामायण हा अत्युन्नत राजनीतीचा महासागर आहे. देवांत जसा इंद्र, ग्रहगणांत जसा सूर्य, नक्षत्रांत जसा चंद्र, पुष्पांत जसें कमळ, वृक्षांत जसा कल्पवृक्ष, किंवा वाहिनींत जशी गंगा तसा ग्रंथांत रामायण आहे. परमात्मा भक्तिभाग्यवंताला वश आहे, तो दुष्टांपासून सज्जनांचें संरक्षण करण्याकरितां यथाकाल अवतार घेतो व धर्मनीतिसौख्यांचा पृथ्वीवर वर्षाव करितो, हें रामायणाचें तात्पर्य आहे. रावण हा रजोगुण, कुंभकर्ण हा तमोगुण, व बिभीषण हा सत्वगुण असून राम निस्त्रैगुण्य आहेत; रजस्तमांचा नाश होऊन सत्वगुणाला मात्र चिरंजीव पद मिळतें; अहंकाररावणानें कबजांत घेतलेल्या बुद्धिसीतेला सोडवून आणणें हा आत्मारामाचा खरा पुरुषार्थ होय. इत्यादि अध्यात्माच्या बाजूनें विचार करणारालाही रामायण महदानंदाचें स्थान होय. उपासकांना, राजकारणी पुरुषांना, नीतिमंताला, ब्रह्मनिष्ठाला, रामराय ज्याच्या त्याच्या धारणेप्रमाणें फळ देण्यास समर्थ आहेत.

२ हिंदुस्थानांत तुळसीदासरामायणाइतकें लोकप्रिय रामायण दुसरें कोणतेंही नाहीं, आणि तें खरोखरीच अद्वितीय आहे. मराठींत श्रीएकनाथमहाराजांचें भावार्थ रामायण उत्तम आहे. मुक्तेश्वराचेंहीं रामायण प्रसिद्ध आहे. मोरोपंतांनीं तर निरनिराळ्या वृत्तांत १०८ रामायणें रचिलीं आहेत. समर्थांनीं सुंदरकांड व युद्धकांड हीं आपल्या आवडत्या भुजंगप्रयात वृत्तांत मोठ्या तेजस्वी वाणीनें व अनुपम धोरणानें वर्णिलीं आहेत. पहिल्या बाजीरावाचा समकालीन निरंजनमाधव यानें अध्यात्मरामायणाच्या आधारें चिद्बोध रामायण रचिलें आहे, पण त्याचें फक्त बालकांड उपलब्ध आहे. शिवरायांचे समकालीन कवि आनंदतनय, वामनपंडित, नागेशकवि, विठ्ठलकवि, समर्थशिष्य अनंतकवि इत्यादि क-

वीनीं सीतास्वयंवरादि स्फुट आख्यानांवर श्लोक दिली आहे. वाल्मीकिमुनींचें मूळ रामायण व व्यासांचें अध्यात्मरामायण हीं संस्कृतांत आहेत; पण सुबोध आहेत. हीं सर्व रामायणें व रामायणांतर्गत आख्यानें वारंवार स्वचित्तशोधनार्थ वाचीत असतां त्यांतून उत्तमोत्तम पद्यें घेऊन कवींनीं गाइलेलें असें एक ' कवि रामायण ' तयार करावें, म्हणजे निरनिराळ्या वृत्तांत निरनिराळ्या कवींचे विविधप्रकारचे मासले एकत्र वाचतां येऊन मासादिक कवींच्या वाणीनें रामकथा गाण्याचा आनंद अबालवृद्धांस अनुभवितां येईल, असें वाटून सदर ग्रंथ मीं प्रसिद्ध करीत आहे. मुलांमुलींच्या गृहशिक्षणांस याचा चांगला उपयोग होऊन प्राचीन मराठी कवींच्या मागें पडत चाललेल्या काव्यांचा अभ्यास आणखी आस्थेनें घरोघर वाढूं लागावा, अशा बुद्धीनें हा ग्रंथ प्रसिद्ध करीत आहे. राष्ट्रीय विचारांचें व राष्ट्रीय परंपरेचें संगोपन करण्याचा उत्तम मार्ग म्हटला ह्मणजे राष्ट्रीय वाङ्मयाचे पवित्र संस्कार राष्ट्राच्या बुद्धीला व वाणीला अखंड लावून देणें, हा होय. स्वतःच्या मोडक्यातोडक्या साध्या गद्यांत रामकथा सांगण्यापेक्षां सत्कवींच्या पवित्र वाणीनें ती सांगितली असतां वाचकांच्या मनांवर अधिक ठसेल असें मला वाटतें. उत्तम पक्कान्नें निर्माण करण्याची शक्ति जर अंगात नाहीं, तर वाढण्याचें काम आनंदानें करावें हें बरें.

२ प्रस्तुत ग्रंथांतले उतारे बहुधा सर्वमान्य कवींचेच आहेत. मंगलाचरणानंतर मुक्तेश्वरांच्या वाणीनें थोडक्यांत रावणचरित्र ( १–३९ ) सांगून रामावताराचें प्रयोजन ( ३९–४६ ) सांगितलें आहे. रावणानें सर्व देव बंदींत घातले व ' परम विकळ केले साधु सन्मार्गगामी ' ह्मणून देव व मुनी ब्रम्हदेवाला पुढें घालून गाईसारख्या दीन झालेल्या पृथ्वीच्या वतीनें श्रीविष्णूकडे गेले व ' साधु द्वेष्ट्या जगत्पीडक राक्षसांचा निःपात तूंच केलास तर होणार आहे ' अशी त्यांची त्यांनीं प्रार्थना केली; विष्णूनें दशरथाच्या पोटीं मी अवतार घेतों, असें सांगून देवांला अंशरूपांनीं वानरकुळांत जन्म घेण्यास सांगितलें. परमात्म्याच्या अवतारकार्याला तरी इतर देवांचें साह्य लागतें. रामजन्माचे श्लोक ( ४९–८३ )

गोड असून त्यांत रामभरतांच्या कुंडल्या दिल्या आहेत. त्या, दशरथस्त्रियांच्या गर्भारपणांचें सुंदर वर्णन, जन्मापूर्वीची रामजोशाची बहारीची लावणी व विठ्ठल कवींचा पाळणा हे भाग उत्कृष्ठ आहेत. रामाच्या बाललीला ( ८४–१०० ) कवित्व व भक्ति यांनीं परिपूर्ण आहेत. त्यांत निरंजनमाधवांनीं केलेलें रामाच्या बालमूर्तीचें वर्णन व पंतांनीं केलेलें त्याच्या बाललीलेचें अनुपम वर्णन जरूर पहावें. रामाच्या अवताराची अत्रि, भरद्वाज, अगस्ती इत्यादि मुनी वाट पाहत होते, पण त्यांत विश्वामित्रांची कामगिरी विशेष होती. विश्वामित्र गुरु ( १०१–१३१ ), व विश्वामित्रमखरक्षण ( १३२–१४१ ) हे प्रसंग व अहल्योद्धार व सीतास्वयंवरांतील विश्वामित्राची कामगिरी पाहिली म्हणजे समर्थांची आठवण होते. सर्व ऋषि तपोबलानें बलिष्ठ होते, पण वर्णाश्रमपद्धतीचे ते सर्व संरक्षक असल्यामुळें राक्षसनाशार्थ ते क्षत्रियवीरांचीच वाट पाहत होते. त्यांनीं सर्वांनीं पुढें रामरायाला आपल्या पुण्याशीर्वादांनीं मोठें साह्य केलें, पण त्या सर्वांत विश्वामित्रांनीं विशेष प्रकारचें राजकारण केलें. दशरथाला थोडा नाखूष करून पण तपोबलाची भीति दाखवून त्यांनीं रामाला मागून नेलें, त्याच्याकडून ताटकेचा वध करविला, त्याला क्षुधा व तृषा लागूं नयेत म्हणून बलातिबला विद्या दिल्या, अहल्येचा उद्धार करविला, सीतास्वयंवराला नेऊन रावणासह सर्व राजांसमक्ष जीर्ण धनुष्याचा भंग करविला व सीतास्वयंवरानें अयोध्या व विदेह ह्या दोन राज्यांचें सख्य घडवून रामाला सर्व शस्त्रास्त्रविद्या शिकवून विश्वामित्र तपाला निघून गेले! विश्वामित्राचें वर्णन आणि भाषणें त्याच्या पेशाला योग्य अशींच आहेत. तो तेजस्वी पण दयाळु होता. विश्वामित्राच्या हातीं रामाला देतांना दशरथानें जो बोध केला ( १२४–१२७ ) तो विद्यार्थ्यांच्या पालकांनीं व विश्वामित्रांनीं केलेलें कार्य शिक्षकांनीं विचार करण्यासारखें आहे. विश्वामित्राच्या वनाचें वर्णन ( १३७ ) नामी आहे. अहल्येनें केलेलें रामपादरजांचें वर्णन ( १५२–१५८ ) अत्यंत प्रेमपूर्ण आहे. सीतास्वयंवर हा आमच्या कवींचा आवडता विषय होय. हें प्रकरण [ १६४--२१३ ] वाचकांनीं जरूर वाचावें. त्यां-

तील विदेहाचें, रावणाचें, सीतेचे, रामाचें व विश्वामित्राचें अशीं जीं पांच शब्द-चित्रें आहेत ती फार मार्मिक आहेत. 'कोण तुझ्या मनासि येतो सांग हो सीते!' हें आनंदतनयाचें बहारीचें पद कीर्तनांत म्हणूं लागलें कीं केवढा रंग भरतो! रामाला पाहतांच सीतेची जी अवस्था झाली [ १८१-१८२ ] ती विठ्ठलानें फार मार्मिकपणानें वर्णून देवदर्शनानंतर भक्ताची स्थिति कशी होते हें ध्वनित केलें आहे. मंगळाष्टकें [ २०५–२१० ]दिलीं आहेत तीं विवाहप्रसंगीं सर्वांच्या नित्य म्हणण्यांत यावीत म्हणून मुद्दाम दिली आहेत. परशुरामाचें तेज रामानें हरण करून घेतलें [ २१७–२२१ ] ह्या गोष्टीचें मर्म समजलें पाहिजे. दोघेही विष्णूचेंच अवतार मग त्यांत विरोध कां? क्षत्रिय उन्मत्त झाले त्यांना ताळ्यावर आणण्याकरितां परशुरामाचा अवतार आहे, पण क्षत्रियवर्ण अवशिष्ट राहून त्यांच्याच हातून चारी वर्णांचें रक्षण उत्तम प्रकारें कसें होतें, हें दासवि-ण्यासाठीं रामाचा अवतार झाला. रामनारदांचा संवाद ( २३०–२४५ ) व त्यांतील २४३व्या श्लोकांतील मर्म विचारणीय आहे. 'किंतु कालानुरोधेन तत्त-त्प्रारब्धसंक्षयात्' ह्या पदाचा गूढार्थ सुज्ञांनीं शोधून काढावा. अयोध्येंतल्या कैकयीच्या धामधुमी व रामाचें वनवासाला जाणें ( २४६–२६७ ) यांतील पतांची कविता रमणीय आहे. सीता व राम यांचा वनास जातांना झालेला कडाक्याचा पण प्रेमाचा वाद ( २६८–२९५ ) वाल्मीकिरामायणांतूनच घेतला आहे. सीतादेवीनें आपला स्त्रीधर्म उत्तम प्रकारें जागविलेला पाहून वाचकांस आनंद वाटतो. भरताचा कैकयीवरचा सात्विक क्रोध, त्याची निर्लो-भता व रामभक्ति ( ३०२–३२० ) केवळ अवर्णनीय आहेत. विराध, शूर्पणखा, खरादि चौदा हजार राक्षस यांस मारल्यामुळें कलहास प्रारंभ झाल्यावर ( ३२१–३२७ ) रामानें कार्यसिद्धीसाठीं संतमहंतांचीं दर्शनें घेऊन त्यांचे आशिर्वाद घेतले. ( ३२७–३३५ ) ब्राह्मणांनीं तपोबल संपादन करावें व सर्व वर्णरक्षणार्थ क्षत्रियाला साह्य करावें हेंच त्यांचें मुख्य कार्य आहे. लोकनायकाचें हृदय किती प्रेमळ असावें लागतें व जनसंग्रहासाठीं जातिनामाभयाकडे लक्ष न

देतां शुद्ध हृदयाकडेच त्यांला लक्ष्य द्यावें लागतें हें शबरीचीं उच्छिष्ट बदरें रामानें साक्षीं या मनोहर कथेवरून (३३६—३४६) स्पष्ट दिसतें. हें आख्यान आनंदतन-यानें उत्कृष्ट वर्णिलें आहे. शबरीला रामाचा उपदेश आहे (३४८—३५६) त्यांत भक्ताला शिकण्यासारखें फार आहे. सीताहरणप्रसंगीं सीतेचीं लक्ष्मणास कठोर वचनें व रामाचा शोक हे प्रसंग (३६४—३८४) पंतांनीं उत्तम वर्णिले आहेत. रामसुग्रीवांचें सख्य (३८५—३९८) व वानरांचें बलाबल (३९९—४२५) या प्रसंगानंतर लंकेचें वर्णन (४२६—४३२) समर्थांनी उत्कृष्ट केलें आहे. सीताशुद्धि (४३३—४५१) यावरची पंतांची कविता व लंकेचा मारुतिरायानें केलेला विध्वंस (४५२—४६३) यावरचे समर्थांचे श्लोक वीरश्रीनें ओथंबलेले आहेत. सीतेनें रावणाला दिलेलें सणसणित उत्तर (४३९—४४३) व मारुतीला सांगितलेले आपले बाणेदार विचार (४४७-४८) त्या वीरसतीला शोभण्यासारखेच आहेत. रावणाचा अहंभाव (४६५—४६९) यांत उत्तम प्रकारें प्रकट झाला आहे. त्यानें बिभीषणाचा धिःकार केल्यावर तो रामाकडे गेला, पण " पुरी अंतरीं कोण कैसा कळेना। तया ठेवितां राजनीती मिळेना " हा विचार रामापुढें उभा राहिला. त्यानें सर्वांचा सल्ला घेऊन व बिभीषण कपटानें आश्रयार्थ आला नाहीं हें अंतर्ज्ञानानें ओळखून त्याच्या माथीं हस्त ठेविला व त्याला लंकेचें राज्य दिलें. रामरावणाचें युद्ध (४७७—५०४) व रावणाचा मृत्यु (५०४—५१०) हे प्रसंग झाल्यावर ' निमाल्यावरी वैर कांहीं करावें ! ' म्हणजे " मरणांतानि वैराणि " ही नीति सांगून रामानें रावणाची क्रिया करविली. पुढील प्रकरणांतून समर्थांचे श्लोक व पंतांचे श्लोक फार रसाळ आहेत. भरतभेट, रामाचा जयजयकार इत्यादि प्रकरणें अवश्य वाचण्यासारखीं आहेत. असो. ह्या कविरामायणाचा महाराष्ट्रांतील सर्व लोक प्रेमादरपूर्वक स्वीकार करितील अशी आशा करून हें पुस्तक श्रीरामचरणीं भक्तिपूर्वक समर्पण करितों. श्रीराम जयराम जयजय राम.

पुणें मुमुक्षुकचेरी
श्री रामनवमी शके १८३३

साधुसंतांचा नम्र सेवक
लक्ष्मण रामचंद्र पांगारकर.



॥ श्रीरामःप्रसन्नोस्तु ॥

# मंगलाचरण.

यः पृथ्वीभरवारणाय दिविजैः संप्रार्थितश्चिन्मयः
संजातःपृथिवीतले रविकुले मायामनुष्योऽव्ययः ।
निश्चक्रं हतराक्षसः पुनरगाद्ब्रह्मत्वमाद्यं स्थिरां
कीर्ति पापहरां विधाय जगतां तं जानकीशं भजे ॥ १ ॥

--अध्यात्मरामायण.

जो पृथ्वीभरवारणार्थ विबुधीं संप्रार्थिला श्रीपती
तो झाला वसुधातळीं रविकुळीं मायामनुष्याकृती ।
मोठा राक्षसभार नासुनि पुन्हां ब्रह्मत्व जो पावला
ठेवी सुस्थिर कीर्ति तो त्रिभुवनीं सीतापती वंदिला ॥ २ ॥

नमस्ते नमस्ते सदानंदराशी । नमस्ते नमस्ते विभू चिद्विलासी ।
कृपासागरा ! स्फूर्ति द्यावी मतीला । मनीं वाटतें वर्णिजे रामलीला ॥ ३ ॥

वाणी पवित्र करणें गुणकीर्तनानें
ऐसें मला गमतसे तुमच्या कृपेनें ।

बैसोनि हृत्सरसिजीं मज बोलवावें
या बाळकासि जगिं धन्य असें करावें ॥ ४ ॥

संतापत्रय नाशितें चरित हें, अज्ञानें विध्वंसितें,
बंधा सोडवितें, भयासि हरितें, पापासि संहारितें,
दीर्घायुष्य–सुपुत्र–लाभ करितें, दारिद्र्य निर्दाळितें,
मायामोहमदादिकांसि दमितें, चिद्ब्रह्म हें दावितें ॥ ५ ॥

हृदयकमलकिंगालागिं पीयूषभावें
श्रवणकनककुंभीं सादरेसीं भरावें ।
अनुदिन गुण नामीं नित्य रामीं रमावें
अचरचर जिवांतें रामरूपीं नमावें ॥ ६ ॥

—निरंजनमाधव

## अभंग.

राघवाची कथा पतीतपावन । गाती भक्तजन आवडीनें ॥ १ ॥
राघवाच्या गुणा न दिसे तुळणा । कैलासीचा राणा लांचावला ॥२॥
देवांचें मंडण भक्तांचें भूषण । धर्म–संरक्षण राम एक ३ ॥
रामदास ह्मणे धन्य त्याचें जिणें । कथानिरूपणें जन्म गेला ॥ ४ ॥
जेणें फेडिला पांग अज्ञादिकांचा । बळें तोडिला बंध त्या त्रीदशांचा
ह्मणोनी कथा थोर या राघवाची । जनीं ऐकितां शांति होते भवाची

—रामदास.

# १ रावणचरित्र.

पुलस्त्य[1] ब्रह्मयाचा नंदन । विश्रवा सुनामा तपोधन ।
भारद्वाजें कन्यारत्न । तयालागीं दीधलें ॥ १ ॥
तिचे पोटीं जन्मला कुमर । नामें वैश्रवण कुबेर ।
तेणें सत्यलोकेश्वर । तपस्तेजें तोषविला ॥ २ ॥
सेवेसीं निवेदुनी यक्ष । कृपेनें केला धनाध्यक्ष ।
शंकरगणांमाजीं मुख्य । परमप्रिय शिवातें ॥ ३ ॥
वस्तीशी हेमलंका स्थान । प्रयाणा पुष्पक विमान ।
लोकपाळांमाजीं जाण । उत्तरादिशाधीश तो केला ॥ ४ ॥
तेणें तोषवाया जनका । सेवे वोपिल्या त्रय नायका ।
पुष्पोत्कटा, मालिनी, राका । रूपगुणी सुपवित्रा ॥ ५ ॥
तिहीं पतिव्रताधर्मे । पति तोषविला संभ्रमें ।
संतोषोनि वल्लभोत्तमें । सकळां दिधलें वरातें ॥ ६ ॥
रावण आणि कुंभकर्ण । पुष्पोत्कटेचे नंदन ।
मालिनीचा बिभीषण । परम पवित्र परमात्मा ॥ ७ ॥
खर पुत्र आणि शूर्पणखा । प्रसवली तिसरी राका ।
ब्राह्मण वधूनी सहस्त्रसंख्या[2] । नित्य दोघे भक्षिती ॥ ८ ॥

---

१ पुलस्त्य ऋषि हा ब्रम्हदेवाचा मानसपुत्र होता. भरद्वाजाची कन्या ही विश्रव्याची पहिली भार्या. हिच्या पोटीं कुबेर जन्मला, विश्रव्याची दुसरी भार्या पुष्पोत्कटा इचे पुत्र रावण व कुंभकर्ण ह होत. २ हजारों.

दक्षिण काशीक्षेत्र गोकर्ण । तेथें पातले चौघेजण ।
तपश्चर्या अति दारुण । देहदंडन मांडिलें ॥ ९ ॥
लोहकंटकावरी अंगुष्ठ । ठेवुनी रावण एकनिष्ठ ।
लक्ष जपाचा शेवट । होतां हवन आरंभी ॥ १०
छेदूनियां दाही शिरें । हवनीं होमीं आपुल्या करें ।
पुढती ब्रह्मयाच्या वरें । उद्भवती तात्काळ ॥ ११ ॥
शीत उष्ण वात पर्जन्य । माथां घेउनी कुंभकर्ण ।
निराहारी निर्जळी जाण । एकासनीं तिष्ठत ॥ १२ ॥
द्वादशाग्नि पंचाग्नि धूम्रपान । सूर्यमंडळ अवलोकन ।
विष्णुस्मरणें बिभीषण । तपश्चर्या करीतसे ॥ १३ ॥
दहासहस्त्र वर्षे होतां । तयांप्रती पावला विधाता ।
ह्मणे, कष्टूं 'नका आतां । इच्छितार्थ मागिजे ' ॥ १४ ॥
' अमरत्व, निर्भयत्व, । तिन्ही लोकांचें अधिपतित्व, ।
देई ' ह्मणोनी मागत । दशानन ब्रम्ह्यानें ॥ १५ ॥
' गंधर्व, देव, दानव, असुर, । यक्ष, राक्षस, सर्प, किन्नर, ।
भंग पावोनि मज समोर । दास्य करिती तें करीं ' ॥ १६ ॥
आपुलें भक्ष्य ह्मणोनि गर्वे । मनुष्यवानरांचीं नांवें ।
नेघे तेथें ब्रह्मदेवें । उपाय पुढें सूचिला ॥ १७ ॥

---

१ देहं कष्टवून चौघांनीं तप केलें २ ब्रह्मदेव.

कुंभकर्ण नमूनि प्रार्थी । 'अपार भक्षितां नसो तृप्ती ।
षण्मास निद्रेवरी जागृती । एक दिवस मज द्यावी ' ॥१८॥
बिभीषण ह्मणे, ' विश्वपती ! । भगवद्भावना सर्वभूतीं ।
दया अहिंसा विष्णुभक्ति । चढोवढी मज द्यावी ॥ १९ ॥
मांडिलियां आपत्तिकाळ । धर्मबुद्धि असावी अचळ ।
कुसंगतींही न पवे चळ । भाव निर्मळ मज द्यावा ' ॥२० ॥
प्रसन्नमुखें चतुरानन । ह्मणे, ' राक्षसयोनींत जनन ।
पावोनी रजस्तमोगुणातीत मन । धन्य धन्य पवित्रा' ॥ २१॥
पाहोनी रावणा कुंभकर्णा । ह्मणे, ' संपूर्ण मनकामना ।
उन्मत्तपणें पावाल विघ्ना । तेही संज्ञा सांगतसे ' ॥ २२ ॥
कैलास आंदोळितां बळी । आणि शिरकमळें पूजिता चंद्रमौळी ।
शंकरवर महाबळी । लाधला सर्वां वरांतें ॥ २३ ॥
शंभुस्वयंभुवरदानमेळें[2] । त्रैलोक्यीचें राज्य केलें ।
ते वेळीं विश्व कैसें गमलें । कीटकप्राय त्या दृष्टीं ! ॥ २४ ॥
दंडूनियां कुबेरातें । हरितलें पुष्पकविमानातें ।
लंका जिंतोनी आपणियातें । ठाव केला बसावया ॥ २५ ॥
बंदीं घातलें सुरां सकळां[1] । नवगृहां पायीं एक शृंखळा ।
ताडूनियां अमरपाळा । भृत्यकामीं योजिलें ॥ २६ ॥

१ न्यून. २ शंकर आणि ब्रह्मदेव या उभयतांच्या वरप्राप्तीमुळें.

मारूनियां ऋषितापस । नित्य खाती मेदमांस ।
वीरश्री माजले राक्षस । धेनुविप्रा भक्षिती ॥ २७ ॥
त्रैलोक्य पीडिलें आंगवणें । हरितलें धनें अमूल्यें रत्नें ।
अपूर्व तितुकें देखोनि नयनें।हिरोनि नेती दुरात्मे ॥ २८ ॥

—मुक्तेश्वर.

## २ रामावताराचें प्रयोजन.

भूमिर्भारेण मग्ना दशवदनमुखाशेषरक्षोगणानां
धृत्वा गोरूपमादौ दिविजमुनिजनैः साकमब्जासनस्य ।
गत्वा लोकं रुदंती व्यसनमुपगतं ब्रह्मणे प्राह सर्वं
ब्रह्मा ध्यात्वा मुहूर्तं सकलमपि हृदा वेद शेषात्मकत्वात् २९

तस्मात्क्षीरसमुद्रतीरमगमद्ब्रह्माथदेवैर्वृता
देव्या चाखिललोकहृत्स्थमजरं सर्वज्ञमीशं हरिम् ।
अस्तौषीच्छ्रुतिसिद्धनिर्मलपदैःस्तोत्रैःपुराणोद्भवै
र्भक्त्या गद्गदया गिरातिविमलैरानंदबाष्पैर्वृतः ॥ ३० ॥

-अध्यात्मरामायण

१ आपल्या पराक्रमानें २ हरण केलें.

पृथ्वी अत्यंत भारें[1] व्यथित सुरमुनीसंगमें[2] ब्रह्मलोकां
गेली तें दुःख सांगों दशवदनचमूपीडिताऽपत्ति[3] जे कां ।
तेव्हां क्षीरोदतीरा[4] अमरधरणिसी[5] तो विधी जाय वेगीं
प्रार्थी सर्वाधिपातें[6] नमुनि निजशिरीं सादरें सानुरागीं ॥ २१

निरंजनमाधव

" जय जलधरनीला । भक्ततापघ्नलीळा !
असुरहननशीळा ! मासघासाग्निकीळा ! ।
सकलभुवनपाळा । कैटभाद्युग्रकाळा !
मुनिहृदयविशाळा ! वास संतोषशाळा ! ॥ २२ ॥
अहिसुरनर सारे भाजिले स्वप्रतापें
न गणुनि अमरादि स्त्रीग्रहाद्युग्र पापें[7] ।
परम विकळ केले साधु सन्मार्गगामी
ह्मणुनि शरण आलों सेवक स्वर्नगा मी ॥ २३ ॥
तुजहुनि दुसरा या राक्षसा लोकराया !
कवण कुशळ आहे भस्म युद्धीं कराया ? ।
तव पदनत-साधुद्वेषकृत्पातकी[8] जे
जगदसुखद[9] त्यांचा त्वांचि[10] निःपात कीजे " ॥ २४ ॥

—मोरोपंत

---

१ दुष्टांच्या भारानें २ देवं व मुनि यांसह ३ रावणाच्या लोकांनीं केलेल्या छळापासून होणारा त्रास ४ क्षीरसमुद्राच्या कांठीं ५ देव व पृथ्वी यांसह ६ परमात्मा माधव यातें ७ पापी रावणानें ८ साधूंचा द्वेष करणारे पापी ९ जगत्पीडक १० त्यांचा तूंच अवतार घेऊन नाश करशील तर होईल.

## ३५ अभंग

“[1] सत्य करी आपुलें वचन । आमुचें करी बंधमोचन ।
आमुचें विपत्तीचें निदान । सावधान अवधारी ॥ १ ॥
इंद्र बारी चंद्र कन्हेरी । यम पाणी वाहे घरोघरीं ।
वायु सदा झाडी ओसरी । विधि तेथें करी दळा कांडा ॥२॥
अश्विनी देव दोन्ही । परिमळ देती स्त्रियेलागोनी ॥
विलंब[2] अर्धक्षणी । दासी बांधोनी धुमेसिती ॥ ३ ॥
अग्नीस आपदा बहु[3]वंस । रावणाच्या असो[4]सें ।
नानापरीचे स्पर्[5]शदोष । घेई अहर्निशि धुपधुपीता ॥ ४ ॥
उदक सेवा वरुणाहातीं । विजणें सेवा नित्य वसंतीं ।
निरोप सांगावया बृहस्पती । प्रजापति शांतिपाठा ॥५ ॥
ऐसे आलीं देव समस्त । रावणाचे नित्यांकित ।
लंके आलियां रघुनाथ । एकाजनार्दनीं बंधमुक्त करील” ॥६॥

——एकनाथ

विधी सर्व वृत्तांत सांगे हरीला । महीमाजि जो रावणें व्याप केला ।
त्रिलोकांसि जिंकोनि सारी सुरांची । पदें घेतलीं हें निवेदी विरिंची[6][7] ३६

---

१ ही सर्व देवांची प्रार्थना आहे. २ विलंब होतांच आश्विनीकुमारांना रावणाच्या दासी बांधून फटके मारतात. ३ पुष्कळ ४ न सोसवणाऱ्या. ५ शौचाच्याही वेळीं विज्या ओढणाऱ्यांनीं पवित्र अग्निनारायणाचा आपण केवढा उपमर्द करितों हें लक्षांत ठेवावें ! ६ ब्रह्मदेव. ७ पीडा.

"महीं भार साहो शकेना खळांचा । महा राक्षसांच्याहि सेनाबळांचा ।
न चालों शके धर्मयज्ञादि कांहीं । नसे भागसंप्राप्ति देवादिकांही ॥३७॥
बहुत्रास दीला सुरासज्जनांला । मुनींचे थवे भक्षिती दुष्ट हेळा ।
पुढें काय कीजे? वदे देवदेवा! । घडे केंवि लोकां तुझी पादसेवा?॥३८॥
मनुष्याकरीं मृत्यु त्या योजिलास । वडावें सुखें योगमायाविलासें
वधावें जगत्कंटका,हे मुरारी!'असें ऐकतां बोलिला शार्ङ्धारी।३९।

" यदा यदाहि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ! ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥ ४० ॥
परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे " ॥ ४१

पूर्वीं म्यां वर कश्यपासि दिधला, त्याच्या तपें तुष्टलों,
इच्छी पुत्र मला ह्मणोनि सखया ! ऐसें तया बोलिलों ।
' होतों पुत्र तुझा ' असें निगेदिला तो सूर्यवंशांतरीं
आहे भूपति जाण तूं दशरथा-सत्यात्मकाचे घरीं ॥ ४२ ॥
कौसल्या जननी तिच्याचि उदरीं होणें मला जाणिजे,
चौरूपें आपणासि निर्मुनि करी हे खूण त्वां मानिजे, ।
कैकेयी प्रसवे सुबाहु भरता, देवी सुमित्रा सुतां
दोघांतें प्रसवेल; निश्चय असा तूं ऐकिजे तत्वता ॥ ४३ ॥

१ देवांचा भाग देवांना मिळत नाहीं २ असें ज्याला मीं बोललों,वर दिला, तोच सांप्रत सत्यात्मा दशरथ आहे ३ जन्म घेणें ४ मुक्तेश्वर ह्मणतातरः-" चतुर्धा झाली एकतनु । लक्ष्मण भरतशत्रुघ्नु। पूर्ण अवतार रघुनंदनु । रामरूपें आगळा ."

मन्माया जनकात्मजा भगवती होईल ते चित्कळा
देवी तीस पुढें करूनि रचणें हे सर्व लीला मला।
यासाठीं सुरनायकीं सकळिकीं होऊनि शाखामृगें[1]
वर्तावें सकळा क्षितींत बरवें चिंतोनि मातें[2] उगें ॥ ४४ ॥
भु० प्र०—असें ऐकतां तोषला तो विधाता
मुखें सांगतो देवसंघा[3] समस्ता।
" घडावे तुह्मीं वानरांचे स्वरूपीं
शिळापर्वतीं युद्धकर्ते प्रतापी " ॥ ४५ ॥

—निरंजन माधव.

## इंद्रवंशा.

सेवा प्रभूची सुखदा घडावया। रात्रिंचराचें कुळ उंपडावया[4]।
गोपुच्छऋक्षप्लवगादि योनिज। देवादिकांहीं सुत निर्मिले निज ॥ ४६ ॥
सिद्धर्षि विद्याधर यक्षचारण। गंधर्वतार्क्षोरग-देवतागण।
उत्पादिती वानर ऋक्ष योनिजा। पद्मोद्भवाज्ञेकरुनी[5] प्रजा निजा ॥४७॥
केला तिहीं वास सुखें स्थळस्थळीं। गंगातटीं हेमनगादिकाचळीं।
सुग्रीववाल्यादिसमीप राहती। रक्षोजनाचा वधमार्ग[6] पाहती ॥ ४८ ॥

—मोरोपंत.

---

१ वनचरें २ माझें चिंतन करीत. ३ सर्व देवांस. ४ राक्षसांच्या कुळाचा समूळ नाश करण्यासाठीं ५ ब्रह्मदेवाच्या आज्ञेनें. ६ राक्षसांच्या वधप्रसंगाची मार्गप्रतीक्षा करीत.

# ३ रामजन्म.

भार्या आर्या दशरथनृप प्रीतिनें नित्य लक्षी,
चित्तें वित्तें करुनि सुखवी, सर्वतः[1]प्रेम रक्षी, ।
सर्वा गर्वासह[2] न धरिती लेश अन्योन्य दावा,
कांतस्वांतप्रिय[3] गुण असा काय त्यांचा वदावा ? ॥ ४९ ॥
त्या कांतांसीं प्रमुदितमनें रक्षुनी धर्मकेली[4]
भूपाळानें बहुदिन अपत्योद्भवार्थेंचि[5] केली ।
नानातीर्थव्रतविधि सुरब्राह्मणाराधनातें
साधी, आधी करुनि पुढती देहदाराधनांतें[6]. ॥ ५० ॥

अमात्य मंत्री गुरुविप्र जे कृती । तयांसि पाचारुनि तो महीपती ।
समीप संस्थापुनियां बरे परी । अपत्यलाभार्थ विचार आदरी ॥ ५१ ॥
ह्मणे, " स्वपूर्वार्जित राज्य रक्षिलें । अमार्गवर्ती[7] खळ लोक शिक्षिले ।
न फेडिलें आजुनि पूर्वजर्ण[8] मी । ह्मणूनि आहे स्वमनीं बहुश्रमी ॥५२॥

१ सर्व प्रकारांनीं. २ गर्वासह दावा न धरिती, म्हणजे गर्वही धरीत नव्हत्या व अन्योन्य दावाही धरीत नव्हत्या. ३ कांत म्ह० पति त्याच्या स्वांताला म्ह० अंतःकरणाला प्रिय असा गुण. ४ धर्मक्रीडा, धर्माचा अतिक्रम न करितां केलेले विलास. ५ कालिदासानें ' दारानपत्याय ' म्हणजे स्त्रीसंग केवळ अपत्योत्पादनासाठींच करण्याचें रघुवंशीयांचें शील आहे असें म्हटलें आहे. ६ देह दारा व धन यांचेकडे न पाहतां. ७ धर्मच्युत नष्ट. ८ पितृऋण.

न पाविजे स्वर्ग कदापि अप्रजें । असें खरें बोलति साधु विप्र जें ।
सुतीव्र तें शल्य तसेंचि लागतें । मनांत रात्रिंदिन हेंचि जागतें ॥१३॥
वधू पवित्रा अनुकूलचारिणी । सुरद्विजार्चागुरुभक्तिकारिणी ।
न पावल्या सत्कुलजा प्रजाफळ । जगत्त्रयीं मीं दुरदृष्ट केवळ "॥१४॥

—मोरोपंत.

## ( पृथ्वी )

नसेचि सुत त्याजला म्हणूनि फार चिंतावला,
सुखासि बहु वीटला, अफळ जन्मसा वाटला, ।
सखेद मनिं दाटला, गुरु वसिष्ठ त्या भेटला,
दुजा विधिच वाटला, चरणपंकजीं लोटला ॥ १५ ॥
' समस्त शुभलक्षणी मज कुमार होती जसे
उपाय कथिजे तसा करिन यत्न लोकीं असे ।
अशी मुनिवरें गिरा परिसतां वदे, " भूपती !
त्यजीं परम घोर ही करिसि दीर्घ चिंता किती ? ॥ १६ ॥
तुला कुमर चांगले सबळ लोकपालांपरी
चतुष्टय तुझ्या कुशीं सरस जन्मती लोकरी ! ।
विभांडसुत आणवी मुनिवरेण्य शांतापती
तदा सफळ सर्वही घडत चिंतिले, सन्मती ! " ॥ १७ ॥

---

१ निपुत्रिकास. ' संतति नसतां स्वर्गी पितरांसि बसावया नसे ठाव. ' पंत-भारत. २ पुत्ररूप फळ ३ दुष्ट आहे अदृष्ट ज्यांचें असा, अभागी. ४ ब्रम्हदेव- ५ विभांडकमुनीचा पुत्र ऋष्यशृंग.

ऋषिशृंग संप्रार्थितां यज्ञकामीं[1]
यजी अश्वमेधें प्रभूयज्ञनामीं ।
करी जातवेदासि[2] संतुष्ट राजा
तदा वोपिलें पायसान्नासि वोजा ॥ ५८ ॥

तें दिव्य पायस निरीक्षुनि भूभुजाला
संतोष फार हृदयीं अनुपम्य झाला ।
आज्ञा करी ऋषिसमेत वसिष्ठ यातें
' दे दिव्यरूप परमान्न वरास्त्रियांतें[3] ॥ ५९ ॥

तदा वाटी राजा हवि वडिलपत्नीस अर्धें[4]
दुजा कैकेयी तें सम करुनि दे स्नेहविशदें[5] ।
स्वभागीं कौसल्या सकरुण सुमित्रेस अरधें
तसें दे कैकेयी अतिविमल भागा परमुदें[6] ॥ ६० ॥

चरू भक्षितां गर्भिणी राजदारा
विराजेति[7] देवांगनाशा उदारा ।
कपोलद्वयीं पांडुता केतकीची
वरी शोभली गौरता कांचनाची ॥ ६१ ॥

—निरंजन माधव.

---

१ पुत्रकामेष्टियज्ञ. २ अग्नि. ३ मुख्य राण्यांना. ४ अर्धें. ५ प्रेमपूर्वक. ६ परमानंदानें. ७ शोभूं लागल्या.

## ( शालिनी. )

अंतर्वत्नी[1] त्या तिघी भूपजाया । जाल्या आधीं दोहदें पांडुकाया[2] ।
दानीं त्राणीं पूजनीं मात्र गोडी । अन्नीं पानीं जाहली प्रीति[3] थोडी ।
जाली त्यांच्या अद्भुता दीप्ति[4] देहीं । होती सारे दीप विच्छाये[5] गेहीं ।
भूपालस्त्री यद्यपि स्वल्पभूषा[6] । तेजस्तोमें[7] जिंकिती चंद्रपूषा[8] ॥ ६३ ॥
दीनत्राणीं पूर्ण कारुण्यमूर्ती । देती जेणें अर्थिवांछाप्रपूर्ती[9] ।
त्या राजस्त्री गर्भभारालसा ही । जाणों सज्जा उद्धराया धरा ही ।६४।
प्रीत्युत्कर्षें जैं परामर्षकाजा । जाय स्त्रीच्या नित्य गेहासि राजा ।
तेव्हां प्रत्युत्थान[10] देतां निवारी । हस्ताधारें ऊठतां यत्न भारी ॥ ६५ ॥
जों जों होतीं गर्भसंस्थूळ पोटें । तों तों भूपाच्या मनीं सौख्य मोठें ।
आनंदाची वृद्धि गर्भापरीस । राजस्वांतीं जाहली रात्रिदीस ॥ ६६ ॥
त्रैलोक्याचा नाथ आनंदसद्में । अस्मत्सारें[11] प्राशिल स्वास्यपद्में[12] ।
जाणों ऐशा या सुखानें सुतुष्ट । जाले त्यांचे फार वक्षोज[13] पुष्ट। ६७ ।
ऐशा साध्वी भूपपत्नी अहो ! त्या । अंतर्वत्नी वर्षपर्यंत होत्या ।
आला त्यांचा जेधवां सूतिकाळ । नाचे हर्षें दिग्रथ[14] क्षोणिपाळ ॥६८॥

—मोरोपंत.

---

१ गर्भिणी. २ फिकट, पांडुरवर्णी. ३ दान, दीनसंरक्षण व देवगुरुपूजन या विषयीं त्यांना आवड उत्पन्न झाली व त्यांचें अन्नपाणी तुटलें. ४ तेज ५ निस्तेज. हततिवष. ६ थोडे अलंकार ज्यांच्या अंगावर आहेत अशा. ७ तेज प्रसरानें. ८ चंद्रसूर्यांना. ९ याचकांची तृप्ति. १० सन्मानार्थ उठतां. ११ आमचें दूध. १२ आपल्या मुखानें. १३ ऊर, स्तन, यांतील उत्प्रेक्षा फारच गोड आहे. १४ राजा दशरथ.

## ( २९ ) लावणी.

( चालः—या विषयाचे पाइ बुडाले कैक लक्षापती )

वसिष्ठ मुनिवर ह्मणे, " नृपाळा ! काय सांगु मीं तरी ।
पातला हरि कौसल्योदरीं ! ॥ धृ० ॥

भाग्य उदेलें तुझें सुकृतवान् धन्य वंश हा तुझा ।
जगाचा तुजहूनि झाला खुजा[2] ॥
अनंतजन्मीं परमात्म्याची तुलाचि घडली पुजा ।
पातला ब्रह्म तुझ्या हितगुजा ॥
वा ! दैवाचा तुला ह्मणावें असा न कोणी दुजा ।
पाहिला म्यां तुझ्या अजाचा अजा ॥
वा ! ब्रह्म आहे हें कौसल्येच्या कुशीं ।
वा ! तेज फांकलें अद्भुत हें तिजपाशीं ।
तूं बावनकशिला काय लावशील कशी ? ।
मज जन्म वाटतो सत्यचि नवमी दिनीं ।
गर्भ जाहला पूर्ण पातला रविमाध्यानावरी ।
समय हा गुलाल घ्यावा करीं ! !" ॥ १ ॥

—रामजोशी.

---

१ इक्ष्वाकु वंशांत परमात्म्याचा अवतार होणार ह्मणूनच वसिष्ठांनीं ' गर्हित च दूष्यजीवन ' असें पौरोहित्य पत्करलें होतें. २ ठेंगणा.

मधुमासे सिते पक्षे नवम्यां कर्कटे शुभे ।
पुनर्वस्वृक्षसहिते उच्चस्थे ग्रहपंचके ॥
मेषं पूषणि संप्राप्ते पुष्पवृष्टिसमाकुले ।
आविरासीज्जगन्नाथः परमात्मा सनातनः ॥ ७० ॥

—अध्यात्मरामायण.


उच्चस्थ ग्रहपंचकीं सशशिकीं जीवीं वसंतीं सितीं
श्रीचैत्रीं नवमीदिनीं दिनकरीं मेषाख्य राशिस्थितीं ।
लग्नीं कर्कटकीं पुनर्वसुयुती मध्यान्हकाळांतरीं
कौसल्या प्रसवे त्रिलोकपतिला आशारथाच्या वरीं ॥ ७१ ॥
पुष्यर्क्षी मीनलग्नीं प्रसवलि तनया केकयाधीशकन्या
आश्लेषर्क्षी कुलीरीं तनुजयुगळ ते श्रीसुमित्रा सुधन्या ।
केली सर्वामरांहीं प्रमुदितहृदयें तेधवां पुष्पवृष्टी
सन्दार्दे वाजवीलीं अनुपम घडली सृष्टिला तुष्टिपुष्टी ॥७२॥


—मोरोपंत.

---

श्रीरामरायाचा जन्म चैत्र शुद्ध ९ स मंगळवारीं, गृहपंचक उच्चस्थ असतांना मेष राशींत पुनर्वसु नक्षत्रावर कर्कलग्नीं झाला. २ दशरथाच्या. ३ लक्ष्मण आणि शत्रुघ्न यांच्या कुंडल्या रामाच्या कुंडल्यासारख्याच आहेत. ह्या कुंडल्याबद्दल विशेष माहिती तुळशीदासकृत रामायणांत वाचकांनीं जरूर पहावी.

**रामजन्मकुंडली** **भरतजन्मकुंडली.**




**दोहा:**—कौसल्यादिक नारि प्रिय सब आचरण पुनीत ।
पति अनुकूल प्रेम दृढ हरिपदकमलविनीत ॥ ७३ ॥
तब अदृश्य पावक भये सकल सभहि समुझाइ ।
परमानंदमगन नृप—हरष न हृदय समाइ ॥ ७४ ॥
योग लग्न ग्रह वार तिथि सकल भये अनुकूल ।
चर अरु अचर हर्षयुत रामजन्म* सुखमूल ॥ ७५ ॥

---

१ विझून अंतर्धान पावले २ मग्न ३ चराचर सकल सृष्टि

***कवित्त:**—समय वसंत मधुमास मुददायक त्यौं
शुक्लपक्ष पुण्यतिथि नौमि भौमवार है ।
प्रबल पुनर्वसु नक्षत्र दिनमध्य मिल्यौ
कर्क लग्न माँहि गुरुचंद्रको अधार है ।
तुलके जु मंद मंक्र मंगल सुमीन शुक्र
मेख रवि युक्त अभिषेक को प्रचार है ।
वृषके सुबुद्ध शुद्ध सकल मुहूरत—माँहिं
रानी कौसलाके लियो राम अवतार है ॥

सुरसमूह बिनती करी, पहुंचे[1] निज निज धाम ।
जगनिवास प्रभु परगटे अखिललोकविश्राम ॥ ७६ ॥
विप्र धेनु सुर संत हित लीन्ह[2] मनुजअवतार ।
निजइच्छानिर्मिततनु मायागुणगोपार[3] ॥ ७७ ॥
तब नांदीमुख श्राद्ध करि, जातकर्म सब कीन्ह[4] ।
हाटक[5] धेनु बसन मणि नृप बिप्रनकहँ दीन्ह ॥ ७८ ॥
व्यापक ब्रह्म निरंजन, निर्गुण विगत[6]विनोद ।
सो अज प्रेमभक्तिवश कौसल्या की गोद[7] ॥ ७९ ॥
प्रेममगन कौसल्या निशिदिन जात न जान ।
सुतसनेहवश मात सब बालचरित करि गान ॥ ८० ॥

—तुलसीदास

## ( ८१ ) पाळणा.

जो जो जो जो रे ! कुळभुषणा ! दशरथनंदना ! ।
निद्रा करी बाळा ! मनमोहना ! रामा ! लक्ष्मणा ! ॥ ध्रु० ॥
पाळणा लांबविला अयोध्येसीं ! दशरथाचे वंशीं ।
पुत्र जन्मला हृषिकेशी । कौसल्येचे कूशीं ॥ बाळा० ॥ १ ॥
रत्नजडीत पालख । झळके अमोलिक ।

---

१ आपापल्या स्थानाला जाऊन पोंचले. २ धारण केला. ३ मायागुण आणि गो म्ह. इंद्रियें यांच्या पलीकडचा. ४ केल ५ सोनें, गाई, वस्त्रें व रत्नें दशरथानें ब्राह्मणांना दिल्हीं. ६ हर्षशोकरहित ७ कडेवर.

वरती पहुडले कुळदीपक । त्रिभुवननायक ॥ बाळा० ॥ २ ॥
हालवी कौसल्यासुंदरी । धरुनि ज्ञानदोरी ।
पुष्पें वरुषतीं सुखरीं । गर्जति जयजयकारीं ॥ बाळा० ॥ ३ ॥
" विश्वव्यापका ! रघुराया ! । निद्रा करि बा ! सखया ! ये
तुजवरि कुरवंडी करुनीयां । सांडिन आपुली काया " ॥ बा० ॥ ४ ॥
येउनि वसिष्ठ सत्वर । सांगे जन्मांतर ।
" राम परब्रह्म साचार । सातवा अवतार ॥ बाळा० ॥ ५ ॥
याग रक्षुनियां अवधारा । मारुनि निशाचरा ।
जाशिल सीतेच्या स्वयंवरा । उद्धारि गौतमदारा ॥ बाळा० ॥ ६ ॥
पर्णिल जानकी सुरूपा ! । भंगुनियां शिवचापा ।
रावण लज्जित महाकोपा । नव्हे पण हा सोपा ॥ बाळा० ॥७॥
सिंधुजलडोहीं अवलीळा । नामें तरती शीळा ।
त्यावरि उतरोनी दयाळा ! । नेसिल वानरमेळा ॥ बाळा० ॥ ८ ॥
समूळ मर्दूनी रावण । स्थापिल बिभीषण ।
देव हे सोडवील संपूर्ण । आनंदेल त्रिभुवन ॥ बाळा० ॥ ९ ॥
ऐसीं चरित्रें अपार । करील मनोहर " ।
इतुकें ऐकोनी उत्तर । हांसले रघुवीर ! बाळा० ॥ १० ॥
राम भावाचा भुकेला । भक्ताधीन जहाला ।
दास विठ्ठलें ऐकिला । पाळणा गाईला ॥ बाळा० ॥ ११ ॥

—विठ्ठल कवि.

टळटळित दुपारीं जन्मला रामराणा
म्हणुनि सकळ गाती, ठाउकें हें पुराणा ।
दशरथ[1]गृहमाथां सूर्य आला अहो ! तो
कुलतिलक पहाया, तोचि मध्यान्ह होतो ।। ८२ ।।
[2]चित्त जो उप-समीपचि वासीं । राघवीं करिल तो उपवासीं ।
भक्तिवांचुनि दुज्या विषयातें । सेवितां सुख गमे विष यातें ।।८३।।
—वामनपंडित

# ४ बाललीला.

स्त्र० — बालक्रीडाप्रसंगीं रघुकुलतिलकें लक्ष्मणें सर्वदाही
क्रीडावें तोषवावें जनकजननितें बोबड्या बोलण्यांहीं ।
शत्रुघ्नाशीं सदाही नृपवर भरतें खेळगें, तोक[3] चारी
ऐसें भूपाळकातें[4] रमविति बहुधा लोकलीलानुकारी ।। ८४ ।।
शा० —भाळीं पिंपळपान रम्य विलसे संयुक्तमुक्तामणी,
कंठीं कृष्णरिठे मणी परि बरी शोभा दिसे भूषणीं. ।

---

१ दशरथाच्या घराच्या खरोखरच मध्यान्हावर भाग्यसूर्य आला होता. इक्ष्वाकुकुलांतील पुण्याचा रामावतारामुळें कळस झाला. २ नवमीला उपवास करायचा प्रघात आहे. उप म्हणजे समीप, वास म्हणजे वस्ति, अखंड अभेदरूप भावांत वास्तव्य करणें हाच उपवास होय ३ मुलें. ४ दशरथास.

मोठीं व्याघ्रनखें[१] सुहेमजडितें, माणिक्य[२]मुक्ताफळें
हस्तीं अंगद बिंदलीं मणगटीं जांबूनदें सोज्वळें ॥ ८५ ॥

कानीं सुंदर भोंकरें विलसतीं ते भीकबाळी बरी
वक्षीं शोभतिं पद्मरागपदकें जीं बाळसूर्यापरी ।
माजीं[३] सत्कटिसूत्र रम्य विलसे, त्या वागऱ्या वाजटा
वांकी तोडर पादुकांसि मिरवे, शोभा दिसे उद्भटा ॥ ८६ ॥

रथो० —बोबडे सरस बोल कोंवळे इंद्रनीलमणिकांति सांवळा
दंत मौक्तिक सुपंक्ति साजिरी शोभली वदनशुक्तिकांतरीं[५]॥८७॥

—निरंजन माधव.

धरूनियां रूपचतुष्टयाप्रती[६] । लिलामनुष्याकृति तो रमापती ।
भूभारनाशार्थ करूनियां पणें[७] । जाला जगत्पाळक बाळ आपण ॥८८॥

पीतां स्तनातें क्षणमात्र राहणें । महादरें मातृमुखासि पाहणें ।
वक्त्रांत तें दुग्ध तसेंचि वाहणें । तेणेंचि फूत्कार करूनि नाहणें ॥८९॥

मुखांतुनी दुग्ध गळे सुनिर्मळ । उरावरी ये अतिशुभ्र वेगळ ।
मंदाकिनीचा गगनीं प्रवाह तो । चंद्रप्रभापांडुर काय वाहतो ॥ ९० ॥

---

१ वाघनखें. २ रत्नें. ३ कमरेस. ४ सोन्याचा करगोटा. ५ मुखरूपी सिंपल्यांत. ६ चारही रूपें रामाचींच होत ७ ' संभवामि युगे युगे ' हें वचन ८ ओगळ हें रामाच्या बाललीलांचें वर्णन फार अप्रतिम असून काव्य व भक्ति यांचें उत्कृष्ट मिश्रण त्यांत साधलें आहे.

पीयूषगर्वापहमाधुरीधरा । त्रैलोक्यतापांतकरा सुखाकरा ।
निजाननें श्रीश रमामनोरमा । चुंबी पदा दीनजनावनक्षमा ॥ ९१ ॥
बैसोनि हर्षें जननीचियाकडे । विलोकुनी तन्मुखनीरजाकडे ।
स्मितामृतापूरित बोल बोबडे । बोले तदा ब्रह्मसुख स्वयें दडे ! ॥९२॥
रमाकुचाग्रीं पद जे विराजती । करांशि ज्या कल्पतरूहि लाजती ।
सदा तिहीं जेथ यथेष्ट रांगणें । केलें जनीं दुष्कर पुण्य आंगणें ॥९३॥
अत्यंतशुद्ध स्फटिकालयांतरीं । क्रीडा करी राम जधीं परोपरी ।
नाना सुतप्राप्तिसुखासि मावली । विलोकुनी तत्प्रतिबिंब पावली ॥९४॥
धात्री जई रामकरांबुजाप्रती । धरूनियां चालविती स्खलद्गती ।
चुंबी धरा तीं प्रभुपादनीरजें । अलभ्य ज्यांची दिविषज्जनां रजें॥९५॥
पित्यापुढें रत्नविराजि कंकणें । करें नमस्कार करूनि ठाकणें ।
धात्र्युक्त सारें निजवृत्त सांगणें ।अशा गुणें तो करि नाक ठेंगणें॥९६॥
भूपापरी सर्वहि तो सभाजन । याचें करी नित्यसुखें सभाजन ।
विलोकितां मर्त्यकृतावतारका । न लोचनीं हालति पक्ष्मतारका ॥९७॥

---

१ अमृताचा गर्व हरण करण्याइतकी गोडी ज्यांत आहे अशा 'पदाचें' विशेषण २ त्रैलोक्याचा ताप हरण करणाऱ्या ३ रमेच्याही मनाला रमविणाऱ्या ४ दीनांचें रक्षण करण्यास समर्थ अशा ५ कौसल्येच्या मुखकमलाकडे ६ मंजुस्मित हेंच अमृत ७ लक्ष्मीच्या वक्षस्थलावर ८ स्फटिकमय मंदिरांत ९ पुष्कळ प्रतिबिंबें पाहून मला पुष्कळ पुत्र आहेत असें तिला वाटलें १० अडखळत ११ प्रभुपदकमलें १२ देवांना ज्या पादकमलांचीं रजें दुर्मिळ आहेत. १३ रत्नांनीं खचित अशा १४ डौलानें उभें राहणें १५ दाईनें शिकवलेलें १६ स्वर्ग तुच्छ करी १७ कौतुक, लाड १८ पापण्या

आला चतुर्वर्ग[1] नृपालयीं स्वयें । चतुः कुमारात्ममिषेंचि निश्चयें ।
तुळा नसे भूपतिच्या सुखाप्रती।स्तवी सदा यांस मुखें दिवस्पती[2] ॥९८॥
रामासवें लक्ष्मण सर्वदा वसे । शत्रुघ्न तोही भरताश्रयीं असे ।
पूर्वी विभागक्रम जाहले जसे । द्वंद्वें सुखें वर्तति बंधु ते तसे॥ ९९ ॥
छाया तनूची तनुला न सोडी । त्या बंधुची एक तशीच जोडी ।
परस्परीं त्यांसि अपार गोडी । त्या मित्रभावा उपमाचि थोडी ॥१००॥

मोरोपंत—

# ५ विश्वामित्र गुरु.

असे बाळ भावी स्वमायाविलासें । जगाचे परी खेळ दावीत तोषें ।
पुढें प्राप्त कौमारकाळीं तयाला । पिता तो करी मौंजिबंधादिकाला
तयां वेदविद्या धनुर्वेदविद्या । महाशास्त्रविद्या सुशस्त्रास्त्रविद्या ।
गुरू[3] सर्व सांगे स्वविद्याश्रयाला[4] । कळा[5] सर्वही चित्कळापूर्ण त्याला ॥

सारि भोजन बंधुमित्रसुहृदीं सत् ब्राह्मणांचे गणीं[6]
सर्वां तोषवि दानमानविभवें[7] श्रीराम लोकाग्रणी ।
नाना शास्त्र-विचार-धर्म अवघे आणी मनीं सादरें
भूपातें अतियोग्य जे सुखद जे स्वर्गासि देती बरें ॥ १०२ ॥

—निरंजन माधव.

---

१ चार मोक्ष २ इंद्र ३ वसिष्ठ. ४ आत्मविद्येचा जो आश्रय त्याला. ५ विद्या चौदा व कळा चौसष्ट आहेत. ६ समुदायांत. ७ द्रव्य व सन्मा न यांच्या योगानें

तों आकस्मिक तीव्र सेवक सभाप्रांतीं नृपा वंदुनी
वार्ता सर्व निवेदिती द्रुतगती[1], गाधेय[2] आला मुनी ! ।
पायीं वाजति पादुका चटचटां, आपादमाथां जटा,
वाटे धूर्जटि[3] पातला, दशरथें तो देखिला भूतटा[4] ॥ १०४ ॥

## अश्वधाटी.

माला करीं, हृदयभालासि तें भसित[5], ज्याला मृगाजिन[6] कटीं,
लोलां[7] जटा रुळति डोलपरी, परम कोलाहलध्वनि[8] उठी; ।
लीला[9] असी ह्मणुनि नीलालका सुकृतशीला तयासि नमिती,
आला मुनी निजघराला ह्मणुनि मग झाला पुढें नरपती[10] ॥ १०५ ॥

—आनंदतनय.

नरेंद्र त्याची करुनी सपर्या[11] । ह्मणे, " अजी ! सर्व तपस्विवर्या !
भवत्पदांहीं मज धन्य केलें । समस्तही पाप लयास नेलें ॥ १०६ ॥

—मोरोपंत.

ऐसे श्रेष्ठ महानुभाव सदना येती अदृष्टें[12] जया
तेव्हां सर्वहि संपदा वरुषती त्या मंदिरीं स्वामिया ! ।

---

१धांवत येऊन. २विश्वामित्र. ३शंकर. ४पृथ्वीवर. ५भस्म, हृदय आणि कपाळ यांस लावलेलें. ६ कमरेला हरणाचें कातडें ७चंचल. ८ सभासदांमध्यें उडालेली गडबड. ९ हें त्या विरक्त तपस्व्याचें ऐश्वर्य पाहून. १० दशरथ त्याला सामोरा गेला. ११ पूजा. १२ पूर्वभाग्यानें

सांगावें करुणाघना ! कवणिया कार्यार्थ जी पातला ?
इच्छा जे तुमची करीन सहसा" राजा असें बोलला॥१०७॥
निरंजन माधव.

## दिंड्या

" ऐक राया ! सौभाग्यवनावाशा ! आह्मां काशासी दारधनीं आशा ! ।
काय योगी गुंतती मोहपाशा ? । जिहीं वरिल्या संपत्ति अविनाशा॥१०८॥
सौधसद्में आह्मांसि पर्णशाळा । स्फटिक रुद्राक्ष मुक्तमणीमाळा ।
भस्म अंगीं पीटीर योगियाला । उणें केंवी वैराग्यवैभवाला ? ॥ १०९ ॥
यज्ञ रक्षाया दक्ष तुझीं बाळें । राक्षसांतें शासितीं बाणजाळें ।
यागसिद्धी होईल शीघ्रकाळें । ऋषी होती संतुष्ट अळूमाळें ॥ ११० ॥

## उपजाति

आनंदतनय.

विण्मूत्ररक्तास्थिवसांत्रमाळा । वर्षोनियां दूषिति आश्रमाला ।
सदाहि विघ्नें करिताति होमीं । जालों असे पीडित फार हो मीं ॥१११
सभा ऋषींची बहु खिन्न होती । हंसी जसी काकगणीं अहो ! ती ।
खळांसि शापूनि करीन रक्षा । राया ! करितों परि पुण्यरक्षा ॥११२॥
ह्मणोनियां सानुज राम देणें । द्विजातिसंरक्षणपुण्य घेणें ।
प्राणांपरी रक्षिन यांस कांहीं । माझा कृपेनें भयलेश नाहीं !' ॥११३॥
मोरोपंत.

---

१ चुनेगच्ची वाडे. २ चदंन. ३ थोड्यानें. ४ विष्टा, मुत्र, रक्त, अस्थी, वसा व अंत्रमाळा

नरराज ह्मणे " दयानिधाना ! । कळलें सर्व मला मुनिप्रधाना[1] ! ।
यजनीं रजनीचरोत्थबाधा[2] । ममहस्तें शमवूनि कार्य साधा ॥ ११४ ॥

श्रमलों अनपत्यताविषादें[3] । बहुकाळें तुमच्या पदप्रसादें ।
मजला सुत चार मात्र जाले । परि ते कष्ट न आजुनी विजाले ॥११५॥

पडतां लवमात्र रामदृष्टी । मज होती अयुतामृताब्दवृष्टी[4] ।
क्षण एक न पाहतां अहो ! तें । मन वेडें बहु घाबरेंचि होतें"॥११६॥

मोरोपंत.

पायीं नमीं, देइन वंश सारा । पा यां न मी दे इनवंशसारा
न या वयामाजि भला जनां दे।'न' यावया मा जिभ लाज ना दे"।११७[5]

आनंदतनय

## मणिमाला

वाणी अशी ऐकोनियां तो गाधिज क्रोधाप्रती
आणी, मनीं तापे तदा और्व[6] जसा स्रोतःपती[7] ।

---

१ मुनिश्रेष्ठा २ राक्षसांकडून होणारा त्रास माझ्याकडून दूर करावा, ३ पुत्र नसल्यामुळें होणाऱ्या दुःखांत. ४ असंख्य अमृतपूर्ण मेघांचा वर्षाव. ५ दशरथ म्हणतो;— " मी पायां पडतो, सारा वंश ह्मणेज रविवंशांतलें सारे पुरुष देईन, पण मी ह्या इनवंशसारा म्हणजे सूर्यवंशांतील मुगुटमण्याला देणार नाहीं ह्या वयांत म्ह० म्हातारपणांत भला कांहीं मुलाला देणार नाहीं, म्हणून नाहीं म्हणायला माझी जीभ कचरत नाहीं !! " ६ वडवानळ ७ समुद्र

वंध्या[1] स्पृहा केली सुतस्नेहें जधीं भूवासवें[2]
संध्यासपत्नीशी[3] दिसे त्याची तनू दृष्टीसवें ! ॥ ११८ ॥
" राया तुझी पुत्रावरी माया असे भारी खरी
सर्वस्वदानोच्चारणें कां बद्ध केली वैखरी[4] ? ।
सूर्यान्वयीं तूंचीच ही सत्य प्रतिज्ञा पाहिली,
अद्यापि मी नाहीं कधीं ऐसी अवज्ञा साहिली ! ॥ ११९ ॥
जो काम तो झाला[5] नृपा । हो कामना तुझी तरी
लोकांतिदा[6] यांचा[7] अशी शोकावहा नोहे बरी ।
तोकांसि तूं देवूं नको, धोका नसो चित्तांतरीं,
ओकासि जातों, कां करूं स्तोकांमुळे[8] धी घाबरी ? ॥१२०॥
राया ! भला केला बरा सत्कार ! तूं साधू खरा ॥
जालों कृतार्थ क्षमावरा ! आतां सुखें जातों घरा ॥
पुत्रासवें पाळी धरा, धाको नको दिक्कंधरा
विप्रावनीं चिंता जरा पीडा नसे विश्वंभरा ! " ॥ १२१ ॥

—मोरोपंत

वसिष्ठ बोले ' न पडे अपायीं[9] । द्यावीं मुलें शीघ्र पडोनि पायीं ।
हा कोपल्या जाळिल लोक सारा। कां नेणसी भूपति! नीति सारा! १२२

---

१ निष्फळ २ पृथ्वीपति दशरथानें ३ संध्येच्या सवतीप्रमाणें; आरक्त ४ वाणी ५ तृप्त झाला ६ लोकांना त्रास देणारी ७ याचना ८ थोडक्या ९ संकटांत

पुत्र देई गाधियकरीं आधीं । समाधानें कार्यार्थ बहू साधी " ।
गुरुवाक्यें परिसोनि सर्व सांधी । कौशिकातें भूपाल समाराधी॥१२३

आनंदतय

## स्वागता

बाष्पगद्गद वदे नृप रामा । " सज्जनप्रियगुणा ! सुखधामा ! ।
कौशिकांघ्रियुगदास्य कराया ।लक्ष्मणासहित जा रघुराया ! ॥ १२४ ॥
जाणतोसि गुरुभक्ति कराया ! । सांगणें तुज नको रघुराया ! ।
सर्वथा करुनियां पदसेवा । तोषवी गुणनिधे ! क्षितिदेवा ॥ १२५ ॥
इष्टमित्रजननीजनकांहीं । जें सुता न दिधलें सुख कांहीं ।
तें यथेष्ट तुज देइल साचें । काम हे परि नसे अलसांचे ॥ १२६ ॥
आत्मतेज मुनि हा तुजमाजी । ठेवुनी मथिल राक्षसराजी ।
चंद्रमंडळिं जसा स्वकरांशीं । स्थापुनी रवि निशातम नाशी " ॥१२७

गुर्वाज्ञेनें नृप मुनिकरीं दे सुत प्राण दोघे
त्यांला अस्त्रें शत कथुनियां सद्यश प्राज्य तो घे
सांगे विद्या प्रथमचि बळा जी निवारी क्षुधेतें,
तृट्बाधाही मग अतिबळा लाजवाया सुधेतें ॥ १२८ ॥

---

१ त्याचा संतोष राखून २ आधि ह्म. चिंता तिनें ग्रस्त असा राजा ३ विश्वामित्राच्या पायाची सेवा करण्यास ४ आळसाचें हें काम नाहीं ५ ह्यांतील उपमा सर्वोत्कृष्ट आहे. सूर्य आपला प्रकाश चंद्रावर पाडून त्याच्या द्वारें रात्रीचा अंधकार नाहीसा करतो ह्याप्रमाणें विश्वामित्र आपलें तपस्तेज तुजमध्यें ठेवून तुझ्याकरवी राक्षसांचा संहार करील ६ पुष्कळ.

## आख्यानकी.

घेऊनियां सानुज राम हर्षीं । निघे पुरापासुनि तो महर्षी ।
चर्मी निषंगी कवची कृपाणी । सुखेंचि जाती शरचापपाणी ॥१३०॥
मार्गीं कथावेदपुराणसारा । कथूनि नाशी श्रमभार सारा ।
थोडीच चित्ताप्रति वाट वाटे । गुरूक्तिनें हर्ष मनांत दाटे ॥ १३१ ॥

मोरोपंत.

# ६ विश्वामित्रमखरक्षण.

:o:

ऋषी दाखवी ताटकारण्य रामा । "महा राक्षसी या वनीं घोरकामा ।
सदा विप्र भक्षी, वसे काळरूपा। वधीं पापिणी ते मदोन्मत्त बापा।१३२।
नसे दोष तूं जाण नारीवधाचा । निशाचारिणी प्राण घेते जगाचा ।
मदाज्ञें करी नाश ईचा, नुपेक्षीं, तुला सर्वदा वर्तणें देवपक्षी" ।१३३।

निरंजन माधव.

वार्ता ऐकति रामलक्ष्मण अशी तों धांवली कर्कशी
घोराकार, करालदंष्ट्रवदना[1], तद्दृष्टि बालार्कशी[2], ।
हाडांच्या अळुमाळ[3] डोलति गळां माळा, करीं कांबळा,
जिव्हा लोळतसे मुखीं ळळळळां, येते धरोनी बळा[4] ॥१३४॥

---

१ भयंकर आहे दांत आणि तोंड जिचें अशी. २ बालसूर्यासारखे लाल डोळे. ३ विचित्र, लहान मोठ्या. ४ अवसान.

लागतां हृदयिं बाण खणाणा । ताटका उलथलीच दणाणा ।
त्या ध्वनीस्तव रवींदु गळाले । यक्ष राक्षस पिशाच पळाले। १ ३ ५।

आनंदतनय.

ऋषी सांगे, " रामा ! बहु दिवस मीं येथचि असे,
तपें जाती सिद्धी ह्मणुनि पद ' सिद्धाश्रम ' असें
महर्षी ते हर्षे तप करित सानंद वसती
परंतु श्रीरामा ! निशिचरकुलध्वंस[1]वसती ॥ १३६ ॥

कुंजीं गुंजति पुंज पुंज अलिचें, मंजु ध्वनी गुंजती,
बर्ही ते नटती, कपोत घुमती, त्या कोकिला कूजती, ।
हंसादि द्विज झंकृती वृकशिवासिंहादिंच्या हुंकृती,
कुंभीं भीष्कृति, सर्प फूत्कृति, वनीं तैशाच नाना[2]कृती ! ॥१३७॥

येति संघ बहु पापजडांचे । देख हे ढिग अनेक हडांचे ।
भक्षिलीं द्विजकुळें अवलोकीं । राक्षसी कपट कृत्रिम लोकीं १३८

आनंदतनय.

बोले राघव आश्रमीं ऋषिवरा, " घ्या यज्ञदीक्षा बरी,
दावावे कपटी महाबळनिधी दैत्याधमां लौकरी, " ।
संतोषें मुनिनायकें मखवरा आरंभ केला तदा
आले राक्षस घोररूप जडधी जे विघ्नकर्ते सदा ॥ १३९ ॥

---

१ सर्वांचा नाश करणारे राक्षस येथें राहतात. २ सिद्धाश्रमाचें हें गोड वर्णन वाचनीय आहे

ते मारीचसुबाहुनामक मखद्वेष्टे मुनीभक्षिते
नाना रक्त अमेध्य[1] मांसमळ ते अस्थी शिरा वर्षते ।
त्यांतें देखुनि रामचंद्र धनुषीं योजोनि बाणद्वया
सोडी लक्षुनि ते क्षणींच सहसा नेला सुबाहु क्षया ॥ १४० ॥

मारीचा शतयोजनें उडविले, टाकी जळीं सागरीं
त्याचे सैनिक मारिले सकळही ते लक्ष्मणें संगरीं ।
संतोषोनि सुरेंद्र तैं वरुषती पुष्पें विचित्रें शिरीं
जाला यज्ञ समाप्त, विघ्न हरलें, निश्चित विप्रा करी ॥ १४१ ॥

निरंजनमाधव.

## ७ अहल्योद्धार.

### साकी.

विश्वामित्रें प्रावृट्काळें करुणामेघश्याम[2] ।
गौतमजायामरुभूमिप्रति आणियला अभिराम ॥ १४२ ॥

" इंद्रें[3] छाळिली सती पतीनें कोपें दिधला शाप ।
झाली शिळा सुशीला, आतां वारावे संताप ॥ १४३ ॥

---

१ अपवित्र. २ विश्वामित्र हा पावसाळा, राम हा करुणामेघ, गौतमजाया ही मारवाडभूमि. ३ हें विश्वामित्राचें भाषण आहे.

प्रायश्चित्तें जळतीं पापें, मूळवासना राहे ।
ते ही भस्म करावी हें बळ तुझिया चरणीं आहे ! ॥ १४४ ॥
त्रिभुवनवंद्यपदा ! साध्वीतें दे पादांबुजसंगा ।
हे पद तापविनाशक साचे यांचो कन्या गंगा ॥
आतां ऊठ उदारा ! । तारी गौतमदारा " ॥ १४५ ॥
राम ह्मणे, " गुरुराया ! हे कीं साध्वी मुनिची भार्या ।
पाय कसा लावावा ? माझी माता तैसी आर्या ! ।
वाटे संकट हे प्राज्ञा । कैसी लंघावी आज्ञा ? " ॥ १४६ ॥
विश्वामित्र ह्मणे, " वा रामा ! ईतें ह्मणसी माय ।
माय न सुख लोकीं पुत्राचा जरिही लागे पाय" ॥ १४७ ॥

मोरोपंत.

पादस्पर्श करूनि जों निरखिली तैं ते शिळा कापली,
कांहींशी मग हालली, उलटली, नारी तशी भासली! ।
तेंव्हां ती बसली, अशीच दिसली, चीरांबरें नेसली,
लज्जाधोमुख होउनी सुनयना वेगीं उभी राहिली ॥ १४८ ॥
हर्षें त्या मुनिनायिकापदयुगा श्रीराम वंदोनियां

---

१ प्रायश्चित्तानें अन्य पापें जळतात पण वासनाबीज राहतें, तें भगवत्पाद-सेवनानें जळून जातें २ पुढील सवाद मोठा मजेचा आहे. ३ प्रथम नुस्ती कांपली, मग हालली. जडत्व जात जात जाते. ४ लज्जेनें तोंड खालीं घेऊन. ५ गौतमस्त्री अहल्याइचे पाय वंदून.

बोले ' दाशरथी ' असें विनवुनी संदेश सांगे तिया ।
" झालों धन्य, सुलाभ आजि घडला, माते ! तुला देखिलें "
ऐसीं राघवभाषणें परिसतां आश्चर्य तें मानिलें ॥ १४९ ॥
दूर्वादलश्यामल राघवातें । संपूर्णचंद्राननसुंदरातें ।
धनुर्धरातें करुणाकरातें । पुन्हा विलोकी परमार्द्रचित्तें ॥१५०॥
आनंदबाष्पाकुलचारुनेत्रा । सुस्वेदरोमांचितभव्यगात्रा ।
नमी पदांभोरुह भक्तिभावें । अत्यादरें प्रेमवती स्वभावें॥१५१॥

निरंजनमाधव

## आर्या

झाडी केशांनीं प्रभुचरण ध्याती शिवादि सुर ज्यांतें, ।
गोळा करूनि पदरीं सादर बांधी नमूनि सुरजांतें ॥ १५२ ॥
प्रक्षाळूनि प्रभुच्या चरणांतें तीर्थतोय सांचविलें ।
माथां वाहुनि केलें प्राशन, पात्रीं न लेश वांचविलें ॥१५३॥
" बापा ! पापाचळपविपदरेणो ! मी असी कुधी कुलटा ।
विश्वगुरो! त्वां केला प्रथम नमस्कार मज कसा उलटा?॥१५४

१ आपलें नांव दाशरथि असें सांगून आपल्या कुळाचा इतिहास सांगितला २ तिनें मानलें. ३ दूर्वादळाप्रमाणें सांवळी मूर्ति. ४ पूर्णिमेच्या चंद्राप्रमाणें सुंदर अशा. ५ आनंदाश्रूनीं भिजले आहेत सुंदर डोळे जिचे. ६ अंगाला घाम सुटून सात्विक भक्तिप्रेमामुळें रोमांच उभें राहिले आहेत जिच्या अंगावर. ७पादकमलें. ८ पायाच्या धुळीच्या कणांस. ९ पापरूपी पर्वताचा नाश करण्यास वज्राप्रमाणें समर्थ असे पादरज. १० दुष्टबुद्धीची ११ भ्रष्ट.

प्रायश्चित्तें जळतीं पापें, मूळवासना राहे।
ते ही भस्म करावी हें बळ तुझिया चरणीं आहे ! ॥ १४४ ॥
त्रिभुवनवंद्यपदा ! साध्वीतें दे पादांबुजसंगा।
हे पद तापविनाशक साचे यांची कन्या गंगा ॥
आतां ऊठ उदारा ! । तारी गौतमदारा " ॥ १४५ ॥
राम ह्मणे, " गुरुराया ! हे कीं साध्वी मुनिची भार्या।
पाय कसा लावावा ? माझी माता तैसी आर्या ! ।
वाटे संकट हे प्राज्ञा । कैसी लंघावी आज्ञा ? " ॥ १४६ ॥
विश्वामित्र ह्मणे, " बा रामा ! ईतें ह्मणसी माय।
माय न सुख लोकीं पुत्राचा जरिही लागे पाय" ॥ १४७ ॥

मोरोपंत.

पादस्पर्श करूनि जों निरखिली तैं ते शिळा कापली,
कांहींशी मग हालली, उलटली, नारी तशी भासली! ।
तेव्हां ती बसली, अशीच दिसली, चीरांबरें नेसली,
लज्जाधोमुख होउनी सुनयना वेगीं उभी राहिली ॥ १४८ ॥
हर्षें त्या मुनिनायिकापदयुगा श्रीराम वंदोनियां

१ प्रायश्चित्तानें अन्य पापें जळतात पण वासनाबीज राहतें, तें भगवत्पाद-सेवनानें जळून जातें २ पुढील सवाद मोठा मजेचा आहे. ३ प्रथम नुस्ती कांपली, मग हालली. जडत्व जात जात जातें. ४ लज्जेनें तोंड खालीं घेऊन. ५ गौतमस्त्री अहल्याइचे पाय वंदून.

बोले ' दाशरथी ' असें विनवुनी सद्वंश सांगे तिया ।
" झालों धन्य, सुलाभ आजि घडला, माते ! तुला देखिलें "
ऐसीं राघवभाषणें परिसतां आश्चर्य तैं मानिलें ॥ १४९ ॥

दूर्वादलश्यामल राघवातें । संपूर्णचंद्राननसुंदरातें ।
धनुर्धरातें करुणाकरातें । पुन्हा विलोकी परमार्द्रचित्तें ॥ १५० ॥
आनंदबाष्पाकुलचारुनेत्रा । सुस्वेदरोमांचितभव्यगात्रा ।
नमी पदांभोरुह भक्तिभावें । अत्यादरें प्रेमवती स्वभावें ॥ १५१ ॥

निरंजनमाधव

## आर्या

झाडी केशांनीं प्रभुचरण ध्याती शिवादि सुर ज्यांतें, ।
गोळा करूनि पदरीं सादर बांधी नमूनि सुरजांतें ॥ १५२ ॥
प्रक्षाळूनि प्रभुच्या चरणांतें तीर्थतोय सांचविलें ।
माथां वाहुनि केलें प्राशन, पात्रीं न लेश वांचविलें ॥ १५३ ॥
" बापा ! पापाचळपविपदरेणो ! मी असी कुधी कुलटा ।
विश्वगुरो ! त्वां केला प्रथम नमस्कार मज कसा उलटा ? ॥ १५४

---

१ आपलें नांव दाशरथि असें सांगून आपल्या कुळाचा इतिहास सांगितला २ तिनें मानलें. ३ दूर्वादळाप्रमाणें सांवळी मूर्ति. ४ पूर्णिमेच्या चंद्राप्रमाणें सुंदर अशा ५ आनंदाश्रूनीं भिजले आहेत सुंदर डोळे जिचे. ६ अंगाला घाम सुटून सात्विक भक्तिप्रेमामुळें रोमांच उभे राहिले आहेत जिच्या अंगावर. ७ पादकमलें. ८ पायाच्या धुळीच्या कणांस. ९ पापरूपी पर्वताचा नाश करण्यास वज्राप्रमाणें समर्थ असे पादरज. १० दुष्टबुद्धीची ११ भ्रष्ट.

शाप न अनुग्रहचि हा ! ह्मणुनिच तुज बा! महायशा पाहे ।
दूषित असेल गुरुला[1] दंडा, संकोच काय? शापा[2] हे ॥ १५५॥
जे पाय मायबाप ब्रम्ह्याचे, दृग्द्वयें[3] रमा तृषितें ।
प्राशी ज्यांसि, मिळाले कैसे ते श्वशुर गौतमाऋषितें? ॥१५६
तूं बाप आजपासुनि मी कन्या हें तुझ्यापदीं नातें ।
नांदो दे, दाशरथे ! त्वां क्षणहि अव्हेरिलें न दीनातें ॥१५७॥
ज्याच्या एकेंचि रजें मी धन्या, हे असे जिला पाय ।
लागति, वर्णू एका जिव्हेनें भाग्य भूमिचें[4] काय ! " ॥१५८॥

मोरोपंत

## कुटिलगति

" जय जगदीश्वरा ! दीनबाधाहरा !
रघुकुलशेखरा ! कार्यमायानरा![5] ।
त्रिभुवनपावना ! भक्तलोकावना !
नमन असो तुला सज्जनाच्या धना[6] ! ॥ " ॥१५९ ॥
" नमोस्तु ते राम तवांघ्रिपंकजं ।
श्रिया धृतं वक्षसि लालितं प्रियात् ।
आक्रांतमेकेन जगत्त्रयं पुरा ।
ध्येयं मुनींद्रैरभिमानवर्जितैः ॥ १६० ॥

---

१ मोठा दंड करा २ मला शापदग्ध करा, ३ दोन्ही डोळ्यांनी, ४ भरतभूचें भाग्य काय वानूं? ५ कार्यासाठीं मनुष्यदेह घेणाऱ्या, ६ तूं सज्जनांचें सर्वस्व आहेस!

देव मे यत्रकुत्रापि स्थिताया अपि सर्वदा ।
त्वत्पादकमले सक्ता भक्तिरेव सदास्तु मे ॥ १६१ ॥
नमस्ते पुरुषाध्यक्ष ! नमस्ते भक्तवत्सल !
नमस्तेस्तु हृषीकेश ! नारायण ! नमोस्तु ते ॥ १६२ ॥
यत्पादपंकजरजः श्रुतिभिर्विमृग्यं
यन्नाभिपंकजभवः कमलासनश्च ।
यन्नामसाररसिको भगवान्पुरारि-
स्तं रामचंद्रमनिशं हृदि भावयामि " ॥ १६३ ॥

अध्यात्मरामायण.

' अहल्या शिळा राघवें मुक्त केली ' । जडत्वासि टाकूनियां दिव्य झाली ।
रघुनायकें आणिलें गौतमाला । अहल्याकरीं घातली पुष्पमाळा ॥ १६४ ॥

अनंतकवि

---

# ८ सीतास्वयंवर

कुटिलगति

मुनिवर[1] एकदा राघवाला ह्मणे,
" रविकुलभूषणा ! वीरचूडामणे !
मज जनकें मखप्रेक्षणा[2] बाहिलें
ह्मणुनि कर्म तें पाहिजे पाहिलें ! ॥ १६५ ॥

---

[1] विश्वामित्र. २ यज्ञ पाहण्यास जनकराजानें मला बोलावलें आहे.

स्मरहर[1]चाप आहे तयाच्या घरीं
करिल तयास जो सज्ज, त्याच्या करीं ।
' निजतनया समर्पीन मी आपण; '
असु[2]कर फार केला असे हा पण " ॥ १६६ ॥

## नवनंदिनी

रघुनंदनासहित तो मिथिलेला । द्विजवृंद घेउनि मुनीश्वर गेला ।
मग भूप तो सह[3]पुरोहित आला । करि पूजुनी मुदित गाधिसुताला ॥ १६७

मोरोपंत.

तदुपरि मु[4]नि सांगे; " राज्य यांचें अयोध्यें,
कुमर दशरथाचे, वीर हे चंड योद्धे, ।
दिन[5]कर कुळ यांचे, शिष्य होती वसिष्ठा,
क[6]राणि रघुपतीची आइके श्रीव[7]रिष्ठा ॥ १६८ ॥

राखिला मख रघूत्तमें बरा । ताटिका उडविली दिगंतरा ।
शापिलें निजकलत्र गौतमें । तारिलें पदरजें रघूत्तमें! ॥ १६९ ॥

राया ! तारक ब्रह्म चि[8]द्धन तुतें भेटावया आणिला,
विष्णूचा अवतार सप्तम तुवां भाग्योदयें देखिला ! ।

---

१ शंकराचें धनुष्य. २ दुर्घट. ३ पुरोहितासह सत्कार करण्यास आला. ४ विश्वामित्रानें जनकास रामचरित्र सांगितलें. ५ सूर्यवंश. ६ पराक्रम ७ संपन्न जनका ! ८. सच्चिदानंद राम.

याचा बंधु सुमित्र यासम सखा शेषावतारी स्वयें ।
दोघे वीर पराक्रमी त्रिभुवनामध्यें बळी निश्चयें " ॥ १७० ॥
रामरूप नयनीं विसांवलें । अंतरीं बहुत हो! ठसावलें ।
तों वदे जनकभूप आपणा । ' व्यर्थ म्यां धनुष योजिलें पणा!' ॥१७१॥

विठ्ठलकवि.

केली रंगसुरंग भूमि जनकें, संमार्जिली कुंकुमें,
गोपद्मावरि पंचरंग मिरवे श्रीस्वास्तिकें कौसुमें, ।
भूपूजा विधिवेदपूर्वक किजे अर्चूनियां भूभुजें,
तेथें कार्मुक ठेविलें, मग ह्मणे उद्बाहु वक्रांबुजें ॥१७२॥

विठ्ठलकवि.

चिद्भाग्यें अथिला विदेह मिथिलभूपाळ भूपावली
पाचारूनि, विचारुनी मनिं, कथी साचार वाचावली; ।
" जो हें त्र्यंबकचाप भूप उचली, त्या आपुली कन्यका
केली अर्पण हे समर्पक वरा, हो नोवरा जो निका॥१७३

आनंदतनय.

त्रिशंत गण शिवाचे सत्वरें त्या धनुष्या ।
उचलिति, न ढळें तें अन्य देवां मनुष्या ।

---

१. बळवंत. २रामरूप पाहून धनुष्य पणास लावल्याबद्दल जनकास वाईट वाटलें. ३. स्वयंवरास योग्य अशी सुशोभित. ४. फुलांचीं. ५. पृथ्वीची पूजा. ६हात वर करून. ७. ज्ञानभाग्यानें संपन्न. ८जनक, ९योग्य वराला. १० तीनशें.

तिहीं बहुबहु कष्टें ठेविलें चाप रंगीं ।
दचंकाति नृप सारे देखतां अंतरंगीं ॥ १७४ ॥

वामनपंडित.

मत्तेभ, मल्ल, हय, बैल, हेले, धनुष्या
लावूनि ओढिति बळें, न ढळे मनुष्यां ।
गाड्यासि त्यासि दृढ बांधुनि चारि नोंडे
आकर्षिती धरुनि हर्ष ह्मणोनि नांडे ॥ १७५ ॥

गाडा ओढिति ' बाँप ! बाप ! ' ह्मणुनी, तें चाप सापापरी
धापा देत नृपाळही उतरले भूपांत नानापरी ।
राजे देखुनि दंग भंगति मनीं; ' सारंगनेत्री कशी
होते लभ्य ? ' ह्मणोनि सभ्य वदती, राजा बलातें कशी ' ॥ १७६ ॥

आनंदतनय.

राजे अंग, कलिंग, वंग, मगध, द्रावीड, कर्नाटकी,
गौडश्चौल, निषाद; बर्बर, महा कांबोज, बंगालिकी, ।
पाहे लाट, विराट, मालव, महाराष्ट्र प्रभू देशिचे,
गौडी, काउर, मारवाड, नृपती नेपाळ पांचाळिचे॥ १७७ ॥

विठ्ठल कवि.

अत्युद्दाम भले भले क्षितिपती रायें पणीं गोविले,
मानें आदरिले, सभे बसविले, ठेले बिले नेविले ।

---

१ पाहतांच भयभीत झाले. २ मत्त हस्ती. ३ रेडे. ४ दोर. ५ न भ्याले.
६ बाप ह्म० मोठे ७ मृगनयना. ८ कसास लावी.

ज्ञानें पूर्ण अगाध गाधिसुत तो वेधा[1] जसा बैसला
पाठीं तो ऋषिथाटें दाट नटला[2] पद्मासनीं बैसला ॥ १७८ ॥

आनंदतनय.

उपरिवरि[3] मृगाक्षी भूभुजांतें निरीक्षी
कर धरुनि सखीचा ‘ कोण कैसा ’ परीक्षी ।
‘ सहचरि ! मज दावी कीर्ति विख्यात राजे
प्रगट गुण निरूपीं ! कोण कैसा विराजे ॥ १७९ ॥

विठ्ठल कवि.

## १८० ( पद )

‘ कोण तूझ्या मनासि येतो, सांग हो सीते ! ’ ॥ धृ० ॥ !
‘ पैल कुसुंबी दुस्तरें[5] ल्याला ? ’ । ‘ बाई तो काय नव्हे’ ॥
‘ पांघुरला नवरंग दुशाला ?’ । ‘बाई ! तो काय नव्हे ॥’
‘ विड्या देत हुँडपेकर[6] ज्याला ?’ । ‘ बाई ! तो काय नव्हे. ’ ॥
‘ माथां मंदिल झळकत शेला ?’ । ‘बाई ! तो काय नव्हे’ ॥१॥

---

१ ब्रह्मदेव. २ रामलक्ष्मण विश्वामित्राच्या पाठीशीं ऋषिमंडळांतच बसले होते ३ माडीवर. ४ पुढील उत्कृष्ठ पदांत विविध राजांचें वर्णन आनंदतनय यानें खुबीनें केलें आहे, तें वाचून कालिदासाच्या रघुवंशांतील सहाव्या सर्गांतल्या इंदुमतीच्या स्वयंवराचें संस्कृतज्ञांस स्मरण होईलच. इंदुमतीची सखी सुनंदा होती, ती पुंवत्प्रगल्भा ह्मणजे पुरुषाप्रमाणें धीट व बोलकी आणि श्रुतवृत्तवंशा म्हणजे सर्व राजांच्या घराण्याची माहिती असलेली अशी होती. ५ तो पलीकडचा कुसुंबी वस्त्र धारण करणारा काय ? ६ विडे देणारा हुजऱ्या.

‘ तोरा बहुवस पैल तुऱ्याचा ?’ । ‘ बाई ! तो काय नव्हे
‘ मनोहराकृति मदन वयाचा ?’ । ‘ बाई ! तो काय नव्हे ’ ॥
‘ त्याला पोशाक कंदर्पाचा ?’ । ‘ बाई ! तो काय नव्हे ’ ॥
‘ अभिनव कंकण हस्त जयाचा ?’ । ‘ बाई ! तो काय नव्हे ’ २
‘ पद्मासनिं करिं धरुनि कटारीं ?’ । ‘ बाई ! तो काय नव्हे ’ ॥
‘ त्याला बारिक दस्त दुतारी ?’ । ‘ बाई तो काय नव्हे ’ ॥
‘ गौर धराधिप त्या शेजारी ?’ । ‘ बाई ! तो काय नव्हे ’ ॥
‘ दिक्करिसा[1] नृप दोंदिले[2] भारी ?’ । ‘ बाई ! तो काय नव्हे ’ ३
‘ तो ऋषिमंडळिं दिव्य धनुर्धर ?’ । तेव्हां नं[3] ह्मणे नव्हे ॥
‘ मेघःशाम श्रीराम मनोहर ?’ । तेव्हां न ह्मणे नव्हे ॥
‘ दाशरथी नृपराज धनुर्धर ?’ । तेव्हां न ह्मणे नव्हे ॥
‘ आनंदात्मज पूर्ण परात्पर ?’ । तेव्हां न ह्मणे नव्हे ॥ ४ ॥
‘ बाणली निजखूण तन्मय तुझी गे सीते !’ ॥

आनंदतनय.

---

१ हत्तीसारखा. २ मोठ्या पोटाचा ३ सीतेची वृत्ति तन्मय होत चालली होती. सखीचा प्रश्नच तिच्या कानांत जाऊं शकत नव्हता! प्रत्यक्ष रामाचें दर्शन झालें नसतें तोंपर्यंत ‘बाई तो काय नव्हे गे ’ ह्मणजे नेति नेति ’ ह्याप्रमाणेंच. भाषा येते, पण दर्शनसाक्षात्कारादि होतांच ‘ तेव्हां न ह्मणे नव्हे ’ ह्मणजे ‘ यतो वाचो निवर्तन्ते ’ हीच स्थिति सद्भक्ताची होते !! सीता ह्मणजे राम परमात्म्याची पूर्ण भक्त होती व त्यांचा विवाह ह्मणजे जीव-परमात्म्यांचें ऐक्य होय ! !

निर्धनासि धन जेंवि सांपडे । जानकीस नयनीं तसा पडे ।
अंतरीं मदनमूर्ति रंगली । बाह्यदृष्टिसि समाधि लागली ! ॥१८१॥
देखतां विकळरूप[1] धारणा । घालिती सहचरी समीरणा[2] ।
बाह्य चंचळ पदार्थ वर्जिले । नेत्रपद्म उदकें समार्जिले[3] ॥ १८२ ॥

विठ्ठल कवि.

लज्जावती फार तथापि त्याची
शंका न सीता धरि हो पित्याची ।
ह्मणे, 'अहा तात ! अशा पणातें
केलें तुवां संकट आपणातें !' ॥ १८३ ॥
'बहु कठोर' ह्मणे 'धनु' जानकी
'निकट कांसवपृष्ठसमान[1] कीं ।
रघुपती तरि हा लघु आपण
अहह ! दारुण तात तुझा पण' ॥ १८४ ॥

वामन पंडित.

'रघुपतिजलधीतें मी नदी जाण वाहे
जननिजनककानीं गूज हो! जाणवा हें' ।

---

१ सीतेची तन्मयता झाल्यामुळें, 'मी तूं पणाची' धारणा विकळ झाली अर्थात् तिचें देहभान गळालें. २ मैत्रिणी वारा घालूं लागल्या. ३ डोळ्यांला पाणी लावलें. १ हें धनुष्य तर कांसवाच्या पाठीसारखें कठोर आहे, व राम तर बालमूर्ति आहे !

सखि ह्मणति, ' धरीते बुद्धि हे तुज सीते !
पुरविल परमात्मा बुद्धि हेतू जसी ते !' ॥ १८५ ॥

आनंदतनय.

हेमाद्रीवरी[1] हेमनिर्मित जशा संफुल्ल[2] वल्ली भल्या
तैशा आभरणीं[3] अपार तरुणी सौधांगणीं[4] शोभल्या ।
मध्यें कल्पकवेल्लरीसम[5] दिसे शीतांशुबिंबानना[6]
सीता शीलवती शुभा नृपसभा लक्ष्मी जनाकानना[7] ॥१८६ ॥

' पाहीन डोळां नवरी वराया । आणा ' ह्मणे रावणराव राया
विदेह 'बोलें जिणतां पणातें । वरील ते आपण आपणातें !'॥१८७॥

आनंदतनय

बंदी निर्जर घातले, भुजबळें कैलास आंदोळिला,
ब्रम्ह्याचा पणतू, चहुंश्रुतिवरी भाष्यार्थ जो बोलिला, ॥
केला देशधडी कुबेर, हरिली लंका समुद्रोदरीं,
चामुंडा परिचारिका[10], अनुकुला स्त्रीरत्न मंदोदरी ॥ १८८ ॥

तो दशकंठ अकुंठ[11] विसां भुजिं तें विषकंठ धनू उचली, ।
कष्टत कोष्टवरि[12], द्विजओष्ठहि[13] चावुनि, ज्या जरि ने खचली[14] ।

---

१ सुवर्णपर्वतावर २ फुललेल्या. ३ अलंकारांनीं नटलेल्या. ४ राजवाड्याच्या अंगणांत. ५ कल्पलतेसारखी. ६ चंद्रमुखी. ७ जनरूप अरण्यास ८ या श्लोकांत रावणाचा उन्मत्तपणा व जनकाचा बाणेदारपणा स्पष्ट दिसतो. ९ देव. १० देवी ही दासी. ११ निर्भयपणाच्या तोऱ्यानें. १२ मनगटापर्यंत. १३ दांत ओठ चावून. १४ जरी नेली तरी खचली.

चाप उरीं दडपे, झडपे, मग आननपंक्ति धेरे रचली ।
वासुनि दांत मुखांत दहांत पडे, मति गाढतमीं पचली ! ॥ १८९ ॥

---वामनपंडित.

ओकी रक्त भडाडुनी दडपतां वक्षःस्थळाची फळी,
सर्वांगें ढकली, न लेशहि ढळे, भूमी भुजा आफळी ।
शेखीं देखुनि अप्रयत्न, जनकें दीर्घप्रयत्नें दया
केली, ओढुनि काढितां शिवधनु देखे स्वभाग्योदया ! ॥१९०॥

आनंदतनय.

ह्मणे विश्वामित्र स्वमानिं, ' सकळांचे भरंवसे ।
कळों आले; आतां मजजवळि विश्वंभर वसे, ' ।
तया या श्रीरामाविण जनकजा अन्य न वरी ' ।
ह्मणोनी बोले कीं ' उठ रघुपती ! साधे नवरी ' ॥ १९१ ॥

श्रीराम तेव्हां मुनिपादपद्मा । वंदी, जयाचे स्वपदींच पद्मा ।
' आज्ञा गुरूची, ह्मणऊनि 'साची । करीन' बोलोनि, उठे तसाची १९२

वामन पंडित.

झाले दंग नृपालपुंगव सभेमध्यें तदा आवघे
आश्चर्य स्तविती, कितेक नमती, कोणी न तो आवँ घे, ।
ओढीना, न झडी धरूनि तुळवी कोणी, न तोली बरा,
निःसंदेह विदेह गर्जुनि ह्मणे, 'निर्वीर झाली धरा! ' ॥१९३॥

आनंदतनय.

---

१. स्वाधीन करून घे. २ लक्ष्मी. ३. श्रेष्ठ राजे. ४. धाडस.

मुनी ह्मणे, ' रघूत्तमा ! नृपा घरीं वसे रमा ।
असेल जो रमापती वरील त्यास ते सती !! ' ॥ १९४ ॥

शोभतो बहुत रामकेसरी । कोण आणिक करूं सके सरी ! ।
भासमान बहु तेज आगळें । त्यापुढें सकळही अजागळें ॥१९५॥

नागेशकवि

छाँवा उठे दशरथप्रभुदिग्गजाचा
घे चाप इक्षुसम तें पति भंर्ग ज्याचा ।
शुंडा स्वबाहु उचलोनिच चालिला हो
घेती समस्त नयनीं प्रभुचाचि लाहो ॥ १९६ ॥

श्रीमद्राघवहस्तपद्मगुण ये कर्णांत हा जेधवां ।
मोडे हें भवचाप, अर्थ इतुका दावी जगीं तेधवां ।
कीं श्रीरामकरारविंदगुणही कर्णांत येतां, स्वयें ।
मोडे हें भवसायकासन, असा भावार्थ हा निश्चयें ! ॥ १९७ ॥

वामनपंडित.

सीतेला स्मरसा, धनूसि हरसा, राजा दिसे वीरसा,
मूढांला नरसा, जनां नृवरसा, भक्तांसि माहेरसा; ।

---

१ ह्यां विश्वामित्राच्या उद्गारांत खोंच आहेच २ बरोबरी, ३ सर्वाधिक ४ लहान हत्ती ५ शंकराचें धनु इक्षुदंडासारखें लीलेनें घेतलें. ६ लाभ; छंद ७ चापासारखा हा प्रपंच वांकडा आहे, पण रामकरकमलाचे गुण कर्णांत शिरतांच प्रपंचाचें निरसन होतें. ८. मदनासारखा, ९. शंकरासारखा, १०. राजासारखा.

देवां ईश्वरसा, रिपूंसि गरसा, ज्ञात्यांसि चित्सारसा;
ऐसा सर्वरसांसि हेतु परिसा, जो सूर्य हृत्सारसा ॥ १९८ ॥

आनंदतनय.

सीता श्रीरघुवीर धीर नयनीं देखोनि आनंदली,
हातीं घेवुनि माळ बाळहरिणी नेत्रापुढें पातली, ।
देवर्षीनृपसूर्यसाक्ष धरणी लोकीं सभा दाटली,
हर्षें ते समयीं रघूत्तमगळां माळा निकी घातली ॥ ४ ॥ १९९

संतोषें वैरपत्रें कौशिकमुनी धाडी नृपाधीश्वरा,
" आहे पुत्र तुझा बरा नृपवरा श्रीराम तो साजिरा ।
केला अध्वर सिद्ध, पावन तशी मार्गीं अहिल्या सती
झाला या मिथिलेंत शंकर धनू भंगोनि सीतापती ॥ २०० ॥

" यावें सपुत्रबळवाहनपट्टराणी
सामंतसैनिकसबांधव शस्त्रपाणी ।
विप्रेंद्रमुख्य अतिसत्वर लोकनाथा!
यावें विवाहकरणीं मिथिलेस आतां " ॥ २०१ ॥

पूजी सुराधिप तयासि कुबेर जैसा
स्नेहाधिके दशरथासि विदेह तैसा ।

---

१. विषासम २. हृदयकमळाला विकासवणारा सूर्य. ३ वरपक्षाला आमंत्रण ४ यज्ञ. ५ पुत्र सैन्य, घोडे, व राण्या यांस घेऊन

अर्चो विधी विहित जाणुनि तो उदार
जो तुल्यशीलगुणवीर्यधनें अपार ॥ २०२ ॥

निरंजनमाधव.

उत्तेरा फाल्गुनी तारका त्या दिनीं । लग्न निर्धारिलें मध्यमे यामिनीं ।
सूर्यवंशावळी श्रीवसिष्ठ मुखें । वर्णिली तेधवां भूपतीसन्मुखें ॥ २०३ ॥

नांदीश्राद्धविधान देवक नृपें संस्थापिलें मंडपीं
गोदानें वसनें धनें जनक दे रत्नें द्विजां साक्षपी ।
मध्यें अंत्रपटासनादि गणिकीं दोहींकडे काढिलीं
होतां मंगळमंत्र लग्नसमयीं तूष्णीं सभा राहिली ॥२०४॥

विठ्ठलकवी

## मंगलाष्टकें.

विघ्नां वारितसे, सुखी करितसे, विद्या सदा देतसे,
शुंडादंड विशेष चाळवितसे, जो दाखवी भावसे, ।
शेंदूरानन तुंड ज्यास विलसे, मोरेश्वरीं जो वसे,
श्रीमन्मंगळमूर्ति तो बहुबळें कुर्यात्सदा मंगळम् ॥ २०५ ॥
सृष्टीचा रचिता, श्रुती पढियता, चारी मुखें बोलता,
ब्रह्मांडा जनिता, चराचर विता, सत्ता अशी स्थापिता, ।

---

१ पूजी. २ बालकांड ७२--१३ पहा. ३ शांत, ४ ह्यांत गणेश, ब्रह्मदेव, विष्णु, शंकर व देवगंधर्वादिक ‘ वधूवरांचें सदा मंगळ करोत ’ ह्मणून प्रार्थना केली आहे.

सर्वांही वरता, धरी अमरता, तो चिंतिजे तत्वता,
सावित्रीसहवर्तमान विधि तो कुर्यात्सदा मंगळम् ॥ २०६ ॥
भक्तांलागि कृपा करी नरहरी, जो दानवा संहरी,
भारी वेश धरी, नृपालन करी, वेदांस जो उद्धरी, ।
ज्यासि कोण करी सरी, अमर तो भूभार जो आवरी,
तो लक्ष्मीसहवर्तमान सकळं कुर्यात्सदामंगळम् ॥ २०७॥
कैलासीं वसतो, विभूति धरितो, दुष्टांस संहारतो,
भोळा तो असुरासुरांस स्फुरतो, जे मागती देत तो, ।
रामाला स्मरतो सदा रसिक तो चित्तांत तो बैसतो,
तो गौरीसहवर्तमान सकळं कुर्यात्सदा मंगळम् ॥ २०८ ॥

नागेश कवि.

देवर्षी सनकः सनंदन पिते गंधर्व हाहा हुहू
नाना किन्नर यक्ष किंपुरुष ते रक्षोगणादी बहू ।
सद्विद्याधर गुह्यकाप्सर मुनी पैशाच्च भूमंडळीं
ब्रह्मा विष्णु महेश देव सकळीं कुर्यात्सदा मंगलम् ॥ २०९
आतां सावध सावधान घटिका संपूर्ण आली भरूं
भावें सद्गुरुतें भजा, गलबला कोणी नका हो करूं, ।
चिंतावें कुळदैवतेसिं हृदयें एकाग्रचित्तें बसा
सोडा अंत्रपटा ह्मणे कुळगुरु कुर्यात् सदा मंगलम् ॥ २१० ॥

विठ्ठल कवि

लज्जाहोम[1] करूनियां वधुवरें पुजूनि गौरीहरा[2]
ग्रंथी देउनियां रघूत्तमकरीं देती वधू सुंदरा ।
आली तैं बहुल्यावरी तंव सिते त्या शिक्षिती सुंदरा[3]
'रामाला नमिं तूं सिते!' अतित्वरें तेव्हां विलोकी धरा २११
"रामाचें पद लागतां जड शिळा झाली त्वरें कामिनी
यासाठीं न नमीं रघूत्तमपदें, भाळीं सुरत्नें मणी, ।
रत्नाच्या युवती सुरम्य सवती होतील मातें सदा
रामाची बहु अप्रिती मजवरी होईल गे ! सर्वदा" ॥ २१२ ॥

अनंतकवि.

जनकनृपति बोले, "चारुनेत्रा सुशीळा
कनकरुचिरगात्रा पुत्रिका दिव्यलीळा ।
पदकमलवरातें अर्पिली म्यां सुधन्या
म्हणउनि सकृपेनें पाळिजे लोकमान्या ! ॥ २१३ ॥
मनोरथतरू कसा सफळ आजि झाला, मला
असार नरजन्मही सरससा मना भासला ! ।

---

१ लाजाहोम. २ शंकरपार्वती. ३ सीतेच्या मैत्रिणींनीं सीतेला रामाला नमन करायला सांगितलें तेव्हां तिनें जें खुबीदार उत्तर केलें तें पुढील सुप्रसिद्ध श्लोकांत दिलें आहे. "रामाचे पद लागतांच ज्रर शिळेची स्त्री झाली तर मी नमन केल्यास माझ्या शिरोरत्नांतील मण्यांच्या रामपादस्पर्शानें सुरम्य युवती होऊन त्या मला सवती होतील!"४ हा श्लोक गोड आहे. सीतारामांच्या लग्नाप्रमाणें जीवशिवांचें लग्न लागल्यावरही 'असार नर जन्मही सरसच भासतो!'

तुला धरणिनंदिनीसह विचित्र हेमासनीं
प्रभो ! निरखितों, गमे परम भाग्य या लोचनीं " ॥ २१४ ॥
साध्वी सुंदरि उर्मिळा स्वतनया ते लक्ष्मणा दीधली,
मांडव्या भरतासि बंधुदुहिता सालंकृता अर्पिली, ।
देवी ते श्रुतकीर्ति शत्रुहनना भूपाल अत्युत्सवें
चौघेही वर दारवंत बरवे ते शोभती वैभवें ॥ २१५ ॥

निरंजनमाधव.

महदुत्सवें विवाहीं अर्पी नृप जावयांसि नगराशी ।
पूजुनि पंक्तिरथातें आज्ञा दे जावयांसि नगराशी ॥ २१६ ॥

मोरोपंत.

---

## ९ परशुराम आणि राम.

### वैतालीय.

मिथिलापुर योजनत्रयीं । बहुविघ्नाकुल भूपती तयीं ।
तंव भार्गव देखिला पुढें । बलदर्प मनिं फारसा कढे ॥२१७॥
करिं बाणधनुष्य शोभले । फिरवी घोर कुठार तो बळें ।
रघुराजसुतें विलोकितां । दिसला काळभुजंग आयता ॥२१८॥

---

विवाहित. २ दागिन्यांचे ढीग.

कठिणोत्तर फारसा वदे । " असतां मी जगतीं महामर्दे ।
मम नाम धरोनि हिंडसी । मम राजन्यवनाग्नि[1] नेणसी ! ॥२१९॥
अतिजीर्ण धनुष्य शांकरी[2] । लवितां मोडुनि शीघ्र ये करीं ।
जिंणिली[3] जनकात्मजा वरी । भुवनीं वीर विराजसी परी ॥२२०॥
जरि हे धनु वैष्णवी[4] असे । करिसी सिद्धगुणीं, तदा दिसे ।
पुरुषार्थ तुझा रघूत्तमा ! । न घडे तैं वधितों नराधमा !" ॥२२१॥

—निरंजन माधव

" पैरम[5] अधम तूं रे ! क्षत्रियांमाजि रामा! "
" भृगुपति ! तव शस्त्रें सांगती ब्रह्मकर्मा "।
" अनुचित कृत नष्टा ! मारिली नार झुंजीं "
" शिव ! शिव ! परि नोहे ताटिका माय माझी !"॥२२२॥

—मुक्तेश्वर.

रघुनायक रोषसंकुलें[6] । निरखी भार्गववक्त्र तें छळें ।
" द्विज यास्तव सर्व सोसणें । मजला हें पडलें असें उणें!' ॥२२३॥
लघुविक्रम रामकेसरी । असुडी भार्गवकार्मुका करीं ।
गुण योजुनी तैंचि लीकरी । लववी इक्षु जसा महाकरी ! ॥२२४॥

—निरंजन माधव.

---

१ क्षत्रियवनांला जाळणारा माझा प्रतापाग्नि. २ शंकराचें धनुष्य. ३ जिंकलीस. ४ विष्णूचें. ५ ह्या श्लोकांत परशुरामरामांचा मजेचा संवाद दिला आहे. ६ रागावून. ७ सहज आपटिलें.

## परशुरामकृत रामस्तुति.

" स एव विष्णुस्त्वं राम ! जातोसि ब्रह्मणार्थितः ।
मयि स्थितं तु त्वत्तेजस्त्वयैव पुनराहृतम् ॥ २२५ ॥
यदि मेऽनुग्रहो राम ! तवास्ति मधुसूदन ! ।
त्वद्भक्तसंगस्त्वपादे दृढा भक्तिः सदास्तु ते " ॥ २२६ ॥

-अध्यात्मरामायण

आज्ञापिला मुनि,महेंद्रगिरीस गेला । वृद्धा नृपा दशरथा अति तोष झाला
गेलें अरिष्ट मग तुष्टमनें पुरातें।गेला सपुत्र सुख पावुनि शांतचित्तें ॥
शृंगारिलें नगर राजबिदी दुकानें । माड्या गृहें वसनपल्लव तोरणानें ।
सानंदयुक्त समलंकृत मानवांची ।थाटी भरे, बहुतसी भरली जनांची २२७

## अमृतध्वनि.

श्रीरामजी, सगुण सौमित्र ते यमळ, कैकेयिपुत्र सुमती,
चौथे सती मिथिलनाथात्मजा निजसुदारांसमेत रमती ।
माता, पिता, सुहृद जाती, अमात्यगण तोषें जया निरखिती
सानंदले त्रिदशनाथीं अखंड मति ठेवोनि लोक वसती॥२२८॥
युद्धाजितें स्वसदनाप्रति कैकयातें
भेटावया भरत तो अनुजासमेतें ।

---

१ राजवाडे. २ गर्दी. ३ सुमित्रेचे लक्ष्मण व शत्रुघ्न हे दोन पुत्र. ४ भरताचा मामा.

नेला नृपा दशरथा विनवोनि प्रत्नें
श्रीराम लक्ष्मण घरीं नरलोकरत्नें ॥ २२९॥

निरंजनमाधव

## १० राम आणि नारद.

एकदां सुखमासीनं रामं स्वान्तःपुराजिरे ।
अतर्कितमुपायातो नारदो दिव्यदर्शनः ॥ २३०
तं दृष्ट्वा सहसोत्थाय रामः प्रीत्या कृतांजलिः
ननाम शिरसा भूमौ सीतयासह भक्तिमान् ॥ २३१ ॥
उवाच नारदं रामः प्रीत्या परमया युतः ।
' संसारिणां मुनिश्रेष्ठ, दुर्लभं तव दर्शनम् '॥ २३२ ॥
अथ तं नारदोप्याह राघवं भक्तवत्सलम् ।
" किं मोहयसि मां राम ! वाक्यैर्लोकानुसारिभिः ॥२३३ ॥
संसार्यहमिति प्रोक्तं सत्यमेतत्त्वया विभो ! ।
जगतामादिभूता या सा माया गृहिणी तव ॥२३४ ॥
त्वं विष्णुर्जानकी लक्ष्मीः शिवस्त्वं जानकी शिवा ।
ब्रह्मा त्वं जानकी वाणी सूर्यस्त्वं जानकी प्रभा ॥२३५॥
लोके स्त्रीवाचकं यावत्तत्सर्वं जानकी शुभा ।
पुन्नामवाचकं यावत्तत्सर्वं त्वं हि राघव ! ॥ २३६ ॥

जाग्रत्स्वप्नसुषुप्ताख्या संसृतिर्या प्रवर्तते ।
तस्या विलक्षणः साक्षी चिन्मात्रस्त्वं रघुत्तम ! ॥ २१७ ॥
चिन्मात्रज्योतिषाः सर्वा सर्वदेहेषु बुद्धयः ।
त्वया यस्मात्प्रकाश्यंते सर्वस्यात्मा ततो भवान् ॥ २१८ ॥
अज्ञानान्न्यस्यते सर्वं त्वयि रज्जौ भुजंगवत् ।
त्वज्ज्ञानाल्लीयते सर्वं तस्माऽज्ञानं सदाभ्यसेत् ॥ २१९ ॥
त्वत्पादभक्तियुक्तानां विज्ञानं भवति क्रमात् ।
तस्मात्त्वद्भक्तियुक्ता ये मुक्तिभाजस्तएवहि ॥ २४० ॥
रावणस्य वधार्थाय जातोसि रघुनंदन ! ।
तत्सत्यं कुरु राजेंद्र ! सत्यसंधस्त्वमेवहि " ॥ २४१ ॥
श्रुत्वैतद्गदितं रामो नारदं प्राह सस्मितम् ।
" प्रतिज्ञातं च यत्पूर्वं करिष्ये तन्न संशयः ॥ २४१॥
किंतु कालानुरोधेन तत्तत्प्रारब्धसंक्षयात् ।
हरिष्ये सर्वभूभारं क्रमेणासुरमण्डलम् ॥ २४३ ॥
रावणस्य विनाशार्थं श्वो गंता दण्डकाननम् ।
चतुर्दशसमास्तत्र ह्युषित्वा मुनिवेषधृक् ॥ २४४ ॥
सीतामिषेण तं दुष्टं सकुलं नाशयाम्यहम् " ।
एवं रामे प्रतिज्ञाते नारदः प्रमुमोद ह ॥ २४९ ॥

अध्यात्मरामायण

# ११ अयोध्येंतल्या धामधुमी

पंच:—पुरी[1] सुखास पावली, यशें जगीं न मावली,
सुरद्रुची[2] न सावली सुतार्धि[3] गाय मावली, ।
कुमार राम यौवराज्ययोग्य वाटला नृपा,
परंतु तत्प्रिया[4] करी जगत्त्रयीं बरी कृपा ! ॥ २४६ ॥

प्रह०—हें वृत्त श्रवण करूनि पौर सर्व
आनंदें गणिाति मनीं नभासि खर्वे[5] ।
पूजांतीं रघुपतिला मुनी[6] सुवृत्त
संतोषेंकरूनि कथी समस्त वृत्त ॥ २४७ ॥

ही वार्ता परिसुनि मंथराख्य चेटी
दुःखातें धरि बहु पापबुद्धिपेटी[7] ! ।
कैकेयीप्रति मग मंथरा वदे ती
" स्वोत्कर्षी उचित सभाग्य लक्ष्य देती ॥ २४८ ॥

कौसल्यातनयकरासि[8] राज्य जातें
चित्ताला सुख मग तें कसें तुझ्या तें ! ।

---

१ अयोध्या २ कल्पवृक्षाची ३ पुत्रांचें ऐश्वर्य ४ कैकयी ५ आकाश ठेंगणें मानू लागले ६ वसिष्ठ ७ पापबुद्धीची पेटी, आगर. ८ रामाच्या हातांत.

तूं पुत्रासह सवतीचिया पदासी
सेवावें अनुदिन जेंवि दीन दासी ! ॥ २४९ ॥
यासाठीं निजतनयासि राज्य साधीं
बांधावा जळ नसतांचि सेतु आधीं ।
यत्नानें झडकरि हा हरीं अपाय
निश्चिंता स्थिरमति बैसलीय काय ? " ॥ २५० ॥

—मोरोपंत.

ह्मणे ' धन्य तूं मन्थरे ! बुद्धिमंते ! ।
करूं काय मी ? ' ' माग दोहीं वरांतें;
धरापाट[1] घे आपल्या आत्मजातें ।
वरें दुसऱ्या राम धाडी वनातें ! ' ॥ २५१ ॥

मुक्तेश्वर.

## साकी.

वरयुग[2] देऊं केले होते ती अडवुनि ते मागे, ।
सत्यव्रतैरतमति[3] पति, सतिचें वाक्य करावें लागे !॥ २५२ ॥
भूप ह्मणे, "सर्वस्वहि[4] दयिते ! घे, प्रेमा आठीव, ।
या वृद्धीं करुनि कृपा, न वनीं रामातें पाठीव " ॥ २५३ ॥

---

१ सिंहासन, राज्य. २ पूर्वी लढाईंत कैकेयीनें रथचक्र सांवरल्यामुळें दशरथानें प्रसन्न होऊन तिला दोन वर दिले होते. ३ सत्यप्रतिज्ञ. ४ सर्वस्व मागून घे.

बळकट सुतशोक[1]व्याघ्र धरी नृपहरिणाचें नरडें, ।
आलें फार अयोध्येला, परि कैकेयीला न रडे !! ॥ २५४ ॥

" कैकेयी ! या बाळकानें तुजा काय ।
केला असा उग्र दंडार्ह[2] अन्याय ? ।
जेष्ठापचायी[3], सुविद्य, क्षमाशीळ ।
हा टाकितां तूं जनीं निंद्य होशील ॥ २५५ ॥
दे राज्य पुत्रास, राहो घरीं राम, ।
स्वाधीन जें आणखी सांगशी काम ।
कोणी सुबुद्धीस केला तुज्या भेद[4] ।
होईल अंतीं तुलाही प्रिये ! खेद ॥ २५६ ॥
पूर्वी सदा आत्मसेवावितंद्रास[5] ।
वर्णीत होतीस तूं रामचंद्रास ! ।
कां धाडिसी काननीं रामरायास ? ।
वैधव्यकामें पतीला मरायास !" ॥ २५७ ॥
ते निर्दया केकयाची सुता यास ।
कोपें ह्मणे, " कां करीसी वृथायास ? ।

१ पुत्रशोकरूपी वाघानें दशरथरूप हरणाचें नरडें धरलें, तेव्हां सारी अयोध्या रडली पण कैकेयी खमंग राहिली ! २ शिक्षा करण्यासारखा अपराध. ३ वडील व वारस पुत्र. ४ ' दुःसंगी च्यवते स्वार्थात् ' ह्मणजे दुःसंगामुळें प्राणी स्वार्थभ्रष्ट होतो. ५ तुझ्या सेवेस निमग्न असलेल्या रामास.

या पुत्रलोभें प्रतिज्ञाव्रतत्याग ?।
कां रूचला हा यशाला तुझ्या डाग ? " ॥ २५८ ॥

राय असें आयकतां ' हाय !' ह्मणे, ' बायको नव्हे, कृत्या ! '
काय करूं ? जाय वना, बा जोडी यश करूनि सत्कृत्या'!॥२५९

ह्मणे राम, " तातार्थ मी प्राणदान।करीन क्षणें, हें मनीं सत्य मान;
त्यजीन स्वयें राज्यदाराधनातें[1] । स्वमातेचियाही पदाराधनातें॥२६०॥

करी जो अनुज्ञेविणें तातकार्य । जनामाजि तो धन्य सत्पुत्र आर्य ।
दुजा बोलिला मध्यम प्रोक्तकारी[2] । न वर्ते नियोगेंहि जो तो भिकारी॥

चतुर्दिवसमा[3] काळ जाईल तूर्ण[4] । असो मध्यमांबा[5] मनःकामपूर्ण[6]" ।
वदोनी असें तो प्रसूच्या[7] गृहातें । त्वरें जाय वंदी तिचे पाय हातें२६१

## विबुधप्रिया.

ते ह्मणे, "रघुनायका ! सुखदायका ! तुजवांचुनी
या जगत्त्रितयीं नसे मज सौख्यलेशहि वांचुनी ।
वासरा ! तुज वास राजसुता वनीं रुचला कसा ?
कां कठोर करुनि मानस टाकिशी मज लोकसा ?॥ २६२ ॥

---

१ राज्य, स्त्री, व धन यांस. २ सांगितलेलें काम करणारा जो पुत्र तो मध्यम, व आज्ञा केली असूनही जो ऐकत नाहीं 'स पुत्रोमल उच्यते ' ३ चवदा वर्षे. ४ लवकर. ५ मधली आई, कैकेयी. ६ जिची मनकामना पूर्ण झाली आहे अशी. ७ मन्मदा कौसल्या.

प्रीति दोंशी सपत्नमातृमनासि होउनियां जटी
दंडकींहि तपस्विलोकगणांसि होशिल धूर्जटी ।
दुःखसागरपारदा ! मजला परंतु तरी नसे
नेत्रभृंग उपोषणें करितील हे किति दीनसे! " ॥ २६४ ॥

पोटिंशी धरुनी सुतासि करी विलाप परोपरी,
कोपला बहु लक्ष्मण स्वमनांत धीरमणी परी;।
अग्रजासि ह्मणे, " विभो ! मज दे नियोगं भुजाबळें
स्त्रीजित क्षितिपाळ बांधुनि राज्य साधिन हें पळें !"॥२६५॥

लक्ष्मणासि धरूनियां हृदयीं ह्मणे रघुराज तो
" हें यथार्थ, परंतु बा! समयीं पराक्रम साजतो ! ।
पूर्ण हो जननीमनोरथ, सत्यसंध पिता असो,
दंडकांत चतुर्दशाब्द तपोधनीं जन हा वसो " ॥ २६६ ॥

वंदुनि जननीजनांप्रति रामचंद्र निघे तदा
' ने मलाहि ' ह्मणोनियां धरि लक्ष्मण प्रभुच्या पदा ।
मायबापहि टाकिले, परि बंधुरत्न न सोडिलें,
स्नेहबंधन सज्जनें भुवनत्रयींहि न तोडिलें ॥ २६७ ॥

—मोरोपंत.

---

१ नौका २ आज्ञा.

# १२ सीतारामाचा संवाद.

रामः—चतुर्दश हि वर्षाणि वस्तव्यं दण्डके मया ।
पित्रा मे भरतश्चापि यौवराज्ये नियोजितः ॥ २६८ ॥
याते च मयि कल्याणि ! वनं मुनिनिषेवितम् ।
व्रतोपवासपरया भवितव्यं त्वयाऽनघे ॥ २६९ ॥
कल्यमुत्थाय देवानां कृत्वा पूजां यथाविधि ।
वन्दितव्यो दशरथः पिता मम जनेश्वरः ॥ २७० ॥
माताच मम कौसल्या वृद्धा संतापकर्शिता ।
धर्ममेवाग्रतः कृत्वा त्वत्तः संमानमर्हति ॥ २७१ ॥
वन्दितव्याश्च ते नित्यं याः शेषा मम मातरः ।
स्नेहप्रणयसंभोगैः समा हि मम मातरः ॥ २७२ ॥
विप्रियं च न कर्तव्यं भरतस्य कदाचन ।
सहि राजा च वैदेहि! देशस्यच कुलस्यच ॥ २७३ ॥
सा त्वं वसेह कल्याणि ! राज्ञः समनुवर्तिनी ।
भरतस्य रता धर्मे सत्यव्रतपरायणा ॥ २७४ ॥

सीताः—किमिदं भाषसे राम ! वाक्यं लघुतया ध्रुवम् ।
त्वया यदपहास्यं मे श्रुत्वा नरवरोत्तम ॥ २७५ ॥
आर्यपुत्र ! पिता माता भ्राता पुत्र स्तथा स्नुषा ।
स्वानि पुण्यानि भुञ्जानाः स्वं स्वं भाग्यमुपासते ॥ २७६ ॥

भर्तुर्भाग्यं तु नार्येका प्राप्नोति पुरुषर्षभ ।
अतश्चैवाह मा दिष्टा वने वस्तव्यमित्यपि ॥ २७७ ॥

यदि त्वं प्रस्थितो दुर्गं वनमद्यैव राघव ।
अग्रतस्ते गमिष्यामि मृद्नन्ती कुशकण्टकान् ॥ २७८ ॥

प्रासादाग्रे विमानैर्वा वैहायसगतेन वा ।
सर्वावस्थागता भर्तुःपादच्छाया विशिष्यते ॥ २७९ ॥

सुखं वने निवत्स्यामि यथैव भवने पितुः ।
अचिन्तयन्ती त्रींल्लोकांश्चिन्तयन्ती पतिव्रतम् ॥ २८० ॥

त्वं हि कर्तुं वने शक्तो राम ! संपरिपालनम् ।
अन्यस्यापि जनस्येह किंपुनर्मम मानद ! ॥२८१॥

व्यतिक्रमं न वेत्स्यामि स्वर्गोपि हि न मे मतः ।
त्वया विना नरव्याघ्र! नाहं तदपि रोचये ॥ २८२ ॥

अनन्यभावामनुरक्तचेतसं
त्वया वियुक्तां मरणाय निश्चिताम् ।
नयस्व मां साधु कुरुष्व याचनां
नातो मया ते गुरुता भविष्यति ॥ २८३ ॥

रामः-सीते ! महाकुलीनासि धर्मेच निरता सदा ।
इहाचरस्व धर्मं त्वं यथा मे मनसः सुखम् ॥ २८४ ॥

अतीव वातास्तिमिरं बुभुक्षा चास्ति नित्यशः ।
भयानिच महान्त्यत्र अतो दुःखतरं वनम् ॥ २८५ ॥

कायक्लेशाश्च बहवो भयानि विविधानिच ।
अरण्यवासे वसतो दुःखमेव सदा वनम् ॥ २८६ ॥

**सीता**:-ये त्वया कीर्तिता दोषा वने वस्तव्यतांप्रति ।
गुणानित्येव तान्विद्धि तव स्नेहपुरस्कृता ॥ २८७ ॥

न हि मां त्वत्समीपस्थामपि शक्रोपि राघव ।
सुराणामीश्वरः शक्तः प्रधर्षयितुमोजसा ॥ २८८ ॥

शुद्धात्मन्प्रेमभावाद्धि भविष्यामि विकल्मषा।
भर्तारमनुगच्छन्ती भर्ताहि परदैवतम् !॥ २८९ ॥

भक्तां पतिव्रतां दीनां मां समां सुखदुःखयोः ,
नेतुमर्हसि काकुत्स्थ ! समानसुखदुःखिनीम् ॥ २९० ॥

नच मे भविता तत्र कश्चित्पथि परिश्रमः ।
पृष्ठतस्तव गच्छन्त्या विहारशयनेष्विह ॥ २९१ ॥

पत्रं मूलं फलं यत्तु अल्पं वा यदि वा बहु ।
दास्यसे स्वयमाहृत्य तन्मेऽमृतरसोपमम् ॥ २९२ ॥

यस्त्वयासह सःस्वर्गो निरयो यस्त्वयाविना ।
इतिजानन्परां प्रीतिं गच्छ राम! मयासह ॥ २९३ ॥

राम:–स मां पिता यथा शास्ति सत्यधर्मपथे स्थित: ।
तथा वर्तितुमिच्छामि सहि धर्म: सनातन: ॥ २९४ ॥

सा त्वं दिष्ट्यानवद्याङ्गि ! वनाय मदिरेक्षणे ।
अनुगच्छस्व मां भीरु सहधर्मचरी भव !! ॥ २९५ ॥

वाल्मीकिरामायण.

सूरावृत्त:–सीता सती राहेल कां ! कीं स्वामिची ती सावली, ।
सौमित्रिच्या तों मानसी हें ' बाप तो ती मावली !' ॥२९६॥

—मोरोपंत.

वल्कलांबरधारणोत्तर पुत्रयुग्ममुखांकडे
पाहुनी नृप होय मूर्छित फार दीन तसा रडे ।
मायबाप गुरू नमूनि निघे रघूद्वह तत्क्षणीं
आणवी रथ तो सुमंत्र करें नरोत्तम आंगणीं ॥ २९७ ॥

मतीनिर्मळा भावशीळा सुमंता । रथीं बैसवी[1] राम, सौमित्र, सीता; ।
थरें[2] चालती, धांवती लोकमांधा, । पुरी ओस ते, राम तेथें अयोध्या! ॥

तृणीं शेजे[3] त्यां, नेसणें वल्कलांचें, । नभोर्वस्त्र[4] वारी महाशीत त्यांचें
वटाचेनि दुग्धें जटाभार पृष्ठीं । तटाकें मही मंचका, वातवृष्टी ।२९९

१ सुमंतानें रथीं बैसविले. २ लोकांचे समुदाय ३ आंथरूण. ४ आकाश हेंच वस्त्र.

।सता संकटीं पावली शृंगवेळा । जगन्नाथ[१]ा—गुह[१]ा योग झाला !
त्रिवेणीतटीं[२] वंदिला तीर्थरावो । उलंघूनि गेला वनीं[३] देवरावो ॥२०॥

—मुक्तेश्वर

# १३ राम आणि भरत

पूर्वी जो मृगयारतें दशरथें हस्तिभ्रमानें[४] मुनी
बाणानें सरयूतिरीं प्रमथिला[५] तज्जन्मदापासुनी[६] ।
जाला शाप ह्मणूनि विह्वळमनें ' हा राम रे ! राम रे ! '
ऐसा फार तदा विलाप करुनी तो पुत्रशोकें मरे ॥ २०१ ॥

मोरोपंत

द्विजवर वासिष्ठ ठेवुनि तैल द्रोणींत भूपदेहातें ।
' दे हातें पुत्र,ह्मणे 'भरतासि;' सुमंत्र करि वदे हा[७] तें ! ॥२०२
नयवित्[८] चार प्रेषुनि, न कळत आणोनि, सांगती, " तातें
केलें स्वर्गमन, तुला अर्पुनियां सर्व भूमि भरतातें " ॥ २०३
तें जननीचें चरित श्रवण करुनियां सखेद फार रडे ।
दंडाहत[९] भुजग तसा कोपें मातेकडे तदा मुरडे ! ॥ २०४ ॥

---

१ राम व गुह यांची भेट झाली. २ प्रयागास. ३ राम चित्रकूट पर्वतावर जाऊन पर्णशाळा बांधून राहिले. ४ हत्ती आहे असें कल्पून ५ मारला ६ त्याचा बाप जो श्रावण त्यापासून. ७ हा वसिष्ठ जें जें बोले तें तें सुमंत प्रधान करी ८ नीति जाणणारे दूत. ९ दांडक्यानें मारलेल्या सर्पाप्रमाणें

मातस्तातः क्व यातः ? सुरपतिभवनं; हा कुतः ? पुत्रशोकात्;
कोऽसौ पुत्रश्चतुर्णां ? त्वमवरजतया यस्य जातः; किमस्य ? ।
प्राप्तोऽसौ काननान्तं; किमिति ? नृपगिरा; किंतथासौ बभाषे ?
मद्वाग्बद्धः; फलं ते किमिह ? तव धराधीशता; 'हा ! हतोऽस्मि'॥

हनूमन्नाटक अंक ३ श्लो ३१

वंदूनि मातेसि तेव्हां ह्मणे, ' आज । गेला असे सांग कोठें महाराज ?॥
'स्वर्गासि गेला कुमारा!तुझा तात'।'अंबे! अकस्मात झाला कसा घात!'॥
' हा पुत्रशोकेंचि मेला सुता ! राय'।'तो कोणता हें मला सांग हो माय?'॥
' बंधू नमस्कार सारे करा ज्यांस'।' जाले तया काय?तो मान्य राजास'॥
' स्त्रीबंधु घेऊनि गेला अरण्यास'।'कां मानलें हे जनाच्या शरण्यास ?'॥
' वत्सा ! तुझी तातवाणीच तन्मूळ'।'ऐसें कसें बोलला भूपशार्दूळ?'॥
' बोले असें भूप मद्वाग्गुणाबद्ध'।'कैची फलप्राप्ति ? कां पीडिला वृद्ध ?'॥
'व्हावें तुला राज्य,तो साधिला काम'।'हा!पापिणी!काय केलेंसि?हा राम!॥

" प्रिय वधिला पापिष्ठे । धाडुनि विपिनासि सद्गुणकरंडा ।
केली अकीर्ति; आपण झालिस, पापाशये ! स्वयें रंडा ।२१०॥

---

हा भरतकैकेयीचा संवाद मोठा मजेचा आहे हा सारा वरील श्लोकाचें पंतकृत पदशः भाषांतर आहे. २ कोणत्या पुत्राच्या शोकानें. ३ राम. ४ सर्वांचा आधार जो राम त्याच्या मनांत वनांत जाण्याचें कां आलें ?५ दशरथाच्या आज्ञेला अनुसरून. ६ मला वर देऊन वचनबद्ध झाला असल्यामुळें. ७ इच्छा. ८ सद्गुणांचा करंडा. ९ पापहृदय !

मारावें तुज पापे! परि ह्मणतो रामराय माय तुला ।
यास्तव उपाय नाहीं, गरलाची[1] तुजचि योग्य काय तुला[2]! ॥२११
ह्री[3] श्री दया जयाच्या ठायीं, जो स्तुत्य या जनामाजी, ।
त्याला वनासि धाडुनि केली तूं काय कामना माजी? ॥२१२
तूं राक्षसीपरीसहि अधमा, जे निजकुटुंब खातीस ! ।
मीहि पाप तुझा सुत !" हे बोले, होय पारखा[4] तीस! ॥२१३

मोरोपंत.

ह्मणे कैकयी, " प्राण सांडीन आतां । कदा नेघवे घोर हें पाप माथां॥
पिता बंधु गेले जिये जाण पंथीं । तयालागिं मी एक सेवीन भक्तीं "॥
क्रियाकर्म तें सारिलें सर्व आंगें । निघे कानना राघवाचेनि मागें ॥
जटावल्कलें वेढिलीं, भस्मधारी,। निराहार, तो निर्जळी, पादचारी ।
गुहें पूजिला, वंदिला रामबंधू । त्वरें कैकयी क्षेम दे सत्वसिंधू, ।
सखे बोलतां बोलतां रामगोष्टी । प्रयागासि आले ऋषीराजभेटी[5] ॥
मुनी वंदिले, चालला रामठाया[6] । पुढें काननें देखिली शैलराया ।
ह्मणे राम ' कैकेय हा प्राण माझा । वनीं पातला आवडी स्नेहकाजा' ॥
वदे कैकयी अग्रजा ' रामराया! । मनोमस्तकें नित्य झाडीन पायां
पुरा चाल गा!आपुल्या शीघ्र काळें,।प्रजा पाळि सांभाळि हीं बंधुबाळें ॥
मुखीं शब्द एकू, करीं बाण एकू, । जगीं पत्नि एकू, व्रतें काम एकू ,।
प्रतापी महीमंडळी राम एकू' । ह्मणे, 'सोडिजेना कधीं राम एकू '॥

---

१ विषाची. २ तुलना. ३ विनय, ऐश्वरभाव व दया. ४ पाठिमोरा. ५ भरद्वाजाच्या आश्रमीं. ६ राम चित्रकूटावर पर्णशाळा बांधून होते तेथें.

भरत–भजनकंदा शांतवी रामबंधू;
पुसुनि नयनबिंदू पादुका दे प्रसिध्दू; ।
मन दृढतर रामीं, राहिला नंदिग्रामीं,
तपत, जपत वाचा राम संपूर्णकामी ॥ ३२० ॥

मुक्तेश्वर.

---

## १४ कलहास प्रारंभ.

चाले पुढें राघव चक्रवर्ती । संगें प्रिया मानसतापहर्ती ।
पाठी धरावाहक वीरराणा । चाले, करीं ओढुनि चापबाणा ॥ ३२१
गोदावरी पुण्यतटीं पवित्रा । शाळा सुरम्या रचिली विचित्रा ।
सीतामनोपंकजभृंगवासी । सेवे सुखें सादर बंधुपासी ॥ ३२२ ॥

मुक्तेश्वर.

परमोग्र विराध मारिला । प्रभुनें तुंबरु भक्त तारिला ।
भगिनीवदन स्मशान, न-। प्रिय[1] पाहोनि खिजे दशानन ॥ ३२३ ॥

तेथें दशास्यभगिनी विधवा, रमाया
प्रार्थी, जया भजतसे विनयें रमा या ! ।
सौमित्रि दंड करि खंडुनि नाक कान,
प्रेमें तदीय यश वर्णिल नाक[2] कां न ? ॥ ३२४

---

१ अप्रिय. २ स्वर्ग.

घाता भ्राता खर सपलभुक्सैन्य अत्युग्रचंडी
प्रेषी द्वेषी, करि समर तो, तच्छिर श्रीश खंडी ।
सांगे ' कां गे ! रडसि !' ह्मणतां रावणा वृत्त ; सोडी
शंका लंकापतिस नुरवी जें असें वैर जोडी ॥ २२५॥

## साकी.

सांगे; " पंचवटींत निराखिलें अतुल नरस्त्रीरत्न ।
तें द्याया साधुनि तुज भोक्त्या! म्यां केला बहु यत्न ॥ २२६

तद्भर्त्यानें केल्यें तव भय न धरुनि विनासा हे ।
मानी पळही अपमानातें नच मृत्युविना साहे !" ॥ २२७॥

---

# १५ सिद्धांचे आशीर्वाद.

" देउनि अभय मुनीतें आशीर्वादप्रसाद जोडून ।
अत्र्याश्रमासि गेले स्वामी तो चित्रकूट सोडून ॥ २२८ ॥
जैसे वसिष्ठ गाधिज, जेंवि भरद्वाज गुरु, तसे अत्री ।
नमिलें शमिलेखर्षभ जे सुधवळ मानसीं जसे पत्री ॥ २२९ ॥

---

१ राक्षसांच्या सैन्यासह. २ कोपी. ३ नाकरहित. ४ भरद्वाज. ५ योगी व देव यांत श्रेष्ठ ( शमि+लेख+ऋषभ. )६ शुभ्र ७ मानस सरोवरांत. ८ हंस.

जेंवि भरद्वाज तसे द्रवले पाहोनि तेहि मामाजी ।
झाले अतितर सुखकर कर जैसे भानुचे हिमामाजी ॥ ३३० ॥
तद्भार्या अनुसूया मजवरि करि सासुमायसी माया ।
स्व[1]करोंचे अळंकारि, आहे प्रेमासि काय सीमा या ! ॥ ३३१ ॥
कारि निर्मळ जो तपोनिधी । शरभंगाख्य महातपोनिधी ।
प्रभुंनीं गुरुसाचि पाहिला । चरणीं मस्तकपद्म वा[2]हिला" ॥३३२
मग जगदीश सुतीक्ष्ण[3]द्विजाश्रमाला करोनियां काशी ।
गेला अगस्त्यमुनिच्या स्वस्थानाशी द्विती[4]यनाकाशीं ॥ ३३३ ॥
आम्ना[5]यमूर्तिला त्या ' रामोस्मि ' असें कथूनियां वंदी ।
[6]वंदी होय अगस्त्यहि, आघ्राण करी शिरीं महा[7]नंदी ॥ ३३४ ॥
सत्कारानंतर दे आशीर्वादासवें धरे[8]शासी ।
ब्रह्मास्त्र, विष्णुकार्मुक, शक्रेषुधियुग्मरत्न, लोकासी ॥ ३३५ ॥

मोरोपंत.

१ स्वहस्तानें २ ही सर्व हकीकत पुढें सीतादेवी आपल्या स्वसा-जावांस सांगत आहे. ३ सुतीक्ष्ण नामक तपोनिधीच्या आश्रमाला. ४ दुसरा स्वर्गच अशा. ५ वेदमूर्तिला. ६ स्तवनकर्ता. ७ परमहर्ष झालेला तो. ८ रामरायाला. ९ अरण्यकांड सर्ग १२ श्लोक ३१।३७ पहा.

# १६ शबरीची रामभक्ति.

आला राम वना ह्मणोनि ललना ऐकोनि आनंदली
' मी वंदीन पदारविंद ' ह्मणुनि जातां पथीं मंदली !
' माझा राम असेल तो क्षुधितसा चंडांशुंच्या आतपें
त्यातें मीं दृढ चित्तिं ठेविन बरा, ज्याकारणें हीं तपें !'॥२३६

मोठ्या श्रमें वळखुनी सफळातरूतें
तोडी फळें; वदनिं गात जगद्गुरूतें।
ओटी भरी चतुर ते उतरोनि भूमी,
भेटी निघे ' नयनिं पाहिन तो विभू मीं ' ॥ २३७ ॥

ज्याच्या मस्तकिं दीर्घ नूतन जटा, फेटा दिसे टोपँ तो
मौंजीं वेष्टित वल्कलें झळकती, दूजा ह्मणे कोण तो ॥
आश्चर्या अति पावली बघुनियां तूणीरें पाठीवरी
राजीवाक्ष असा विलोकुनि वधू धांवे जशी बावरी ॥ २३८ ॥

देखोनि डोळां हृदयाभिरामा । रामापुढें वंदितसे सुकामा ।
पुष्टांग झाली स्वसुखें भजाया । साष्टांग वंदी रघुराजपायां ॥२३९॥

---

१ स्त्री, शबरी नामक भिल्लीण. २ रामाचें पदकमल. ३ राहिली. ४ सूर्यांच्या. ५ प्रखर उष्णतेनें. ६ चढून. ७ डोक्यावरचा. ८ कंबरेला. ९ भाता. १० चित्ताला आनंद देणाऱ्या. ११ स्वसुखानें पुष्ट झाली.

' बहू दीससी राघवा ! तूं भुकेला।तुवां पाहिजे बा ! फळाहार केला '
तुझ्या कारणें म्यां फळें गोड रामा !।अगा! आणिली सेवि सीताभिरामा।।
सारीं क्षतांकित फळें निरखूनि डोळां
' कां हो अशीं ?' तिस पुसे रघुराज भोळा।
' चंचूपुटेंचि बहु चोंखिलिं पांखरांनीं ?
नेणो दिला प्रतिफळास नखांक रानीं ?' ॥ ३४१ ॥]
" चंचूक्षतें हीं नव्हतीं दयाळा !।मी कां तशीं आणिन? हा कपाळा!।
म्यां आपुल्या चावुनि शुद्ध दांतें । चाखूनि घे, तींच करें तुलांतें !! ॥
मधुरतर फळांची पूर्ण घेऊनि गोडी
मग मज रघुनाथा ! ठेवितां होय खोडी "।
निरखुनि रघुराजें भाव त्या भिल्लिणीचा
परम मनिं सुखावे नाथ लोकत्रयाचा ! ॥ ३४३ ॥
भिल्ली बोलुनि बोल सुंदर असे रामाकरीं तीं फळें
घाली, नेणुनि शास्त्रसिद्ध[१] पुरुषा उच्छिष्ट देतां बळें, ।
प्रेमें, प्रेमभरें, प्रसन्न हृदयें भक्ताजनांचा पिता
आत्माराम रमापती निजमुखीं झाला फळें अर्पितां ॥ ३४४ ॥
भिल्लिच्या वनफळें मन धालें । लोकनायक ह्मणे ' सुख झालें ' ।
प्रेम रामहृदयीं बहु आलें । तोयबाष्प नयनांत निघाले ! ॥३४५॥

---

१ वेदशास्त्रपुराणांनीं ज्याला गाइलें तोच परमात्मा हा.

'माझें मनोगत[1] वियोग तुझा न व्हावा
रूपीं तुझ्या दृढ असेन महानुभावा[2] !'
स्वामी ह्मणे, 'तुज वियोग कधीं न वाटे,
जा, शेवटीं मिळसि चिन्मयराजवाटे !' ॥ ३४६ ॥

आनंदतनय.

## साकी.

उदय होय भाग्याचा, पाहे, प्रभुतें पूजी, शबरी; ।
भगवत्प्रसादपात्र न होतां उत्तम जातिहि न बरी ! ॥ ३४७॥

मोरोपंत.

---

# १७ शबरीला रामाचा उपदेश.

पुंस्त्वे स्त्रीत्वे विशेषो वा जातिनामाश्रमादयः ।
न कारणं यद्भजने भक्तिरेव हि कारणम् ॥ ३४८ ॥
यज्ञदानतपोभिर्वा वेदाध्ययनकर्मभिः ।
नैव द्रष्टुमहं शक्यो मद्भक्तिविमुखैः सदा ॥ ३४९ ॥
तस्माद्भामिनि ! संक्षेपाद्वक्ष्येऽहं भक्तिसाधनम् ।
सतां संगतिरेवात्र साधनं प्रथमं स्मृतम् ॥ ३५० ॥

---

१ वांछित. २ महापुरुषा !

द्वितीयं मत्कथालापस्तृतीयं मद्गुणेरणम् ।
व्याख्यातृत्वं मद्वचसां चतुर्थं साधनं भवेत् ॥ ३९१ ॥
आचार्योपासनं भद्रे ! मद्बुद्ध्याऽमायया सदा ।
पंचमं पुण्यशीलत्वं यमादिनियमादि च ॥ ३९२ ॥
निष्ठा मत्पूजने नित्यं षष्ठं साधनमीरितम् ।
मम मंत्रोपासकत्वं सांगं सप्तममुच्यते ॥ ३९३ ॥
मद्भक्तेष्वधिका पूजा सर्वभूतेषु मन्मतिः ।
बाह्यार्थेषु विरागित्वं शमादिसहितं तथा ॥ ३९४ ॥
अष्टमं नवमं तत्वविचारो मम भामिनि ! ।
एवं नवविधा भक्तिः साधनं यस्य कस्य वा ॥ ३९५ ॥
स्त्रियो वा पुरुषस्यापि तिर्यग्योनिगतस्य वा ।
भक्तिः संजायते प्रेमलक्षणा शुभलक्षणे ॥ ३९६ ॥
भक्तौ संजातमात्रायां मत्तत्वानुभवस्तदा ।
ममानुभवसिद्धस्य मुक्तिस्तत्रैव जन्मनि ॥ ३९७ ॥
स्यात्तस्मात्कारणं भक्तिर्मोक्षस्येति सुनिश्चितम् ।
प्रथमं साधनं यस्य भवेत्तस्य क्रमेण तु ॥ ३९८ ॥

—अध्यात्मरामायण.

# १८ सीताहरण.

विबुधः—जे सहस्रचतुर्दश क्षणदाचरे[1] त्रिदशारि[2], ते
संगरीं पडले, पळांतचिं हारवूनि यशा रिते ।
जानकीहरणार्थ युक्ति मनीं दशानन आठवी
स्वर्णरत्नमृग[3] क्षपाचरें[4] आश्रमीं खळ पाठवी ॥ ३५९ ॥

मालिनीः—कनक हरिण जाला, पंचवट्याश्रमाला
चकितहृदय आला, श्री[5] विलोकी तयाला ।
विनवि मृग धराया तत्प्रिया, तें कराया ॥
प्रभुहि खळ मराया, जाय विश्वा तराया! ॥ ३६० ॥

मोरोपंत

" मायामृगालागिं वधूनि बाणीं । चैतन्यचर्माबर शीघ्र आणीं ।
तें दे दयाळा ! मज कंचुकीतें "।' निकें!' ह्मणे राघव जानकीतें ३६१
नभीं संचरे हेमसारंग पाहे । त्वरें ताडिला काळनिर्वाणघायें ।
पडे, प्राण त्यागी, करी थोर शब्दू । ह्मणे 'धांवण्या धांव सौमित्र बंधू'
वदे जानकी, ' देवरा[6] ! धांव वेगीं, । वनीं हंस तो वेढिला शत्रुकाgीं[7]।
'नव्हे जाण हो! मांव[8] हे राक्षसाची'।रमा क्षोभली वर्म[9] जिव्हार खोंची ३६२

मुक्तेश्वर.

१ चवदा हजार राक्षस. २ देवांचे शत्रु. ३ सोन्याचा हरिण झालेला. ४ राक्षस मारीच नांवाचा. ५ जानकी. ६ भावोजी. ७ शत्रुरूप कावळ्यांनीं ८ माया, कपट. ९ अंतःकरण मर्म.

**वसंतः**—सीता, वदे, " मदभिलाष[1] तुझ्या मनांत,
आलासि यास्तवाचि तूं कुजना[2] वनांत !
जा, नीघ, नीघ, उटजीं[3] कितवा[4] ! न राहें,
ऐसें कुकर्म न नरा, हित वानरां हें !! ॥ २६४ ॥
भार्या कसी उचित जी तुज मायसी ते ? "
ती आपणासहि वदे, ' त्यज काय[6] सीते ! ' ।
रामाकडे रडत तो धृततापॅ[7] गेला
सोडी तिला, खग जसा कलुषापगेला[8] ! ॥ २६५ ॥
तों ये दशानन, बळें हरि एकलीला,
इच्छि गतायु, उरगीसह[9] भेक[10] लीला ! ।
बाहे, रथीं गगनमार्ग धरी पळाया
तों गृध्रराज अडवी सहसा खळा या ॥ २६६ ॥
**आर्याः**—पक्षी, महापराक्रम, जटायु त्याला ह्मणे, ' अरे चोरा ! ।
हो राजकन्यकेला सोडुनियां दूर बाष्कळा ! पोरा ! '॥२६७॥

---

१ माझा अभिलाष. २ दुष्टा ! ३ आश्रमांत. ४ ठका, लबाडा. ५ आयाबहीणींची ओळख सोडणें हें पशूला शोभेल, मनुष्याला शोभत नाहीं. ६ देह. ७ दुःखी झालेला. ८ गढूळ झालेल्या गंगेला. ९ सर्पिणसह. १० बेडूक.

ऐसें जरि हित कथिलें, तें रावण सर्व वाक्य परिसून ।
तैसाचि जाय गर्वें, जटायुची[1] सोडिली न परिसून[2] ॥ ३६८ ॥
मग रावण अन्यायें खड्गें छेदूनि गृध्रपक्षातिका ।
स्वरथीं स्थापुनियां तो घेउनि गेला मनुष्यभक्ष्य[3] तिला ॥ ३६९ ॥
नेतां महासतीतें पाहे दूरून ऋष्यमूक नगें[4] ।
सुगलादि कपी देखे, सोडी कौशेयबद्ध[5] त्यांत नग ॥ ३७० ॥
आलय[6] जाउनि पाहे तों सीता राघवासि भेटेना ।
त्या समयाहुनि दारुण मृत्यु असा लक्ष्मणासि वाटेना॥ ३७१ ॥
" रुचिराक्षा नाहीं कीं वत्सा ! हें अन्यगेह[7] वाटतसे ।
इतर स्थळासि आलों चुकती अनभिज्ञ[8] लोक वाट तसे ॥ ३७२ ॥
हा कमलाक्षि! तनूदरि! सुंदरि! जाये! प्रिये ! अये! सदये! ।
विधुमुखि[9]! पिकगर्वापह[10]! अमृताहुनि गोडसें स्वयें वद, ये, ३७३
मज राजकन्यके ! तूं वरूनियां पावलीस न सुखातें; ।
खातें हें चित्तातें, सांगों कोणास मी स्वदुःखातें ॥ ३७४ ॥
सप्राणा जनकसुता असेल ? मीं काय तीस पाहिन ? ।
स्त्री हारवूनि रडतो ऐसा कोणी नसे त्रपाहीन[11] ! ॥ ३७५ ॥

---

१ जटायु सीतेला अर्थात्‌ सासऱ्याप्रमाणें होता. २ जटायूचे सर्व पंख ३ राक्षस. ४ पर्वत. ५ रेशमी वस्त्रांत बांधलेले दागिने. ६ पर्णशाळा. ७ परगृह. ८ आडमुठे लोक. ९ चंद्रानने ! १० कोकिलेचा गर्व हरण करण्यासारखा मधुर कंठ ज्याचा अशी. ११ निर्लज्ज.

नरराय देत असतां अभाग्य मीं पावलों न हा कमेला, ।
कांतेला हरविलें, हांसत असतील सर्व लोक मला!"॥३७६॥

**अनु:**—वनीं विलाप प्रभुचा ज्याचिया श्रवणीं पडे ।
रडे खग मृग व्याघ्र द्रुम वल्ली असें घडे ! ॥ ३७७ ॥

## रथोद्धता.

शोधितां वन जटायु देखिला । वत्सलें परम घातें लेखिला ।
' रावणें हरिलि जानकी ' असें । सांगतां खग रडे दयारसें ३७८
पुत्रसाचि करि राम तत्क्रिया । तातसाचि वरि गृध्र सत्क्रिया ।
गाति या सुकवि रामरीतितें । जी सुधा ह्मणति पामरी तितें ३७९

**आर्या.**—पंपेची श्री पाहुनि राम ह्मणे लक्ष्मणास " कां मातें ।
सीता टाकुनि गेली ! स्नेहासह काननीं सकामातें ॥ ३८० ॥
वत्सा ! धरारुहातें वेष्टुनि वल्ली जशाचि आहेत ।
सीतालिंगित होतों ऐसा, परि तो न पूरला हेत ! ॥ ३८१ ॥
बहु, लाजवीत होतों करि-केसरि—कीर-केकि हरिणां मीं ।
हांसत कर्म करावें भोगावें रडत तेंचि परिणामीं ! ॥ ३८२ ॥

---

१ दशरथ. २ राजलक्ष्मी. ३ जखमांनीं विव्हळ' होऊन मरणाच्या पंथास लागलेला जटायू पाहिला. ४ जटायू हा दशरथाचा मित्र होता ह्मणून रामानें त्याला पितृसम मान दिला ५ मंद गमन, कृश कटिभाग, बांकदार नाशिका, श्यामवर्ण केशकलाप, विशाल चंचल व काळे मोर नेत्र या तुझ्या गुणांमुळें मीं अनुक्रमानें हत्ती, सिंहपोपट, मोर व हरिण यांना लाजवीत होतों.

हा दयिते ! हा जानकि ! हा भामिनी ! हा सुगात्रि ! हा सीते !

हा सुदति! हा कृशोदरि!हा सुंदरि! हा वरोरु! हा सीते" ३८३

ऐसा विलाप करितां लक्ष्मण वंदुनि ह्मणे ' अहो आर्या ।

धैर्य त्यजितां कैसी मारुनि खळ सोडवाल ती आर्या ? " ३८४

मोरोपंत.

## १९ रामसुग्रीवांचें सख्य.

वनचर[1]वर माथां ऋष्यमूकानगाचा
निरखित, तंव पंपे पातला वीर साचा ।
भयचकितविचारें त्यागिला देह[2] धीरें
' गमत मजचि लागीं प्रेरिले वाळिवीरें ! ।' ॥ ३८५ ॥
जनक[3] पवन सांगे, ' राम वैकुंठराणा,
त्वरित शरण जाई, सेविं सौभाग्यपूर्णा, '।
स्तवन करुनि वाचे, अंजनीबाळ धांवे,
रघुपतिपदपीठीं भाळ ठेवीत भावें ॥ ३८६ ॥

मुक्तेश्वर.

" कोठें हो श्रीमंत ! प्रयाण करितां ? स्वनाम कळवावें; ।
स्वकुशळकथनसुधेनें मत्कर्णाच्या क्षुधेसि पळवावें ॥ ३८७ ॥

---

१ सुग्रीव, वानरांचा नायक. २ धैर्यानें देह त्यागिला. ३ वायु.

खड्गशरासनपाणी, वीरमणी, मान्य सर्व लोकांहीं, ।
वल्की, जटी, मुनीही दिसतां; नाहींच समजलों कांहीं ! ॥३८८॥

करुणाजलधर दोघे, श्यामतनू, चित्रचाप, तापहर, ।
देहद्वयधारी, कीं एक त्रिपुरघ्न सुप्रताप हर ? ॥ ३८९ ॥

मी तनय मारुताचा, नाम हनूमान् असें असे माझें ।
सुग्रीवदूत आहे; वृत्त वदा, इष्ट कर्णकामा जें ॥ ३९० ॥

वाली नाम कपीश्वर; तदनुज सुग्रीव ऋष्यमूकदरी ।
वसवितसे धाकानें, अग्रज जो तोच जाहला तदरी " ॥ ३९१ ॥

वातात्मजवाक्याचें श्रवण करुनि, रामही वनामाजी ।
सांगे स्वकथा, इच्छित होता तो आंजनेयनामा जी ॥ ३९२ ॥

मोरोपंत.

निजजनकरुणेचा सिंधु सर्वार्थदानी
अभयवचन बोले, " मित्र भेटीस आणी, ।
वधुनि अरि, तयाचा भाव नेईन सिद्धी
करूं मग चिरकाळें जानकीरत्नशुद्धी " ॥ ३९३ ॥

वातात्मजें जाउनि वातसंगें । वार्ता वदे वानरनाथ वेगें ।
धांवोनि वंदी हरिपादपद्में । योगीमुनीमानसभृंगसद्में ॥३९४॥

जीवात्मयांची अनुपम्य मैत्री । स्नेहें गमे सर्व सुखैकधात्री ।
सुग्रीवरामांकित दोन काया । चित्तीं विराली गुणभेदमाया३९५

"सीता नेतां देखिली रावणें म्यां '। सांगे वार्ता वानराधीश रामा।
'धांवे तीतें सोडवूं वातपुत्रू । गेला धाकें सिंधु लंघोनि शत्रू' ३९६
चिरें भुषणें दावितां जानकीचीं । जगन्नायका शोकसंताप जाची ।
कपी शांतवी हस्त ठेवूनि पायीं । ह्मणे, ' आणितों म्यां वधू. भाष वेई

मुक्तेश्वर.

एकेंचि बाणें हृदयांत ताडी । श्रीराम वाळीस पळांत पाडी ।
दे बंधुचें राज्य, कळत्र, मित्रा । गातात कृत्या कवि या विचित्रा ३९८

मोरोपंत.

---

## २० वानरांचें बलाबल.

तारा, रुमा वोपुनि भोगकाजा । युवापदीं अंगद वीरराजा ।
साधूनियां सुग्रिवमित्रभावा । संतोष झाला नरदेवदेवा ॥ ३९९ ॥

मुक्तेश्वर.

हा निश्चय केल्यावर कपिला प्रभु तो ह्मणे, ' स्वनगरा जा '
वनकालीं गृह केला रामें प्रस्रवणनाम नगराजा ॥ ४०० ॥
वर्षऱ्यायत वासर वर्षाकालीं जसेतसे सरले ।
गगनापासुनि सचपल हळू हळू मेघ सर्व ओसरले ॥ ४०१ ॥
" किष्किंधाश्रीलाभें झाला मदमत्त, नाठवी मातें ।
सौमित्रे ! जाउनियां धाडावें त्यास कालधामातें' ॥ ४०२ ॥

हें वाक्य राघवाचें ऐकुनियां, दिव्यचापशरधारी ।
लक्ष्मण किष्किंधेला गेला सक्रोध तो विराधारी ॥ ४०३ ॥

## साकी.

जातां लक्ष्मण किष्किंधेतें गुण जोडुनि चापातें ।
तापातें कपि पावति जैसे करुनि महापापातें ॥ ४०४ ॥

अंगदतारायुत सुगळ ह्मणे, " बा समज, न कोपावें, ।
मानूं हृदयांत कृतघ्नत्वा वास मज नको, पावें ॥ ४०५ ॥

गेले दूत ऋक्षकपिकटकें येतिल, करितिल कार्या, ।
आर्या भेटवितिल, वधुनि रणीं दशवदनाप्रति भार्या " ॥४०६॥

तों बहु लक्ष यूथपति[1] आले, गगनीं भरला धुरळा, ।
जे ह्मणणारे निज नखरांतें वज्रशिळांतें भुरळा[2] ॥ ४०७ ॥

जांबवदंगद, वायुसुत बळी, अन्यहि हरि[3] शमनाशा[4] ।
धुंडाया पाठविले गेले, वाहुनि अरिशमनाशा[5] ॥ ४०८ ॥

शोध न लागे प्रभुदयितेचा, अवधि[6] लंघिला, श्रमले, ।
उग्र शासना भ्याले सुगळा, सांगद सर्व भ्रमले, ॥ ४०९ ॥

---

१ वानरसमुहांचे नायक. २ भात फार दिवस एके ठायीं ठेवलें कीं त्यांत पंखाचा एक प्राणी पडतो तो. ३ वानर. ४ यमाच्या दिशेला, दक्षिणेला. ५ शत्रूची रग जिरवायची आशा धरून. ६ सीताशोध करून वानरांनीं एक महिन्यांत परत आलेंच पाहिजे अशी सुग्रीवाची आज्ञा होती.

सागरतीरमहेंद्रपर्वतीं झाले सिद्ध मराया ।
कीं न सुचेचि उपाय तयांला मृत्युविपत्ति तराया ॥ ४१० ॥
" धन्य जटायु यशस्वी, न तसें अस्मद्भाळीं मरण ।
न रण, व्यर्थ मरतसों, घडलें न प्रभुचें परिचरण " ॥ ४११ ॥
अग्रज जटायुचा संपाती तो ऐके ती वाणी ।
ज्याच्या मनीं असें कीं आपण भक्षावे ते प्राणी ! ॥ ४१२ ॥
जाणुनि अनुजमरण तो त्यांतें वृत्त पुसे, तें हरि ते ।
कथिति सविस्तर रामप्रभुचें सद्गुणवर्णन करिते ॥ ४१३ ॥
' नेली श्रीसीता दशतुंडें वरबळमत्तें अनयें ।
रोधुनि मार्ग प्रणत सोडिला सदयें माझ्या तनयें ' ॥ ४१४ ॥
ऐसें वदतां होय सपक्ष व्योमीं भरला उडुनीं ।
तो हर्षप्रद नमिला कपिनीं, अमृतांशु जसा उडुनीं ! ॥ ४१५ ॥
' शतयोजन सिंधु उडुनि जाणें, कोणाची किति शक्ती ? ' ।
ऐसें अंगद युवराज पुसे व्हाया तदभिव्यक्ती ! ॥ ४१६ ॥
' दशयोजनें उडेन, ' गज ह्मणे; दुसरा गवाक्ष ' वीस; ' ।
शरभ 'तीस' ऋषभहि ' चाळीस ' प्रेक्षीन नमी श्रीस; ॥ ४१७ ॥
' पन्नास ' गंधमादन नामा; मैंदाभिध कपि ' साठ ' ।
द्विविद ह्मणे ' सत्तर, अधिक न मी जरि थापटिली पाठ ' ४१८
वीर सुषेण ह्मणे, ' मी गावें जाइन उडोनि ऐशीं ' ।
ऋक्षेंद्र वदे, ' नव्वद, संप्रति मच्छक्ति असें ऐशी !' ॥ ४१९ ॥

अंगद ह्मणे ' उडुनि जाइन मीं लवण जळधि शतगावें ।
परि वाटे मज परतुनि येतां बळ माझें न तगावें !'॥ ४२० ॥
वृद्ध ह्मणे ' उडसिल युवराजा ! जरि तूं बहुशत गांवें, ।
भृत्यांहीं न प्रेषावें, न स्वामीनेंहि जावें ! ॥ ४२१ ॥
एकांतस्थित मारुतिस ह्मणे ' सुगळासम तूं बापा ! ।
लक्ष्मणसम किंबहुना रामप्रभुसम तूं निष्पापा !' ॥ ४२२ ॥
गावीं रामचरित्रें हो ! । तारक परमपवित्रें हो ! ॥ धृ० ॥

मोरोपंत.

कपी बोलती ' काय आतां करावें ! ।न लागे सिताशुद्धि तेव्हां मरावें !।
ह्मणे मारुती ' वीर हो! स्थीर बैसा।तिन्ही लोक पाहोनि येतों तमासा ! '।
भयासूर तो भीमसिंधू उडाला । त्रिकूटाचळाहून पैलाड वेला ।
पुढें सर्वही पाणजंजाळ वाहे । हनूमंत विस्मीत होऊनि राहे ॥४२४॥

रामदास.

## २१ लंकानगरी.

तो हृदयीं श्रीमद्रघुनाथपदातें नमूनि, लंकेला ।
पाहे, लघुदेहातें घेउनि, सर्वत्र शोध[1] बहु केला ॥ ४२५ ॥

मोरोपंत

---

१ सीतेचा शोध

गृहा गोपुरांचा बहू दाट खेटा । सदा सर्वदां वाहती सर्व वाटा ।
बिदी हाट बाजार कुँचे दुकानें । महामस्त ते हस्त जाती गुमानें ॥

बहू सज्ज तें राज्य लंकापुरीचें । पुरीमाजि तें सैन्य मोठ्या बळाचें ।
दिसेना तयालागि झुंजार कोणी । बळें जिंकिले पीडिले लोक तीन्ही ॥

गुढ्या गोपुरें, देउळें ते अपारें । हुडे कोठ जाळांधरें थोरथोरें ।
सुवर्णाचळामाजि तें तेज फांके । तया पाहतां कीरणें दृष्टि झांके ॥

पुढें पाहतां जावया रीग नाहीं । न सूचे मनीं मानसीं यत्न कांहीं ।
घरें गोपुरें पाहिल्या धर्मशाळा । अकस्मात त्या देखिल्या बंदिशाळा ॥

दीनासारिखे देव ते दीन झाले । नसे शक्ति ना युक्ति पोटी गळाले ।
भयाभीत ते कांपती दैन्यवाणे । बहू गांजिले दुःख ते कोण जाणे ॥

सुरांकारणें कोप भीमासि आला । मनामाजि आवेश तो थर्थरीला ।
रूपें भर्भरीला तमें गर्गरीला । प्रसंगीं तये मारुती गुप्त झाला ॥

मनामाजि आंवांकिलें सर्व कांहीं। सिमा सांडिली, तूळणा त्यासि नाहीं,।
बहू मातले, गर्व मोठया बळाचा । तया सोडितो दास मी राघवाचा ॥

रामदासस्वामी

---

१ गर्दी २ रस्ते ३ बाजार ४ गल्ल्या ५ प्रतिस्पर्धी ६ बुरूज ७ जलाशय ८ स्फुरूं लागला. ९ रूपच भयानक झालें. १० रागानें लाल झाला. ११ तर्क केला.

# २२ सीताशुद्धि.

आर्या:– तेथुनि निराश होऊनि मारुति गेला अशोकवनिकेला ।
येथें असेल सीता ऐसा निश्चय मनोभुवानें केला ॥ ४३३ ॥
कुरबक, मरुबक, वंजुल, तिलकामलक, प्रियाल, हिंताल, ।
याकंद, कुंद, तिंदुक, चंपक, चांपेय, केतकी, ताल, ॥ ४३४ ॥
ऐसे संचय तरुचे अवलोकुनि हेमशिंशिपा[1] पाहे ।
तीवर चढोनि देखे तो रक्षस्त्रीगणीं[2] अपापा हे ॥ ४३५ ॥
चित्तीं ह्मणे मरुत्सुत, दैवें तूं राक्षसींसवें तुळसी ।
अनुचित केवळ झालें, मसणीं भांगेमधें जशी तुळसी! ॥ ४३६ ॥
हे आंजनेय[3] चिंतुनि झाला संतप्त जेंवि शिखिकुंड[4] ।
तो रात्रिचरम[5] भागीं आला तेथें सकाम दशतुंड ॥ ४३७ ॥
तो पापपुंज, निस्त्रप[6], निर्मर्याद, स्वरार्त[7], बडबडला ।
तें अश्राव्य, अवाच्य श्रवण करुनि मारुतीहि गडबडला ॥ ४३८ ॥
साकी:–साध्वी तृण आड करुनि बोले ' रे मत्ता ! हरिणा मी ।
नरसिंहस्त्री समजेल तुला कामांधा ! परिणामीं ॥ ४३९ ॥
उटजांतुनि कपटें त्वां प्रभुवर सानुज दवडुनि दूर ।
पळविलि चौर्यें वीरवधू, घे स्वमुखांचि ह्मणुनि शूर ॥ ४४० ॥

---

१ सुवर्णाची सीताफळी. २ राक्षसींच्या समुदायांत ३ अंजनीपुत्रमारुती. ४ अग्निकुंड. ५ पहांटेस. ६ निर्लज्ज. ७ कामपीडित

प्रभुफणिपतिच्या पचविसिल कसा तूं उंदीर मणीतें ।
विघ्नोपहता होऊं देईल तो तुंदी रमणीतें ? ॥ ४४१ ॥
मज करुनि उपायन जासील प्रभुला जरि तूं शरण ।
तरण घडेल व्यसनीं, नाहीं तरि तुज आलें मरण ! '॥४४२॥
इत्यादि वदे देवी, कोपें दशकंठ ह्मणे, ' उडसी ।
अवें मुग्धे ! बेट भेटतां दुःखसमुद्रीं बुडसी' ॥ ४४३ ॥
त्या समजावुनि त्याची दयिता घेउनि गेली मागें ।
करिति राक्षसी जाच क्रूरा, विषकटु वदती रागें ॥ ४४४ ॥
त्रिजटा त्यांसि दटावूनि ह्मणे, ' साध्वी छळितां कां गे ! '॥
दुःस्वप्न दशास्यक्षयसूचक अनुभविला ती सांगे ॥ ४४५ ॥
मारुति कुशल कळवी, सुगळाचें सख्य वाळिवध सांगे ।
स्तवुनि ह्मणे ' चाल, तुला नेतो माते! श्रमसी कां ? गे॥४४६॥
आर्याः–" हा रक्षोधम मी निजपातिव्रत्यानलांत होमीन ।
परि इच्छा आहे कीं जन रामयशोर्णवांत हो मीन! ॥४४७॥
हा रघुनायकहस्तें मरेल रिपु जेधवां, धर्वासहित ।
जाइन पुरीस तेंव्हां, होइल साकेतसौधवास हित " ॥४४८॥

१ प्रभुरूप फणिपतीचा मणी जी मी सीता. २ गणपती. ३ नजराणा. ४ मंदोदरी. ५ रावणाचा नाश ज्यांत पाहिला असें स्वप्न; येथें स्वप्न हा शब्द पुल्लिंगी आहे. ६ मी आपल्या पातिव्रत्याच्या तेजानें. ७ जाळीन. ८ पतिराम त्या सह ९ अयोध्येंतल्या राजवाड्यांतलें राहणें मग सुखदायक होईल.

साकी:-मारुति ह्मणे' असेंचि घडेल, प्रभुचे अक्षय तूर्ण, ।
जातों, प्रभुतें घेउनि येतों, द्यावी कांहीं खूण ' ॥ ४४९ ॥
मुद्रा घेउनि, चूडामणि दे, मारा या संदेशीं ।
मज कीर्तिस संरक्षा' ऐशा सांगे श्री संदेशा ॥४९०॥
आज्ञा आशी घेउनि हर्षें मारुति उपवन मोडी, ।
झोडी वनपाळातें, उग्रें राक्षसकटकें तोडी ॥ ४९१ ॥

—मोरोपंत.

## २३ लंकेचा विध्वंस

फळें भक्षिलीं सर्व नानापरींचीं । बहुस्वाद वर्णें कळाकुसरीचीं
कपीवीर तो तृप्त झाला, निवाला, । पुढें वृक्ष मोडावया सिद्ध झाला ॥
तरू मोडिले, पाडिले, ऊपडीले, । किती झोडिले, झाडिले, चूर केले,।
गिरीसारिखे ढीग झाडूनि टाकी । तयाला असंभाव्य राक्षेस हाकी ॥
वनें मोडितां मोडितां हाक झाली । असंभाव्य ते दैत्यमांदी मिळाली ।
गॅलोले, कमाँना, करीं भिंडिमाळा ! बळें हाकितांनाद गेला भुगोळा ॥
रिपू झोडिले, पाडिले वृक्षघातें । भुमी लोळती दैत्य होवोनि प्रेतें ।
पुढें देखितां जंबुमाळी कुटीला । बळें ओखंया आपटीला पिटीला ॥

१ माता. २ मूर्खांच्या राजास. ३ असंख्य. ४ ओरड. ५ राक्षसांच्या टोळ्या. ६ गोळे. ७ तिरकमटे. ७ गोफणगोटे. ९ रावणाचा पुत्र.

तया टाकितां पाश मोठाचि होतो । लघूरूप होवोनि नीघोन जातो ।
कदाही पडेना कदा सांपडेना । तेणें मारिली दैत्य ऊदंडसेना ॥
' अरे मर्कटा ! थोरअन्याय केला' । ह्मणे रावणू,'मारितो सीघ्र तूला'; ।
ह्मणे मारुती ' काळ मारूं शकेना । कृपाळूपणें तोषला रामराणा ' ॥
न वाटे खरें सांगतां रावणाला । ह्मणे, ' वानरूलांगुळीं अग्नि घाला' ।
किती एक ते आणिलीं आज्यतेलें । किती एक ते मोगरेलें फुलेलें ॥
बळें चेतला वन्हि नेटे भडाडी । कडाडीत ज्वाळा दडाडी धडाडी ।
कपीवीर तो वाड झाला उडाला । पुढें जाळिता जाहला त्रीकुटाला ॥
गृहागोपुरांमाजि तो पुच्छ घाली । त्रिकूटाचळीं आगि नेटें निघाली ।
बिदी, हाट, बाजार, चौबार, कुंचे । पळें बोंबली नागिरा लोकनाचे ॥
बहुतापरीची बहू हाक झाली । ' पळारे! पळारे! पळा! आगि आली'।
बहूतांपरीच्या बहूसाल शाळा । जळाल्या विवीधा विचित्रा विशाळा ॥
महावज्र लांगूल कल्लोळ जाला । परी पाहतां रोम नाहीं जळाला ।
गर्दादीत काया समुद्रांत घाली । निवाला कपी पुच्छ ज्वाळा विझाली ॥
नमस्कार घालूनियां जानकीला । पुढें मारुती शीघ्र सिंधु उडाला ।
सभामंडळीं रामसन्मूख पाहे । उभा दास साकल्य तो सांगताहे ४६ २

रामदास स्वामी.

---

१ वानराची शेपटी पेटवा. २ तेलातुपांचे बुधले. ३ मोठा, प्रचंड. ४ जोरानें ५ केश. ६ तप्त झालेली, पेटलेली. ७ सविस्तर.

# २४ बिभीषण.

## आर्या.

" रघुनाथातें महिषी द्यावी, आतां करूं नको अनय ।
धन, यश, जीवन रक्षी, शरणागत जा धरूनियां विनय " ॥४६४॥
ऐसें निजानुजन्मा वदतां विहित, स्वलोककीर्तिहित, ।
अहितें गणुनि अहि तसा फिरला बंधूवरि क्षमारहित ॥ ४६५ ॥
" मी त्रिभुवनराजा, मी शास्ता, मी वंद्य, रत्नभोक्ता मी, ।
मी ज्ञानी, मी मानी, मी प्रभु, मी स्तुत्य, मी तुझा स्वामी ! ॥४६६॥
हरिवरुणश्रीदयमज्वलनश्वसनग्रहेशसोमांतें ।
मी जिंकिलें, अशातें उपदेष्टा काय तूं शिशो ! मातें ? ॥ ४६७ ॥
त्या रामपामराला तरवेल विशाल सिंधुपाल कसा ? ।
दुसरा मद्बलसागर, मज हरिला तो कुरंगबालवासा ! ॥ ४६८ ॥
जिंकुनियां भुजवीर्यें सुर, त्रिलोकी क्षणांत वश केली; ।
रामा वनेचरा जरि हरिली हे तों समस्तनृपकेली ! ! " ॥ ४६९ ॥
यापरि अन्यायप्रिय रावण कोपस्मरज्वरें बरळे ।
सरळेचि वक्र दिसती काळानें दृष्टि जेधवां तरळे! ॥ ४७० ॥

—मोरोपंत.

---

१राणी सीता. २ धाकटा भाऊ बिभीषण. ३ शत्रू ४ सर्पासारखा. ५ इंद्रवरुण, कुबेर, यम, अग्नि, वायू. सूर्य व चंद्र.

सभेमाजि धिक्कारिलें रावणानें । उठोनी पदें ताडिलें दुर्जनानें ।
बहूतांमध्यें येकला धर्ममूर्ती । मनीं खोंचला तो उदासीन चित्तीं ॥
मनू भंगला हो तया धार्मिकाचा । पुढें त्याग तत्काळ केला सभेचा ।
चढाला नभोमंडळालागि वेगीं । पुरोहीत चत्वार ते पृष्ठिभागीं ॥
महाभक्त तो लागवेगें निघाला । अतीआदरें भेटला राघवाला ।
परी अंतरीं कोण कैसा कळेना । तया ठेवितां राजनीती[1] मिळेना ! ॥
समस्तांकडे पाहिलें राघवानें । बहूतापरी बोलिले ते सभेनें ।
मनीं पाहतां देखिला दैन्यवाणा । कृपाळूपणें भेटला रामराणा ॥
उभें राहिलें भाग्य बिभिषणाचें । करी अंतरीं ध्यान पादांबुजांचें ।
भिजे दिव्य सर्वांग त्या अश्रुबिंदीं । मिठी घातली रामपादारविंदीं ॥
कृपासागरें ठेविला हस्त माथां । चिरंजीव लंकापती होय आतां ।
प्रसंगीं तये थोर आनंद झाला। दिल्हे अक्षई राज्य बिभिषणाला॥४७६॥

## २५ रामरावणांचें युद्ध.

मा०—रघुतिलकनिदेशें सेतु केला नळानें
दळसम[2] धरिलो तो सागराच्या जळानें ।

---

१ शत्रूच्या कळपांतून बिंभीषण आला होता म्हणून त्याला आपल्या पक्षांत घ्यावा की न घ्यावा असा प्रश्न निघाला. २ पानासारखा.

प्रभुसह कपिसेना सेतुनें जाय पार[1]
द्विगुणित[2] उतराया लागले याम बारा ॥ ४७७ ॥
सुगळसम सुवेळीं राम वेंघोनि राहे
कनकरचित लंकादुर्ग दुरूनि पाहे ।
आरिस निरखि, धांवे क्रुद्ध सुग्रीव, पाडी
मुकुट, गरुड जैसा पन्नगा तेविं झाडी ॥ ४७८ ॥

**वैतालियः**—प्रभुमस्तकचाप[3] दाखवी । सतिला शोकविषाग्नि चाखवी ।
सरमा परमाप्तता धरी । कळवी छद्म, तदश्रुतें हरी ॥१७९॥

## आर्या.

रघुवीर राजनीतिप्रवीण तो अंगदासि दूतत्वें ।
सत्वें करूनि धाडी, निज रिपुपाशीं कथूनियां तत्वें ॥४८०॥
" चतुराननजगदीश्वर[4] त्याचा तूं पौत्र[5], भूतपतिदास[6], ।
श्रुतसंपन्न[7], नयज्ञ, ब्राह्मणसुत, पावलासि सुपदास ॥ ४८१॥
सुरभूसुर[8] यत्नानें पूजावे, धर्मसेतु[9] रक्षावे, ।
निर्मल यश जोडावें, व्यसनानाचार ते उपेक्षावे ॥ ४८२ ॥

---

१ पलीकडे २ चोवीस प्रहर. ३ 'मी रामाला मारलें आतां मला वश हो' असें रावणानें सीतेला खोटेंच सांगून भ्रमांत पाडलें, तेव्हां बिभीषणाची पत्नी सरमा हिनें हें छद्म ह्म. कपट आहे असें सांगून तिचें समाधान केलें. ४ ब्रह्मदेव ५ नातु ६ शंकराचा भक्त. ७ वेदशास्त्रवेत्ता. ८ देव ब्राह्मण. ९ धर्ममर्यादा.

वैदेहीला तूं जरि आणुनि देशील आजुनी मजला ।
मी ही लंका--जीवन-अभय, समर्पीन तत्क्षणीं तुजला॥४८३॥
नाहीं तरि सायक हे, हे भुज, हा खड्ग, हें धनूरत्न, ।
मी सज्ज जयधनानें, तूं निधनातें, स्वयें करी यत्न" ॥४८४॥

रथोः—कोपला बहु कुधी[1] ह्मणे 'धरा' चार[2] झोंबति जसे फणी[3] धरा[4] ।
वीर अंगद उडे बळी पुरा।बाहु झाडुनि करी तयां चुरा॥४८५॥

मोरोपंत

कपी धांवती लक्ष कोट्यानकोटी । बळें गर्जती थोर आनंद पोटीं ।
गिरीकंदरें देश लंघून जातीं । शिळाशीखरें शीघ्र घेऊनि येती ॥
कपी मोडती वाड झाडें कडाडां । कडे पाडती पर्वताचे खडाडां ।
उड्या घेति आकाशपंथें धडाडां । बळें टाकिती सिंधुमध्यें धडाडां ॥
पुढें पाहतां लक्षकोट्यानुकोटी । रणीं पाडिले हुंबती वीरजेठीं[5] ।
धडें तूटली राक्षसावांनरांची । शिरें दाटलीं घोर माहाविरांचीं ॥
बहु झुंजता झुंजतां भग्न झाले । रणीं सर्वही पुत्रमंत्री निमाले ।
नरां वानरांला जयो प्राप्त झाला । क्षयो राक्षसां शीघ्र ठाकूनि आला ॥
ह्मणे राम ' रे रावणा ! मृत्य आला। दिल्हें अक्षयी राज्य बीभीषणाला॥
सितेकारणें थोर कापध्य केलें । अभाग्या ! तुझें सर्वही राज्य गेलें ' ॥
बळें कोपले रुद्र कालाग्नि जैसे । अरी राय ते मातले भीम तैसे ।
तया झुंजतां कोण कोणास वारी ? । रणीं भिडती राम कोदंडधारी ॥

रामदासस्वामी

---

१ रावण. २ चार राक्षस. ३ सर्प. ४ पर्वताला. ५ वीरश्रेष्ठ

## साकी.

सेनापति प्रहस्त[1] निवटिला, रावण केला भग्न
प्रथम रणीं झालें चिंतत क्षणदाचरबळ[2] मग्न ॥ ४९२ ॥
उठतां कुंभकर्ण तो क्रोधें, प्लवगभट[3] गिळी सगळे ।
तन्नादें खचलीं नगशिखरें; मग कपिबळ कां न गळे? ॥४९३॥
खंडुनि भुजचरणशिर प्रभुनें रणरंगीं लोळविला, ।
धाडिला परलोका, दशमुख तच्छोकें पोळविला. ॥ ४९४ ॥
देउनि धैर्य पित्यातें मेघध्वान[5] महामायावी ।
प्रभुसह सर्व खिळी[6], कीं विजयश्री निजधामा यावी ॥४९५॥
मारुति दशमुखबंधु निराळे करुनि कश्मळें[7] गिळिले ।
वर्षुनि खरतर शर गगनस्थें गुप्तें सर्वहि खिळिले ॥ ४९६ ॥
जांबवदुक्तें मारुति गेला श्रीकैलासाजवळ ।
आणी औषधिशृंग गमे तें तत्पाणिस्थित कवळ[8] ॥ ४९७ ॥
त्या दिव्यौषधिगंधवहानें[10] उठले विशल्य सर्व ।
पावुनि शिखर पुन्हा ये, न धरी अद्भुत कर्में गर्व ॥४९८॥

---

१ ह्या प्रहस्ताला नीलवानरानें प्रचंड धोंड डोक्यावर फेंकून मारले. २ राक्षसांचें सैन्य. ३ वानरयोद्ध. ४ पर्वतशिखरें खचलीं. ५ मेघनाद. ६ ब्रह्मास्त्राचा प्रयोग करून रामसेनेस मोहून टाकी. ७ मूर्छेनें. मारुति व विभीषण ह्या शिवाय सर्व मोहनास्त्रवश झाले. ८ त्याच्या हातांतला घांस. १० वायूनें.

दारुण रण रावणि करि परि तो प्रभुच्या अनुजें वधिला ।
शक्र ह्मणे, ' उद्धरिला कांटा माझ्या हृदयामधिला' ॥४९९॥
रावण होय प्रभुबंधूरीं उग्र शक्ति शिरकविता ।
ती त्याचें कांपवि जसि मुनिची रसिकाचें शिर कविता! ५००
तेव्हां हि उठवि मारुति आणुनि औषधिगिरिशिखरातें ।
वर्णुनि सांगे सर्व कवींस प्रभु कीं ' यश विखरीं तें !॥५०१॥
मातलि सारथि वंदी प्रार्थी, प्रभु शक्ररथीं चढला, ।
पढला गुरुपाशीं तें प्रकटी, शत्रुक्रोधें कढला ॥ ५०२ ॥
प्रभुहि न आटे, अरिहि न आटे, शस्त्रांहीं नभ दाटे !
वाटे दुर्जय दशमुख समरीं, सुरहृदय भयें फांटे ॥ ५०३ ॥

मोरोपंत.

## २६ रावणाचा मृत्यु.

मालिनीः—प्रभुसह खळ भांडे तो अहोरात्र सप्त ,
त्रिदश मुनिहि झाले, युद्ध पाहोनि, तप्त; ।
उडवि दश शिरें जों तोंचि आलीं नवीनें !
बहु नवल कथावें काय हो तें कवीनें ? ॥ ५०४ ॥

---

१ इंद्रजित. २ लक्ष्मणाच्या छातींत. ३ वाल्मीकिमुनीची. ४ पसरा. ५ माघार घेई. ६ देव.

प्रभु करि बहु चिंता, जो श्रितस्वांत शोधी।
' रविहृदय ' जपाया तो अगस्त्यर्षि बोधी।
दिनकर वर दे या ईश्वरातें, घडाया
विजय, अरि पडाया, कीर्ति विश्वीं जडाया॥ १०५॥

रघुवीरशराघातें भिन्नहृदय तो पडे गतप्राण।
रिपुजीवनें धन घेउनि पुनरपि तूणीं प्रवेशला बाण॥ १०६

रावणतनु जगतीवर, रामावर देवपुष्पवृष्टि गळे!।
बाष्पें निशाचरांचे अमरांचे जाहले निरुद्ध गळे ॥ १०७॥

सुप्रभ दिनमणि झाला, अतिशीतल मंद गंधवह वाहे,।
त्या पर्वी ब्रह्मांड प्रभुकीर्तिक्षीरसागरीं नाहे ॥ १०८ ॥

पृथ्वी:—अशेष सुर हर्षले, कुसुमराशिंतें वर्षले,
जयध्वनिहि माजले, अमित दुंदुभी वाजले,।
बहु प्रभुयशोरतें नटति अप्सरांचीं शतें,
सुरर्षिसह पर्वतें, महित गाति गंधर्व ते. ॥ १० ९॥

—मोरोपंत.

---

१ आश्रितांचें जो चित्त शोधी ह्म. शुद्ध करितो. २ आदित्यहृदय नामक मंत्र. ३ शत्रु जो रावण त्याचें प्राणरूप धन. ४ भात्यांत. ५ कंठ. ६ नाचतात. ७ ऋषिविशेष.

ह्मणे राम बीभीषणा ' जाय आतां । बहूतापरी तोषवावें समस्ता ।
निर्माल्यावरी वैर कांहो करावें ? विवेकेंचि मन्दोदरी निववावें,' ॥९१०॥

रामदासस्वामी

# २७ सीतादेवीचें दिव्य

समस्तीं सिता देखिली आदरेसी । असंभाव्य सौंदर्य लावण्यरासी ।
तये देखतां सर्व सूखें निवाले।कपी बोलती'आजि निःपाप जालें'९११
तयीं राघवें पाहिलें जानकीला । पुढें भ्रूलता वक्र ! आव्हेर केला ! ।
कितकीं मनामाजि संकेत केला।तिहीं कल्पिले अंतरीं दोष तीला९१२
रघूनाथ हा हेत जाणे मनाचा । सदा सर्वदा साक्ष सर्वे जनांचा ।
जिवांतील जाणे, तया चोरवेना।महापातकी पाप त्याचें सरेना ॥९१३
ह्मणे राम तो जानकीलागि 'जावें।स्वइच्छा सुखें त्वां दिगंतीं भ्रमावें !'।
अधोमूख सीतावलोकी भुमीतें । मही भिजती जाहली अश्रुपातें ।९१४
ह्मणे ' न्याय अन्याय सर्वे बुडाला ; दिसे आजि कल्पतरू वांज जाला
बहूसाल बोलोनियां काय आतां'।महासौख्य तें पावलें भस्म होतां ९१५
मनामाजि पूजा यथासांग केली । पुढें जानकी पावकामाजि गेली ।
तये स्पर्शतां पावकू शुद्ध जाला।प्रसंगीं तये शांत जाला निवाला९१६

१ ' मरणांतानि वैराणि '

तयामाजि ते जानकी शोभताहे । समस्तै सभा लोक त्रैलोक्य पाहे ।
पुढीं घालिजे पूतळी कांचनाची । तयाहूनि ते दिव्य काया सितेची ॥
जगज्जननी सीघ्र बाहेरि आली । सभे देखतां वान्हि सीता निघाली ।
सुरीं अंबरीं पुष्पवर्षाव केला । नभीं दुंदभी वाद्यकल्लोळ जाला॥११८॥
सिता मुख्य ते पावकामाजि होतीं । वृथा रावणें चोरिली हे वदंती ।
असंभाव्य ते वाद्यकल्लोळ गाजे । कपीवाहिनीमाजि आनंद माजे११९.

—रामदासस्वामी.

# २८ पुष्पक विमानांतून परतणें

## घनाक्षरी.

यश मेळवी धवळ । जेंवी सुधेचा कवळ
शीघ्र आणवी जवळ । पुष्पका वहावया ॥
रक्षे:कपीशांचा हेत । जाणुनी तयांचे चेत ।
हर्षवी सैन्या समेत । त्या सख्यांतें घेउनी ॥
सदार सानुंज राम । पुष्पकीं विश्वाभिराम ।
भक्तकल्पद्रुमाराम । बैसे स्तुती सेवुनी ॥

१ अमृताचा घांस. २ राक्षसवानरांचा हेतु. ३ सीतेसह. ४ लक्ष्मणासह. ५ आपला वाडा.

श्रीतें सांगे शत्रुघूकें-[1] सूर्य ' तो हा ऋष्यमूक ।
जेथें वियोगाची हूक[2] । सुग्रीवमंत्रें शमे ॥ ९२० ॥
हे पंपा सरसी[3] जाण । येथें तापले मत्प्राण ।
त्वद्विश्लेषीं[4] काम बाण । हाणी, काळसा गमे ! ॥
या गोदेतें प्रणिपात ! करीं, तीर्थे तीर्थव्रातें[5] ।
इच्या पोटीं ह्मणे ' मात-[6] । रव त्वं महादये ' ॥
कुंभजाचा[7] मनोरम, । शरभंगाचा आश्रम, ।
हा अत्रीचा, जेथें श्रम । आमुचा न राहिला ॥
गंगेतें डोळे भरून । पहा नमन करून ।
संकटाब्धींतें तरुन । आलीस इच्या बळें !
हें गुहाचें शृंगवेर । साकेत सीते ! हेर ।
नमस्कारीं, वाटे येर । पूर यापुढें दुजे " ॥ ९२० ॥

—मोरोपंत.

## २९ भरतादिकांची भेट.

दोहाः—रामबिरह सागरमहँ, भरत मगन मन होत ।
विप्ररूप धरि पवनसुत, आयगयउ जिमि पोत॥९२१॥

---

१ शत्रुरूप घुबडांना सूर्यासारखा. २ त्रास, पीडा. ३ सरोवर ४ तुझ्या वियोगामुळें. ५सकल तीर्थें. ६ ' हे महासदये! माते ! तू माझें रक्षण कर ! ' ७ अगस्त्यमुनीचा

बैठे देखि कुशासन, जटामुकुट कृश गात
राम राम रघुपति जपत, स्रवत नयनजलजात ॥१२२॥

—तुळशीदास.

ह्मणे " मारुता ! राघवाच्या वियोगें । पळें भासती ते किती काळ यूगें ।
महद्भाग्य आलासि येणें प्रसंगें । रघुनाथ तो भेटवी लागवेगें " ॥१२३॥

—रामदास

पंचचामरः—सानुज प्रभूत्तमासि जाय चिंतित क्षण
प्रेक्षितां दिसे विमान भव्य पुण्यलक्षण ।
वाटला विलोकित्यांस गाय वत्सल क्षण
श्रीनिवास, तोहि साधुराय वत्सलक्षण ॥ १२४ ॥
लेववूनि पादुका पदाब्जयुग्म पाहिलें
साधुनें तयावरि स्वशीर्षराज्य वाहिलें ।
हुंगतां शिरीं दयासमुद्र अश्रु वर्षला
भेटला सुतास तात तेंवि राम हर्षला ॥ १२५ ।
वृद्ध जे गुरुप्रधान ते सुखांत वातले,
पातले समस्त पौर, दर्शनेंचि मातले, ।
नाचल्या वराप्सरा, मृदंग वेणु वाजले ,
दिव्य दुदुंभिध्वनीस मेघनाद लाजले ॥ १२६ ।

—मोरोपंत

# ३० रामाची कृतज्ञताव्यक्ति

शा०– ' ऋक्षाधीश सुषेण अंगद नळ स्नेही भले भागले
हे सुग्रीव बिभीषण प्रियकर भ्राते खरे मागले ।
हा वातात्मज, हे गजादि सकल प्रज्ञाबळें आगळे,
देणारे जय, यापुढें परबळें त्रासें करी ' आ, ' गळे! ॥१२७॥

वसंत:–यांहीं दिला विजय साधुनि आर्य हो ! या,
हे हेतु सिद्ध अतिदुर्घट कार्य होया ।
हा दाससा सतत लक्ष्मण वत्स माझ्या
देहा जपे बहु जसा शिव सत्समाजा ॥ १२८

सौमित्रि ह्मणे ' आर्या ! गुर्वाशीर्वाद सतत तुज जपला ! ।
निष्फळ होइल कैसें सानुज ससचिव भरत जें तपला' ॥२२९॥

—मोरोपंत.

कपी सुग्रिवा अंगदा जांबवंता । गजा मारुता आणि नैरुत्यनाथा ।
समस्तांसि सन्मानिले रामचंद्रें । सुधाउत्तरीं तोषवीलें नरेंद्रें ॥१३०॥
समस्तांकडे पाहिलें राघवानें । तयां सर्व रोमांच आले स्फुराणें ।
कपी बोलती सर्व कारुण्यशाचा । स्तुती ऐकतो राम सिंधू सुखाचा ॥

१ पूर्वजन्मीचे भाऊ. २ बुद्धिबळानें श्रेष्ठ. ३ शत्रुबळ आ वासून पडतें.
४ शंकर भक्तमंडळास जसा जपतो तसा.

"गिरीकंदरामाजि आम्हीं असावें । नरी देखतां वानरीं शीघ्र जावें
समर्थ सर्व कावीली मर्कटांला । महासुकृता पार नाहीं सुखाला ॥
कृपाळूपणें राघवें थोर केलें । वरें वोखटें सर्व साहोनि नेलें ।
बहू देखिलें सौख्य नानापरीचें । प्रभो ! श्वापदांलागि हें प्राप्त कैचें? ॥
सभाग्याचिये संगतीनें असावें । बहूतापरीचें बहू सौख्य घ्यावें ।
तयासारिखें सर्व आलांसि झालें । महावैभवें चित्त सूखें निवालें" ॥

रामदासस्वामी.

## ३१ राज्याभिषेक.

अथाभिषेकं रघुवंशकेतोःप्रारब्धमानन्दजलैर्जनन्योः ।
निर्वर्तयामासुरमात्यवृद्धास्तीर्थाहृतैःकांचनकुंभतोयैः ॥१३५॥
स मौलरक्षोहरिभिः स सैन्यस्तूर्यस्वनानान्दितपौरवर्गः ।
विवेश सौधोद्गतलाजवर्षामुत्तोरणामन्वयराजधानीम् ॥१३६॥

—कालिदास.

## ३१ रामाचा जयजयकार.

### ( १ ) दशरथ.

उतरोनियां महीवर दशरथ धरि नंदनोसि हृत्संगीं ।
हुंगोनि उत्तमांगीं स्थापी प्रेमाश्रुमार्जितोत्संगीं ॥ १३९ ॥

१ हृदयाशी. २ मस्तकावर. ३ प्रेमाश्रूंनीं भिजलेल्या मांडीवर.

५८६

" क्षितिकन्येस, महीस, श्रीमदयोध्येस, कुलगुरुक्तींसी
पाळी जातिस सर्व, प्रजेस, निजधर्मावप्रभक्तीस " ॥१४०॥
ऐसें स्वहित मनें:प्रिय ऐकुनि सीतापती करी मान्य ।
मग सकळांसि विचारुनि गेला स्वर्गासि तो जगन्मान्य ।१४१।

## ( २ ) ऋषि.

रामप्रेक्षाकामें श्रीमदगस्त्यादि पुण्यकीर्ति मुनी
येती, त्यांला पूजी राजा निजमस्तकीं पदें नमुनी ॥ १४२ ॥
ह्मणती, " त्वद्विध राजा पूर्वीं आह्मीं न देखिला कोणी ।
दारुण शत्रु निशाचर माथिला, केली सुखाकरा क्षोणी " ।१४३।
हें ऐकुनि विनयज्ञ प्रभु वंदुनियां ह्मणे " अहो स्वामी !
बहुमानकीर्तिशाली भवत्प्रसादें करूनियां आह्मीं ! ॥ १४४ ॥
लंकेश निशिचराधिप मेला तुमच्या तपःप्रभावानें ।
कारुण्याकुलहृत्स्थल मजला स्तवितां स्वभुत्र भावानें "॥१४५॥

मोरोपंत

## ( ३ ) शंकर

ह्मणे, " धन्य रामा विरा पूर्णकामा । असंभाव्य सीमा कळेना महीमा॥
महाथोर अद्भूत सामर्थ्य केलें । प्रतापेंचि ब्रह्मादिकां सोडवीलें ॥
अकस्मात हा भेटिचा लाभ आला । मनामाजि अद्भूत आनंद झाला ।

१ ब्राह्मणभक्तिरूप क्षत्रियधर्मास २ आवडणारे ३ रामदर्शनाच्या इच्छेनें ४ पृथ्वी ५ दयापूर्ण आहे चित्त ज्यांचें.

सुरांकारणें संकटीं पावलासी । मनोभावना राहिली तूजपाशीं ॥
विषें पोळला प्राण माझा निवाला । निजध्यास तो लागला पार्वतीला॥
समस्तामनीं लागला ध्यास रामा! ।तुझें रूप ध्यातों सदा योगधामा!" ॥
प्रतीउत्तरीं राम बोलें महेशा । ' उदाराधिशा सुंदरा देवधीशा ।
दयासागरें सर्व सांभाळ केला । सुखानंद हेलावला, तृप्त जाला'॥१४९

## [ ४ ] ब्रह्मदेव

पुढें बोलता जाहला तो विरंची । ह्मणे 'धन्य हे आजि वेळा सुखाची॥
तुझा योग होतां घडी अमृताची' । बहु स्तूति केली रघूनायकाची ॥
' तुह्मांवेगळे सर्वही दीन झालों । त्रिकूटाचळीं बंदिशाळे मिळालों ।
सुतांलागि झेंपावला व्याघ्र जैसा । जगन्नायका ! तूं समस्तांसि तैसा ॥

## ( ५ ) इंद्र.

'बहूतांपरी राघवा ! ऐकलासी । परी पूरली लोचनाची असोसी ।
पुढें पाहतां देखतों रूप तूझें । जगन्नायका! धन्य हें भाग्य माझें,॥१५२
मिळाले बहू देव कोट्यानुकोटी । असंभाव्य दोही दळांमाजि दाटी ।
मुखें बोलती देखती राघवाला। स्तुतीउत्तरीं तोषवीती दयाळा ।१५३।

रामदासस्वामी

---

# ३२ अयोध्येचें भाग्य

प्रभू देव हा सर्व ब्रह्मादिकांचा । जया वर्णितां सीणली वेदवाचा ।
स्वयें वास जेथें जगन्नायकाचा।महीमा वदे कोणहो त्या स्थळाचा।१५४

पुरीमाजि ते सर्वही लोक कैसे । सुवर्णाचळीं नांदती देव जैसे ।
प्रतापी बळाचे सदा सत्यवाचे । पुरीमाजि लावण्य देहे जनांचे ॥
पुरीमाजि तें सर्व चातुर्य मोठें । कदाही मनीं नावडे त्यास खोटें ।
विलासे वसे ते रमा आणि विद्या । कळा सर्व साधारणा सर्व सद्या ॥

रामदासस्वामी.

दोहाः---उत्तर दिशि सरयु बहे, निर्मल जल गंभीर, ।
बांधे घांट मनोहर, स्वल्प पंक नहि तीर ॥ ९६० ॥
शीतल अमल मधुर जल, जलज विपुल बहुरंग ।
कूजत कलरव हंसगण । गुंजत मंजुल भृंग ॥९६१॥

तुलसीदास.

## ३२ रामराज्य

राज्यातें अज तो करीत असतां जाले दरिद्री धनी;
रोगी रोगविहीन; बालिश रत ज्ञानाचिया साधनीं; ।
गाई त्या घटदोहनी; बहुरसा सस्यावृता मेदिनी;
यूपस्तंभसमन्वितािह सरयू लोकत्रयाल्हादिनी ॥९६२॥

साकीः—आधिव्याधि जरा दारिद्र्य व्यसनंपचता क्लेश ।
लेश प्रभुच्या राज्यांत नसे, संपन्न सुखी देश ॥ ९९३ ॥

व्याळ व्याघ्र चोर दुर्भिक्ष प्रभुच्या राज्यांत नसे ।
जन सेविति शिशुसेच्चि प्रेमें प्रभुचे सुगुण स्तनसे ॥१६४॥

—मोरोपंत

दोहा:—वर्णाश्रम निज निज धरम, निरथ वेदपथ लोग ।
चलहि सदा पावहि सुखहिं, नहिं भय शोक न रोग ॥१६५॥

तुळसीदास

**उपसंहार**

सत्यप्रतिज्ञत्वयश प्रभुनें निज रक्षिलें, ।
भक्षिलें वन्य; वेदोक्त गुरूक्त सम लक्षिलें, ॥१६६॥
भक्तकल्पद्रुमारामें रामें रंजविलें जग ।
एकादशसहस्राब्द, पुर उद्धरिलें मग ॥१६७॥
चरित्रीं विश्व रमलें शमलें सर्व पातक ।
श्रीराम मेघ गमला, भक्त ते मोर चातक ॥१६८॥
राष्ट्रचि न, राम निववी देउनि धर्मार्थकाममोक्ष, मही ।
मन अनुसरे प्रजांचें अक्षमसा, रामराज तो क्षमही ॥१६९॥
प्रजा सर्वाहि विमळा विमानामाजि वाहिल्या ।
नेल्या स्वलोकां ताराया, कथा श्रोत्यांसि राहिल्या ॥ १७०

—मोरोपंत.

( श्री राम जय राम जय जय राम )

REFBK-0000546

REFBK-0000546

म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. ६८२
REFBK-0000546
REFBK-0000546

॥ श्रीराम प्रसन्न ॥

# कविरामायण

चार वेद आठ दश करैं पुराण प्रकास ।
सबते अति उत्तम कह्यो रामायण इतिहास ॥ १ ॥

तुलसीदास.

संपादक व प्रकाशक.


लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.
पुणें शनवार पेठ, मुमुक्षु कचेरी.


REFBK-0000546


ाराम जोशी, ा 'आर्यविजय' छा

श्रीरामनवमी शके १८३

मीर्च सन १९०९.

किंमत ४ आणे.